# स्मरणिका २०२४

# महाराष्ट्र फाउंडेशन

## अमेरिका

## पुरस्कार २०२३

Invest in future
of
those with no future...
so
they can
REINVEST

। साहित्य पुरस्कार ।    । समाजकार्य पुरस्कार ।

**महाराष्ट्र फाउंडेशन** (अमेरिका)
यांच्यासाठी
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**, पुणे
व **साधना ट्रस्ट** (पुणे)
यांनी
सुनील देशमुख साहित्य आणि समाजकार्य
पुरस्कारांच्या (२०२३) निमित्ताने
या स्मरणिकेचे प्रकाशन जानेवारी २०२४ मध्ये केले आहे.
*(फक्त खाजगी वितरणासाठी)*

□

संपादक
**मुकुंद टाकसाळे**
mukund.taksale@gmail.com / 9850817210

अंकनिर्मिती
**प्रदीप चंपानेरकर**

मुखपृष्ठ
**राजू देशपांडे**

अक्षरजुळणी
**मुग्धा दांडेकर,** श्रीडी ग्राफिक्स, पुणे

मुद्रितशोधन
**विजय जोशी**

मुद्रक
**रोहन प्रकाशन,** ४३० शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

# पुरस्कारांचे मानकरी आणि स्वरूप

| साहित्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
| --- | --- |
| ■ दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार<br>**तारा भवाळकर** | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ ग्रंथ पुरस्कार (ललित)<br>**सतीश तांबे** ('काम तमाम @ वाघा बॉर्डर' – कथासंग्रह) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ ग्रंथ पुरस्कार (वैचारिक/अपारंपरिक)<br>**कालिदास शिंदे** ('झोळी' आत्मकथन) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार<br>**चैतन्य सरदेशपांडे** (एकांकिका 'रविवार डायरीज' आणि 'उकळी') | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

| समाजकार्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
| --- | --- |
| ■ डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार<br>**शिवकुमार भारती** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ समाजकार्य विशेष कार्य पुरस्कार<br>**शांताराम चव्हाण**<br>(असंघटित कष्टकरी) | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ समाजकार्य विशेष कार्य पुरस्कार<br>**नीतिन पवार**<br>(सामाजिक प्रश्न) | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)<br>**निसार अली सफदर अली सय्यद**<br>**वैशाली निसार अली सय्यद** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)<br>**विजय देठे** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

# अंतरंग


- संपादकीय / ५
- अध्यक्षांचे मनोगत : राजीव भालेराव / ७
- मनोगत : शोभा चित्रे / ९
- ‘मासूमीयत’ : डॉ. मनीषा गुप्ते, डॉ. रमेश अवस्थी / ११
- पुरस्कारप्राप्त मान्यवरांविषयी...
  - ताराबाई भवाळकर : औडकचौडक ताराबाई! – डॉ. मुकुंद कुळे / १५
  - संवाद ‘अर्जक संघा’चे राष्ट्रीय अध्यक्ष शिवकुमार भारती यांच्याशी – संवादक : राहुल थोरात / २३
  - सतीश तांबे : एक ‘नैतिक’ लेखक – हेमंत कर्णिक / ३२
  - शांताराम चव्हाण : लढवय्याच्या सत्काराचा दुर्मीळ योग – अरुण ठाकूर / ३९
  - डॉ. कालिदास शिंदे : झोळी : नाथपंथी डवरी गोसावी समाजाचा महत्त्वाचा दस्तऐवज – रणधीर शिंदे / ४६
  - नीतिन पवार : परिवर्तनाच्या चळवळीतील संघर्षयात्री – ॲड. दत्ता काळेबेरे / ५५
  - चैतन्याने रसरसलेला रंगकर्मी : चैतन्य सरदेशपांडे – रमाकांत मुळे / ६३
  - विजय देठे : मनीष राजनकर / ७१
  - लढवय्ये निसार अली आणि वैशाली महाडिक : शरद कदम / ७७
  - भालचंद्र नेमाडे भाषण / ८५
  - रंगनाथ पठारे भाषण / ९३
- निवड समिती / ९७
- महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था / ९८
- पुरस्कार निवडीचे निकष / १०७
- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’विषयी / १०९
- जब्बार पटेल यांचा परिचय / १११

## संपादकीय



महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार समारंभ आला की सुनील देशमुख यांची आठवण येणे स्वाभाविकच आहे. पुरस्कार योजनेचे ते प्रवर्तक. स्वत:चे दोन कोटी रुपये घालून त्यांनी ही पुरस्कार योजना सुरू केली. पुढील वर्षी त्या योजनेला तीस वर्षे होतील. सुनील देशमुख यांच्या उमद्या व्यक्तिमत्त्वाची आठवण कायमच येत राहणार यात शंका नाही. या वर्षीपासून म्हणूनच पुरस्काराचे नाव 'सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार' असे करण्याचे आम्ही ठरवले आहे. इथे आणखी एक गोष्ट नमूद करायला हवी, ती म्हणजे सुनीलच देशमुख यांच्या पश्चात या पुरस्कार योजनेचे अध्यक्षपद त्यांच्या पत्नी प्रतिभा देशमुख यांनी आमच्या विनंतीवरून स्वीकारले आणि ही योजना पुढेही चालू राहील, याची ग्वाही दिली. अमेरिकेत हे घडते आहे, त्यामुळे त्याचे अप्रूप वाटल्याशिवाय राहत नाही. कारण मराठी साहित्य आणि सामाजिक विश्वात जिचा जीव गुंतलेला आहे, ती व्यक्ती गेल्यानंतर तिच्या कुटुंबीयांना हे काम पुढे चालवण्यात रस असणं ही काहीशी अपवादात्मकच घटना मानता येईल. प्रतिभा देशमुखांच्या या आश्वासक भूमिकेमुळे आमचा काम करण्याचा उत्साह द्विगुणित झाला.

पुरस्कार समारंभाला डॉ. जब्बार पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले आहेत. सुनील देशमुखांना डॉक्टरांबद्दल विशेष प्रेम होते आणि ते तसे वारंवार बोलूनही दाखवत. किंबहुना सत्तरच्या दशकातील साहित्यिक - सांस्कृतिक विश्वाबद्दल आस्था असणाऱ्या प्रत्येकालाच पटेलांबद्दल असेच प्रेम होते, आजही आहे. नाट्यक्षेत्रात पटेलांनी घडवलेला 'घाशीराम कोतवाल' हा चमत्कार विसरणे केवळ कठीण! पटेलांनी एवढे एकच नाटक केले असते तरी त्यांचे नाव मराठी रंगभूमीला आदराने घ्यावे लागले असते. पटेल रंगभूमीवर अभिनेते म्हणून आले. 'तू वेडा कुंभार', 'अशी पाखरे येती' ही त्यांची गाजलेली नाटके. अशी पाखरेचे ते दिग्दर्शकही होते. पण 'अशी पाखरे'नंतर पटेलांनी रंगभूमीवर अभिनय केला नाही. किंबहुना 'घाशीराम', 'तीन पैशाचा तमाशा', 'खेळिया', 'पडघम' या नाटकांनंतर त्यांनी नाटकही केले नाही. ते चित्रपटांकडे वळाले. सामना (१९७४), जैत रे जैत (१९७७), सिंहासन (१९७९), उंबरठा (१९८२), डॉ. बाबासाहेब आंबेडकर (२०००) यांसारखे चित्रपट आजही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतील. थिएटर ॲकॅडमी त्यांनी स्थापन केली, तो काळ दलित पॅन्थर, युक्रांद अशा चळवळींचा. त्यातली नाट्य चळवळीची धुरा आपोआपच पटेलांच्या खांद्यावर आली. त्यांना सतीश आळेकर, मोहन आगाशे यांचीही तशीच साथ मिळाली. त्यामुळे भारतीय रंगभूमी जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी थिएटर ॲकॅडमी ही खरीच 'ॲकॅडमी' बनली. हबीब तन्वीर, रतन थिय्याम, शंभू मित्रा – तृप्ती मित्रा, गिरीश कार्नाड, मोहन राकेश अशी किती

तरी नावं थिएटर ॲकॅडमीमुळे परिचयाची झाली. थिएटर ॲकॅडमीच्या काठाकाठावर वावरणाऱ्या आमच्यासारख्यांनाही भारतीय रंगभूमीवरील अनेक नाटकं पाहायला मिळाली, अभ्यासायला मिळाली. थिएटर ॲकॅडमीचे हे मोठेच ऋण आहे, असे म्हणता येईल. जब्बार पटेल गेली २३ वर्षे पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे 'फेस्टिव्हल डिरेक्टर' या नात्याने आयोजन करीत आहेत आणि त्यांच्यामुळे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जेदार चित्रपट, मराठी चित्रपट रसिकांना पाहावयास मिळत आहेत.

जाता जाता एक गमतीशीर उल्लेख केल्यास तो अनाठायी ठरू नये. जब्बार पटेलांना काही जण 'जब्बार गोडबोले' असं म्हणतात. 'तुच्छतावाद' हा स्थायिभाव असलेल्या पुण्यात 'गोड बोलणे' हा मोठाच दोष ठरावा, अशा काळापासून पटेल सर्वांशी सौजन्याने, प्रेमाने, सहृदयतेने बोलत आलेले आहेत. आम्हाला तरी पटेलांचा हा मोठाच गुण वाटतो. एवंगुणविशिष्ट जब्बार पटेल हे आमच्या या पुरस्कार समारंभाला दुसऱ्यांदा पाहुणे म्हणून लाभत आहेत, याचा आम्हाला अतीव आनंद होतो आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांबद्दल आजही समाजात एक प्रकारचा आदर दिसतो. त्याला कारण आहे ती पुरस्कार निवडीची प्रक्रिया. पुरस्कारांसाठी कुणाकडूनही अर्ज मागवले जात नाहीत. नियमितपणे मराठी पुस्तके वाचणाऱ्यांकडून शिफारशी मागवण्यात येतात. शिवाय ज्यांचे वाचन अद्ययावत आहे अशा चार तज्ज्ञांची एक निवड समिती असते. ती सर्व शिफारशींचा विचार करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन तीन नावे निवडते. ती अमेरिकेतली निवड समितीकडे पाठवली जातात. आणि त्यांतून एक नाव अंतिम पुरस्कारासाठी निवडले जाते. तर अशा या कठोर चाळणीतून ज्यांची नावे पुरस्कारासाठी निवडली गेली आहेत, त्या सर्व पुरस्कार-सन्मानित व्यक्तींचे मन:पूर्वक अभिनंदन!

**मुकुंद टाकसाळे**
संपादक
mukund.taksale@gmail.com / ९८५०८१७२१०

## अध्यक्षांचे मनोगत



महाराष्ट्र फाउंडेशनचा २०२३ चा साहित्य आणि समाजकार्य पुरस्कार संपन्न होत आहे ह्याचा विशेष आनंद आहे. श्री. सुनील देशमुखांनी सुरू केलेली परंपरा मनीषा गुप्ते, रमेश अवस्थी, विनोद शिरसाट, मुकुंद टाकसाळे आणि त्यांचे सहकारी नेहेमीच्याच निष्ठेने आणि जोमाने पुढे नेत आहेत हे कौतुकास्पद आहे.

डॉ. तारा भवाळकर ह्यांना साहित्य जीवन पुरस्काराने सन्मानित केलं जात आहे. सतीश तांबे, कालिदास शिंदे, चैतन्य सरदेशपांडे ह्यांना साहित्यिक पुरस्काराने सन्मानित केलं जात आहे. शांताराम चव्हाण, नीतिन पवार, निसार अली सरफद अली सय्यद, वैशाली निसार अली सय्यद - महाडिक आणि विजय देठे हे समाजकार्य पुरस्कार विजेते आहेत. तर शिवकुमार भारती ह्यांना डॉ. नरेंद्र दाभोळकर स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन.

पुरस्कार वितरणाच्या समारंभाला डॉ. जब्बार पटेलांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती अनेक दृष्टीने उचित आहे.

साहित्य पुरस्कारानिमित्ताने चर्चेला उद्युक्त करण्यासाठी एक विचार मांडतो आहे...

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या तंत्रज्ञानात विलक्षण प्रगती झाली आहे. यंत्र आता बघू शकतात, ऐकू शकतात, लिहू शकतात, चित्र ओळखू शकतात, चित्र काढू शकतात आणि सगळ्यात महत्त्वाचं की ते शिकू शकतात.

यंत्रांचं शिक्षण हे इंटरनेटवर असलेल्या माहितीच्या आधारावर असतं. ह्या शिक्षणाच्या आधाराने यंत्र आता लेख, कथा, काव्य लिहू शकतात. ह्या घटनेमुळे प्रत्येक क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार आहेत. नव्या संधी निर्माण होतील, नवीन समस्या निर्माण होतील. हॉलीवूडमध्ये लेखकांच्या स्ट्राइकमध्ये हा विषय मध्यवर्ती होता.

साहित्य आणि कला निर्मिती म्हणजे काय आणि निर्मितीचे श्रेय नेमके कोणाचे असे मूलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत.

अर्थात मानवी अनुभव आणि अभिव्यक्तीची जागा यंत्र घेऊ शकणार नाहीत, पण साहित्याची नवनिर्मिती म्हणजे काय हा प्रश्न तावून सुलाखून निघणार आहे. यंत्र जरी नवनिर्मिती करू शकणार नाहीत, तरी भविष्यात नवनिर्मितीच्या प्रक्रियेत साहाय्यक म्हणून त्यांचा वापर करणे अनिवार्य होणार आहे.

हा बदल चांगला की वाईट हे आपण ही क्षमता कशी वापरणार आहोत त्याच्यावर अवलंबून राहणार आहे. पण सकारात्मक दृष्टीने बघितल्यास ही क्षमता आपल्याला निर्मितीची

पातळी वाढवण्यास नक्कीच मदत करणार आहे.

मराठी साहित्यक जगात ह्या बदलांचे पडसाद उमटत आहेत का?

यंत्रांना मराठी सांस्कृतिक परंपरेची आणि सामाजिक विचारांची ओळख करून देण्यासाठी कुठचे स्त्रोत वापरता येतील?

ही ओळख करून देताना उघड आणि छुपा पक्षपात कसा टाळता येईल.

मराठी साहित्याची किती माहितीकोश इंटरनेटवर उपलब्ध आहेत? साधनेच्या विनोद शिरसाट ह्यांनी कर्तव्य ह्या इंटरनेटवरती केलेलं साहित्यिक संकलन एक योग्य स्त्रोत असेल.

त्याचबरोबर साहित्यिकांचे श्रेय आणि मानधन नमूद करण्याची व्यवस्था अमलात आणावी लागणार आहे.

कदाचित मराठी साहित्य जगातल्या इतर समस्यांना अधिक प्राधान्य असू शकते पण कुणीतरी ह्या येणाऱ्या बदलाविषयी विचार करायला हवा. मराठीच्या संवर्धनासाठी ते गरजेचे आहे.

ह्या गोष्टी पुढच्या, आज आपण आपल्या साहित्यिकांना आणि समाज कार्यकर्त्यांना मानवंदना करूयात.

**राजीव भालेराव**
अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन, (अमेरिका)
president@maharashtrafoundation.org/rajivpost@gmail.com/7324047408



## श्रद्धांजली

**शिरीष गुप्ते**

जन्म - ५ मे १९५१ । मृत्यू - ८ डिसेंबर २०२३

शिरीष गुप्ते हे महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेचे माजी अध्यक्ष होते आणि एक निष्ठावान कार्यकर्तेही होते आणि पुरस्कार प्रवर्तक सुनील देशमुख यांचे चांगले मित्र होते. ही पुरस्कार योजना सुरू करण्यात तेही सुनील देशमुखांबरोबर होते. 'सर्वांसाठी सामाजिक आणि आर्थिक न्याय' या तत्त्वावर भर देणाऱ्या असंख्य सेवाभावी संस्थांसाठी त्यांनी आपला वेळ दिला. ते निष्णात भौतिकशास्त्रज्ञ होते आणि अमेरिकेतल्या काही उत्तम ट्रान्झिट सिस्टम डिझाइन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आयुष्याच्या उत्तर काळात त्यांनी हवामान बदलाच्या प्रश्नावर आपल्या पत्नीसोबत काम केले. सॅन अॅन्टोनियो शहराची सुधारणा करण्यासाठी या दोघांनी काम केले. कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी कसलीही मदत करण्यात त्यांचा हात कायम पुढे असायचा. पती, वडील, आजोबा, भाऊ, मित्र, आणि एक सजग नागरिक या साऱ्या भूमिका त्यांनी प्रेमळपणे निभावल्या. त्यांनी आपल्या पद्धतीने आयुष्याचा पुरेपूर आनंद लुटला. त्यांना विनम्र श्रद्धांजली.

## मनोगत



नमस्कार,

सर्वप्रथम पुरस्कार प्राप्त साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते यांचं मनापासून अभिनंदन. भारताबाहेर वास्तव्य करणाऱ्या आम्हाला महाराष्ट्राचा असलेला वैचारिक वारसा आणि प्रवाहाविरुद्ध जाऊन सामाजिक सुधारणा घडवण्याची जिद्द असलेल्या आपल्या मराठी परंपरेचा अभिमान आहे. आपले प्रगत विचार ठामपणे मांडणारे, सामाजिक विषमतेला आपल्या लेखणीतून वाचा फोडणारे साहित्यिक आणि सामाजिक कार्यातून समाजातल्या उपेक्षित वर्गाला दिशा दाखवणारे कार्यकर्ते या सर्वांचं कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावं, समाजात नवविचार रुजवले जावेत या उद्देशाने सुरू झालेली ही पुरस्कार योजना आहे. सुनील देशमुख यांच्या उदार देणगीतून १९९४ पासून 'साहित्य पुरस्कार' आणि १९९६ पासून 'समाजकार्य पुरस्कार' सुरू झालेले हे आहेत.

गेल्या वर्षी सुनील देशमुख यांचा अकाली मृत्यू झाला. आम्ही सर्वांनी सुनील देशमुख यांच्या पत्नी प्रतिभा देशमुख यांना पुरस्कार योजनेचं अध्यक्षपद घ्यावं अशी विनंती केली. त्यांनीही ती मान्य केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही ही पुरस्कार योजना पुढे चालवत आहोत. या योजनेच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून सुनील देशमुख यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चांमधून, विचार मंथनातून या योजनेच्या उद्दिष्टाविषयी आमच्या मनात एक पक्केपण आहे. ते असतानाच आमच्या या कार्यात भारतातले असंख्य हात सहभागी आहेत, याचीही आम्हाला जाणीव आहे.

पुढील वर्षी या योजनेला ३० वर्षं पूर्ण होतील. या ३० वर्षांत तंत्रज्ञानाने सामान्यांच्या कल्पनेबाहेरची भरारी घेतलेली आहे. जगभरात आमूलाग्र बदल झालेले आहेत. बदल हे प्रगतीचं लक्षण असतं, हे जरी खरं असलं, तरी आजच्या समाजात घडत असलेले बदल काहीसे विपरीत वाटतात. समाजात समाजाच्या मानसिकतेत घडत असलेले हे बदल अनपेक्षित आहेत, मनाला अभिप्रेत नसलेले आहेत. तंत्रज्ञानाच्या जोडीला प्रसार माध्यमाचा वापर करून समाजाच्या मनात भीती आणि असुरक्षितता निर्माण केली जात आहे. तशातच या तंत्रज्ञानामुळे समाज-मानसात अंधश्रद्धा, धर्मांधता याचं विष कालवणं सोपं झालेलं आहे. याला बळी पडणारे अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत सर्वजण आहेत. पुढे जाणाऱ्या समाजाला मागे रेटण्याचे हे असे पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत. जगभरात उसळलेला युद्धाचा भडका, त्यावर आपल्या विचारांची पोळी भाजणारे राजकारणी आणि या सगळ्या धुमश्चक्रीत स्त्रिया आणि लहान मुलांची होणारी जीवघेणी फरपट आणि या सर्व घटनांकडे त्रयस्थपणे बघणारा उच्चभ्रू (?) समाज - हे तसं

घाबरवणारं चित्र आहे. तरीही अशा चहूबाजूनी घेरलेल्या अंधकाराला जिद्दीने बाजूला करून पुढे जाणारे, अडल्या-नडल्यांना पुढे नेणारे, मार्गदर्शन करणारे कार्यकर्ते आहेतच. भोवताली चाललेल्या उत्सवप्रियतेकडे, उन्मादी जल्लोषाकडे दुर्लक्ष करून तळागाळातल्या आर्थिक, सामाजिक विषमतेच्या दलदलीत अडकलेल्यांना मदतीचा हात देऊन बाहेर काढणारे हे खरे अर्थाने वारकरीच आहेत. तर साहित्यिक पुढे येणाऱ्या काळाची पावले ओळखून समाजातल्या अनिष्ट गोष्टींवर निर्भीडपणे प्रहार करीत असतात. त्यांच्या शब्दातून पुढे येणारी घटना, प्रसंग मनाचा थरकाप उडवतात, तर कधी एखाद्या साहित्यकृतीतून आपल्याच लोकांवर केलेल्या अत्याचाराचे वर्णन वाचून मान शरमेने खाली झुकते. मात्र याच वेळी अगदी सहज उच्चारले जाणारे शब्द 'समानता', 'बंधुता', 'न्याय' यांचे अर्थ नव्याने स्पष्ट होतात, आपल्याला नव्याने विचार करायला भाग पाडतात.

आपण सगळ्यांनीच आपल्या परीने एकेक पणती लावून इतरांच्या आयुष्यातला अंधकार दूर करू या, त्यातून आपलंही मन उजळून निघेल. एकमेकांना बळ देत राहील. प्रकाशाची दिंडी घेऊन निघालेल्या या सर्वच वारकऱ्यांना शुभेच्छा.

**शोभा चित्रे**

साहित्य व समाज कार्य पुरस्कार अमेरिकेतील निवड समितीच्या अध्यक्ष

## ‘मासूमी’यत

# ‘मासूम’कडून सर्वांना सबरंगी सलाम आणि झिंदाबाद





सुनील देशमुख यांची उणीव कायमच जाणवत असते; मात्र पुरस्कार वितरण सोहळ्याच्या वेळी ती अधिक तीव्र होते. या वर्षापासून महाराष्ट्र फाउंडेशनचे सर्व पुरस्कार सुनीलच्या नावाने दिले जाणार आहेत ही एक समाधानाची बाब आहे.

२०२३ सालच्या सर्व पुरस्कार सन्मानित दिग्गजांचे मन:पूर्वक अभिनंदन! सर्वांना भेटायला, ऐकायला उत्सुक आहोत. तसेच, या वर्षी साहित्य आणि समाजपरिवर्तन या दोन्ही क्षेत्रांत निपुण आणि मान्यवर असलेले डॉ. जब्बार पटेल आपल्याला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

या वर्षी मासूमचे मुलांबरोबर असलेलं काम याबद्दल थोडेसे सांगू-लिहू इच्छितो. या कामाला एक समृद्ध पार्श्वभूमी आहे. आम्ही दोघे छात्र युवा संघर्ष वाहिनी आणि झोपडपट्टी संघर्ष वाहिनीच्या माध्यमातून मुंबईच्या वस्त्यांमध्ये लहान मुलांच्या बरोबर १९७० आणि १९८० च्या दशकांमध्ये काम करत होतो. वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर वंचित समूहांतील मुलांच्या गरजा, आकांक्षा आणि आयुष्यातील अडचणी समजून घेत असताना त्यांच्या दैनंदिन व्यवहारात लोकशाही, धर्मनिरपेक्षता, निर्भयता आणि पारदर्शक नेतृत्व यांची बीजे रोवण्याचे प्रयत्न करत होतो. वाचनालये सुरू करणे, गुप्त मतदान करून आपल्या गटाचे प्रतिनिधी निश्चित करणे, त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या मुलांनी आधीच ठरवून देणे असे कार्यक्रम राबवीत होतो. निवडून आणलेल्या लोकप्रतिनिधींवर लोकांचा दबाव असणे का गरजेचे असते आणि सर्वसामान्य लोकांची ताकद हीच खरी लोकशाही यावर बरीच चर्चा करायचो. मुलांच्या सहभागाने वेगवेगळ्या पद्धतीचे एक्सपेरिमेंटेशन तिकडे केले. त्यातून अनुभवांची मोठी शिदोरी तयार झाली. खूप शिकलो.

मुंबईतील एका वस्तीमध्ये तर मुलांनी अद्भुत असा बदल घडवून आणला होता. परिसरातील वस्त्यांमध्ये पाणी, लाईट, संडास या सारख्या न्यूनतम गरजांवरून, किंवा दारू प्यायलेल्या पुरुषांमध्ये झालेल्या भांडणांवरून जेव्हा मारामारी व्हायची तेव्हा शेजारच्या वस्त्यांवर दगडगोटे आणि सोडावॉटरच्या काचेच्या बाटल्या फेकणे, बेदम मारहाण करणे इत्यादी प्रकार सुरू असायचे. मात्र या सर्व वस्त्यांमधल्या मुलांबरोबर एकत्रित काम सुरू केल्यानंतर आपापसात

एकदाही अशी हिंसक मारामारी झाली नाही. एवढेच नव्हे तर ज्या मुलांबरोबर काम केलं ती मुलं पुढे शिकली, निर्व्यसनी राहिली, वडिलांनी आईला केलेल्या मारहाणीबद्दल घरी आक्षेप घेऊ लागली आणि काही जण उद्योजकसुद्धा झाले.

वरील अनुभवांच्या आधारे जेव्हा १९८७ मध्ये पुरंदर तालुक्यातल्या दुष्काळग्रस्त खेड्यामध्ये राहायला जायचं ठरवलं तेव्हाच महिलांच्या बरोबरीने मुलांबरोबर काम करण्याचा निर्णय आम्ही जाणूनबुजून घेतला. लहान मुलांबरोबर काम करणे म्हणजे तीन पिढ्यांबरोबर काम करण्याच्या बरोबरीचे असते यावर आमचा विश्वास होता, आणि कालांतराने हा निर्णय योग्यच ठरला असे म्हणावे लागेल.

ऐंशीच्या दशकात खेड्यामध्ये लहान मुलांची पुस्तकांपर्यंतची पोहोच अतिशय दयनीय होती. अभ्यासक्रमातील थोडीफार पुस्तके (जी अनेक मुलांकडून दर वर्षी पुढे येत गेलेली, इथून तिथून फाटलेली आणि तेलाचे किंवा शाईचे डाग असलेली) जवळ असायची. त्या पलीकडे मुलांना एकही पुस्तक माहीत नव्हते. शाळेमध्येच होत नसेल तर मग मुलांसाठी इतर वाचन ही फार दूरची गोष्ट होती. मुलांची अभिव्यक्ती आणि कल्पनाशक्ती अतिशय खुंटलेली असायची. दोन-तीन ओळींपेक्षा जास्त मोठी गोष्ट सांगता यायची नाही. मग मुलांसाठी वाचनालये सुरू केली. परीकथा आणि लहानशी वैचारिक पुस्तके आणली. आश्चर्याची गोष्ट अशी की मुले संध्याकाळी तासभर ऑफिसमध्ये येऊन बसायची. एखादे पुस्तक तिथेच वाचायची, आणि दुसरे पुस्तक काखेमध्ये राखून ठेवून घरी घेऊन जायची. ठरल्या दिवशी पुस्तक परत घेऊन यायची. पुस्तक फाटले किंवा हरवले तर कोणालाही शिक्षा नसायची; मात्र नुकसान भरपाई कशी करायची हे आधीच ठरलेले असायचे. वर्षभराच्या आत बहुतांश मुलांनी पन्नास एक पुस्तके तरी वाचली असतील. त्यानंतर शाळेमधून मुलांचे वाचन आणि लिखाण खूप सुधारले आहे असा अभिप्राय येऊ लागला. मुलांच्या विचारशक्तीला वाव मिळाल्यामुळे हा अनुभव आमच्यासाठी सुखदायक ठरला होता.

मुलांची अभिव्यक्ती जागृत होताच अनेक विषयांवर ते प्रश्न विचारू लागले. मग आम्ही 'फुलपाखरू' नावाचे एक भित्तिपत्रक सुरू केले. गंमत अशी की स्थानिक शाळांमध्ये याची प्रत मुख्याध्यापकांच्या खोलीमध्ये, आणि मुलांचा हात पोहोचणार नाही किंवा वाचता येणार नाही अशा ठिकाणी लावलेली असायची! 'मुले उगाच भित्तिपत्रके कशाला फाडतील' यावर अनेकदा चर्चा करूनसुद्धा हा मुद्दा शाळांना काही पटला नाही. मग गावात वेगवेगळ्या ठिकाणी आम्ही फुलपाखरू भिंतींवर लावू लागलो. मुलांच्या उत्साहाला उधाण आले. पोस्टमन आणि बस ड्रायव्हर - कंडक्टरबरोबर फुकट पत्र पाठवून प्रतिक्रिया, कविता येऊ लागल्या. एक प्रश्न अजूनही आठवतो : जर काळ्या बकरीला काळे करडू होते, तर मग पांढऱ्या अंड्यातून फक्त पांढरे पिल्लू का निघत नाही? उत्तरे लिहून छापायला खूप मजा यायची.

मुलांच्या बरोबर सखोल काम सुरू करण्यासाठी मग मासूम ने 'रानपाखरे' हे बालगट

गावोगावी सुरू केले. यामध्ये तिसरी ते आठवी या वयोगटातील मुले असायची. मुलामुलींनी एकत्र खेळणे, एकसारखी कामे करणे, घरकामात मुलग्यांचा सहभाग वाढवणे असे उपक्रम या माध्यमातून सुरू केले. तीन वर्षे बालगटात सक्रिय राहिल्यानंतर बालपंचायत निवडणुकीसाठी मुले उभी राहू शकत. प्रत्येक गावात वंचित समूहांमधील मुलांना प्राधान्य देऊन पाच मुलगे आणि पाच मुलींची बालपंचायत तयार झाल्यावर बालहक्कांशी संबंधित अशा शिक्षण, बालविकास, मनोरंजन, खेळ आणि सांस्कृतिक समित्या तयार केल्या जायच्या. उदा: धनगर, भटके विमुक्त, स्थलांतरित समूह, आणि सासर - माहेरच्या हिंसाचाराच्या चक्रात अडकलेल्या महिलेच्या मुलांची शाळा सुटली की शिक्षण समिती त्यांना पुन्हा शाळेत दाखल करून घ्यायची. काही बालपंचायतींनी तर फारच भन्नाट कामे केली. अकरा सदस्यांची संपूर्ण ग्रामपंचायत आणि तलाठी ग्रामसेवक अशा सर्वांना ग्रामपंचायत कचेरीमध्ये बोलवून मुलांचे प्रश्न मुलांनीच मांडले. मुलांच्या मैदानी खेळाची जबाबदारी केवळ मासूमची नसून गावाची आहे हे सर्वांच्या समोर मांडले. शाळेमध्ये होणाऱ्या शारीरिक किंवा लैंगिक हिंसाचाराबद्दल उघडपणे बोलले गेले.

गावामध्ये मुलांचे पुरोगामी नेतृत्व तयार झाल्यानंतर बालगटांनी अचाट कामगिऱ्या बजावल्या. आपल्या घरात किंवा आसपासच्या ठिकाणी अल्पवयीन मुलीचे लग्न ठरले असता संपूर्ण गटाने घरी जाऊन मुलीच्या आई-वडिलांशी संवाद साधला. मासूमच्या बालगटातून मोठी झालेली मुले आज पुरंदर तालुक्यामध्ये प्राध्यापक आहेत, काही गावांमध्ये सरपंच आणि पोलीस पाटीलसुद्धा आहेत. ते एक वेगळे नेतृत्व राबवण्याचा प्रयत्न करत आहेत. काही जणांनी रानपाखरेमधून मोठे झाल्यावर आपापल्या गावांत स्वत: बालगट चालवले, अनेक मुले मासूमच्या 'भरारी' नावाच्या युवा गटांमध्ये सक्रिय राहिले, आणि काही जण संस्थेमध्ये पूर्णवेळ कार्यकर्ते झाले.

कालांतराने परिस्थिती खूपच बदलली आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावला नसला तरी जमिनी विकल्या जात असल्या कारणाने तात्पुरता पैसा हाती येऊ लागला आहे. लॅपटॉप, महागडे बूट आणि कपडे, बाईक इत्यादीसाठी हट्ट केला जात आहे. सामाजिक माध्यमाच्या महापुरात मुले स्वत:ला सुरक्षित ठेवू शकत नाहीयेत. शिस्तीच्या नावाखाली शिक्षा करणे किंवा हातातून मोबाइल काढून घेणे हा उपाय नसून मोबाईलच्या वापरामधून कोवळ्या वयातील मुली मोठ्या पुरुषांच्या तावडीत सापडू नयेत, मुलीच्या मनाची तयारी नसताना तिला शारीरिक आणि लैंगिक संबंध ठेवणे भाग पडू नये आणि सर्व प्रश्नांना 'मुलीचे ताबडतोब लग्न करून टाका' हा एकच पर्याय अवलंबला जाऊ नये यासाठी लहानपणापासून मुलांसोबत संवाद आणि चर्चा करणे गरजेचे झाले आहे. लहान वयात वाढती व्यसनाधीनता आणि आत्महत्येचे प्रयत्न पाहता सोशल मीडियाच्या जंगलातून सुरक्षित वाट नेमकी कशी काढायची, मुलांसोबत कसे बोलायचे आणि मुलांचे कसे ऐकायचे यावर काम करणे आवश्यक आहे. विखारी पुरुषत्व आणि हिंसक जातीवादी आणि धर्मांध राजकारणाच्या विळख्यात आपली मुले अडकू नयेत यासाठी

बालपणापासून मुलामुलींचे सक्षमीकरण करणे हे मासूम पुढे सध्याचे मोठे आव्हान आहे.

भारतातील आणि अमेरिकेतील सर्व समित्यांच्या आणि भारतातील संयोजन समितीच्या सहकार्यानेच वर्षभर चालणारी महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांची प्रक्रिया नेटाने पार पडत असते. मासूमतर्फे सर्वांचे प्रेमपूर्वक आभार!

स्नेहांकित,

**डॉ. मनीषा गुप्ते व डॉ. रमेश अवस्थी**
संस्थापक आणि सहसमन्वयक
महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM – मासूम)
masumpune.mfa@gmail.com

**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM - मासूम)**
४२ - बी१, कुबेरा विहार, गाडीतळ, हडपसर, पुणे ४११ ०२८
दूरध्वनी : ०२०-२६९९५६२५/२६९९५६३३

दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार

# ताराबाई भवाळकर
# औडकचौडक ताराबाई!

□

डॉ. मुकुंद कुळे



*‘पारंपरिक जीवन हा माझा जिव्हाळ्याचा विषय असला तरी तो माझ्या अंधश्रद्ध उमाळ्याचा विषय कधीच नव्हता. उलट मी त्याकडे सतत चिकित्सक वृत्तीनेच पाहत आले आहे. जुने ते सर्व सुंदर-आदर्श असे जे एक स्वप्नचित्र उभे करण्याची प्रथा आहे ती चिकित्सक विवेकाच्या विरोधात जाणारी आहे.’*

औडकचौडक हा ताराबाईंचा (डॉ. तारा भवाळकर) आवडता शब्द. आपलं लेखन-वाचन आणि जगणंही औडकचौडक झालंय, असं बोलताना त्या अनेकदा सांगत असतात. त्यांच्या बोलण्यातील हे ‘औडकचौडक’ म्हणजे काय? तर- आडवंतिडवं-वाकडंतिकडं कसंही. शिस्तबद्ध किंवा आखून-रेखून असं काही न केलेलं. अर्थात त्याची ताराबाईंना बिलकूल खंत नाही. उलट आपल्या या औडकचौडक लेखन-वाचनाने आणि वागण्या-जगण्यानेच आपल्याला खऱ्या अर्थाने समृद्ध केलं याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. किंबहुना त्यांच्या अशा औडकचौडक जगण्यामुळेच आजच्या बहुआयामी, बहुपेडी, बहुप्रातिभ ताराबाई मराठी सारस्वताला गवसलेल्या आहेत. केवळ त्यांच्यामुळे मराठी लोकसाहित्यातल्या-लोकसंस्कृतीतल्या अनेक अनवट अशा वाटा मराठी वाचकांना उमजल्या आहेत, आकळल्या आहेत. त्यांच्याप्रमाणे लोकसाहित्याच्या क्षेत्रात काम करणारे महाराष्ट्रात इतरही अनेक मान्यवर होते आणि त्यातले काही आजही आहेत. परंतु ताराबाईंचं वेगळेपण हे की त्यांनी परंपरेनं चालत आलेल्या लोकसंस्कृतीला, मातृसंस्कृतीशी जोडून घेतलं. लोकसाहित्याचा-लोकसंस्कृतीचा अभ्यास त्यांनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून केला. परिणामी लोकसंस्कृतीच्या मुळाशी असलेलं स्त्रीतत्त्व नव्यानेच मुखरित झालं. लोकसंस्कृतीच्या अभ्यासाला एक नवा आयाम मिळाला.

आज डॉ. तारा भवाळकर हे नाव जरी उच्चारलं तरी त्यापुढे त्वरित ‘लोकसाहित्याच्या अभ्यासक’ ही उपाधी आपसूक जोडली जाते, इतकं लोकसाहित्य आणि डॉ. तारा भवाळकर हे समीकरण जुळून आलंय. यावरून कदाचित कुणाला असंही वाटेल की लोकसाहित्य हा ताराबाईंचा कायमच जिव्हाळ्याचा-प्रेमाचा आणि संशोधनाचा विषय राहिला असावा. परंतु प्रत्यक्षात तसं घडलेलं नाही. लोकसाहित्य किंवा लोकसंस्कृती हा विषय त्यांच्या आयुष्यात फार उशिरा आला. तोही योगायोगाने. मात्र लोकसाहित्य-लोकसंस्कृतीच्या अंगाने त्यांचं भरणपोषण कळत-नकळत अगदी लहानपणापासून होत गेलं. महाराष्ट्र-भारतातील जुनंपण सरण्याच्या आणि नवंपण येण्याच्या सांध्यावरच्या काळाच्या ताराबाई साक्षीदार आहेत. एकीकडे दुसरं महायुद्ध सरून यंत्रयुगाला प्रारंभ झाला होता. जातं जाऊन गिरणाबाई चालायला लागली होती. ग्रामीण भागातही हे बदल हळूहळू झिरपत होते. तरी त्याचं सार्वत्रिकीकरण झालेलं नव्हतं. त्यामुळे घरातच जात्यावरच्या ओव्यांपासून अंगणात चालणाऱ्या सण-उत्सवातल्या खेळ-गाण्यांपर्यंत त्यांना संथा मिळाली. त्यात त्यांचं बालपण गेलं पुण्यातल्या शनिवार

पेठेतल्या विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या वाड्यात. ताराबाईंचं कुटुंब या वाड्यात एक भाडेकरू म्हणून राहायचं. चारही वेदांचं मराठीत भाषांतर करणाऱ्या आणि प्राचीन संस्कृत वाङ्मयाचे अभ्यासक असलेल्या चित्रावशास्त्र्यांच्या या वाड्यात एकीकडे अखंड ज्ञानयज्ञ सुरू असायचा, तर दुसरीकडे वाड्यातल्या सर्व देवळांत पहाटेच्या काकड आरतीपासून ते रात्रीच्या शेजारतीपर्यंत देवांची साग्रसंगीत सेवा सुरू असायची. यातून अगदी आपसूक लोकधाटी ते शास्त्रधाटी असा ताराबाईंचा पिंड घडत गेला... आणि परंपरेनं चालत आलेलं जसंच्या तसं न स्वीकारता प्रत्येक गोष्टीला शास्त्रकाट्याची कसोटी लावायची त्यांना सवय लागली. अन्यथा जुनं ते सोनं म्हणत परंपरेविषयी गहिवर काढणाऱ्यांची आपल्याकडे कमतरता नाही. परंतु लोकसाहित्याचा-लोकसंस्कृतीचा अभ्यास करताना ताराबाई या 'गहिवर संप्रदायात' रमल्या नाहीत. लोकसंस्कृतीचा अभ्यास करताना केवळ भावभिजलेपण उपयोगाचं नाही हे त्यांना सुरुवातीलाच उमगलं आणि त्यांनी लोककथा-लोकगीतांपासून ते लोकविधी-लोकश्रद्धांपर्यंत प्रत्येक बाबतीत विवेकवादाचा आधार घेतला.

मराठीत लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासाची पायाभरणी करणाऱ्या दिवंगत विदुषी दुर्गा भागवत यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासकांना एक इशारा देऊन ठेवला होता. त्या म्हणाल्या होत्या- 'लोकसाहित्याचा खूप मोठा भाग अत्यंत हिडीस, कंटाळवाणा व जनतेच्या बुद्धीस मागे खेचून धरणारा आहे. लोकसाहित्याचा कृत्रिम उमाळा केवळ त्या विषयालाच नव्हे, तर आमच्या अभिरुचीला व प्रगतीला अंती मारक ठरणारा आहे. तेव्हा लोकसाहित्याची छाननी, त्याचे सर्व घटक अलिप्तपणे तपासून व्हायला हवी.' ताराबाईंनी दुर्गाबाईंचा हा इशारा केवळ शिरोधार्य मानला नाही तर त्या त्यापेक्षा एक पाऊल पुढेच गेल्या. म्हणून तर त्या म्हणतात- 'पारंपरिक जीवन हा माझा जिव्हाळ्याचा विषय असला तरी तो माझ्या अंधश्रद्ध उमाळ्याचा विषय कधीच नव्हता. उलट मी त्याकडे सतत चिकित्सक वृत्तीनेच पाहत आले आहे. जुने ते सर्व सुंदर-आदर्श असे जे एक स्वप्नचित्र उभे करण्याची प्रथा आहे ती चिकित्सक विवेकाच्या विरोधात जाणारी आहे.'

ही विवेकाची भूमिका ताराबाईंच्या एकूणच जगण्याच्या केंद्रस्थानी राहिलेली आहे. खरं तर ताराबाईंचं बालपण काहीशा परंपरावादी वातावरणात गेलेलं. टोकाचं सनातनी वातावरण त्यांच्या कुटुंबात नसलं तरी परंपरेनं चालत आलेले सर्व धार्मिक सण-उत्सव रीतसर करण्याची पद्धत त्यांच्या











ताराबाई व दुर्गाबाई भागवत

घरात होती. लहानपणी त्या जेव्हा पुण्यात होत्या, तेव्हा चित्रावशास्त्र्यांच्या वाड्यात राहायला असल्या तरी एकूण पुणं कर्मठच होतं. या प्रकारच्या सांस्कृतिक भवतालामुळे ताराबाई परंपरावादी व्हायला वेळ लागला नसता. पण त्यांच्या आयुष्यातल्या काही प्रसंगांनी त्यांना आयुष्यभरासाठी शहाणं करून सोडलं. पहिला प्रसंग चित्रावांच्या वाड्यातला होळीदहनाचा. एकदा होळी पेटवण्याच्या आधी वाड्यातील सर्व मुलगे तोंडावर मूठ पालथी ठेवून बोंब मारायला लागले. तेव्हा लहानग्या ताराबाईंनीही त्यांचं अनुकरण केलं आणि त्याही बोंब मारायला लागल्या. त्यासरशी त्यांच्या आईने दणकन् त्यांच्या पाठीत धपाटा घातला. पण त्याच वेळी विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ताराबाईंच्या आईला म्हणाले- ‘मारू दे तिला बोंब, नाहीतरी मुळात बायकांनीच बोंब मारायची असते.’

दुसरा प्रसंग ताराबाईंना लहानपणी शिकवणाऱ्या बोकीलमास्तरांचा. ताराबाईंच्या दारासमोर एकदा कुणीतरी विड्याची पानं आणि गूळ-खोबरं ठेवून त्यावर गुलाल टाकला होता. तसंच टाचण्या टोचलेलं लिंबूही ठेवलं होतं. अशा परिस्थितीत सर्वजण घाबरलेले असताना समोरच राहणारे बोकीलमास्तर पुढे झाले आणि त्यांनी ते सर्व साहित्य उचलून आपल्या घरी नेलं. नंतर पानं धुऊन चंचीत टाकली. आणि गूळ-खोबरंही धुऊन स्वत:ही खाल्लं नि शिकवणीला आलेल्या लहान ताराबाईंनाही खाऊ घातलं. तेव्हा लहानग्या ताराच्या मनात आलं- आपण कुणीतरी मंतरलेलं गूळ-खोबरं खाल्लं. आता मास्तर आणि आपण दोघेही मरणार. तेव्हा मास्तर म्हणाले होते- ‘कसला मंत्र अन् कसलं काय... अगं भित्यापाठी

ब्रह्मराक्षस! अशी मंत्रांनी माणसं मरत असती तर लढाईवर मंत्रच नसते का पाठवले? बंदुकांची आणि तोफांची गरजच काय होती?'

गंमत म्हणजे चित्रावशास्त्री आणि बोकीलमास्तरांप्रमाणे विवेकाची शिकवण देणारी, थेट नास्तिकच म्हणता येईल अशी एक व्यक्ती ताराबाईंच्या घरातच होती. मुद्दाम यमाच्या दक्षिण दिशेला पाय करून झोपणारी. आलाच यम न्यायला तर त्याला लाथेने उडवता तरी येईल, असं म्हणणारी. या साऱ्या अनुभवांच्या प्रभावातूनच ताराबाईंनी पुढील आयुष्यात विवेकवादी भूमिका जपली आणि निभावलीही. 'सुगावा प्रकाशन'चे विलास वाघ, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, नरहर कुरुंदकर, नारायण सुर्वे यांच्याशी ताराबाईंचं मैत्र जुळलं ते या त्यांच्या विवेकवादी भूमिकेतूनच. म्हणूनच त्यांनी एके ठिकाणी म्हणून ठेवलंय- 'बोकील मास्तरांनी शिकवलेले पाढे आणि गणितं मी कधीच विसरले. पण त्यांनी दाखवलेला विवेकाचा दिवा मात्र पुढे आयुष्यभर वाट दाखवत राहिला आहे. केवळ कोणीतरी म्हणतं म्हणून एखाद्या गोष्टीचा विनातक्रार स्वीकार करायला पुढं मन कधीच तयार झालं नाही. प्रश्न, शंका, फाटे फोडणं हे होतंच राहिलं. त्यात भरकटणं, त्रास होणं अटळ होतं. राजमार्ग सोडून विचार करणारांना जे एकाकीपण येतं तेही आलं. पण पुन्हा प्रत्येक वाटेवर एकेक प्रकाशदाता भेटत गेला!'

आता या क्षणी ताराबाईंकडे पाहिलं की त्या कृतार्थतेच्या एका टप्प्यावर पोचलेल्या दिसतात. वापरून वापरून मऊसूत झालेल्या साडीचा लाघवी मुलायमपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्राप्त झालेला आहे. पण प्रत्यक्षात ताराबाईंचं आयुष्य इतकं साधं-सरळ कधीच नव्हतं. सातत्याने स्वत:ला सिद्ध करतच त्या आताच्या टप्प्यावर पोचलेल्या आहेत. लहानपणी घरातील ज्येष्ठ अपत्य म्हणून त्या जरा लवकरच जाणत्या झाल्या. आपली कोणत्याही प्रकारची जबाबदारी कुटुंबावर पडू नये म्हणून शालेय वयातच त्या शिकवण्या घेऊ लागल्या. गंमत म्हणजे रीतसर शिक्षण त्यांनी फक्त एसएससीपर्यंतच घेतलं. पुढलं महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षण त्यांनी बाहेरूनच पूर्ण केलं. त्यांनी नोकरी करणं ही त्यांच्या कुटुंबाची गरज नसेलही कदाचित पण आपल्या आत्मसन्मानासाठी त्यांनी कायम नोकरी करूनच शिक्षण घेतलं. त्यासाठी त्यांनी कधी हिंदी राष्ट्रभाषेची परीक्षा दिली, तर कधी पीटी शिक्षिका म्हणूनही शिकवलं. ताराबाई महाविद्यालयात गेल्या त्या थेट प्राध्यापक म्हणून शिकवायलाच. एवढंच कशाला आपला पीएच.डी.चा अभ्यासही त्यांनी एकप्रकारे स्वत:च केला आणि त्या प्रबंधासाठी त्यांना पुणे विद्यापीठाचा (आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठीचा पुरस्कारही मिळाला. त्या जेव्हा म्हणतात मी औडकचौडक जगले, त्यामागे हा संदर्भ असतो.

लहानपणी चित्रावशास्त्र्यांच्या वाड्यात राहिल्यामुळे तेथील मंदिरात होणाऱ्या देवाच्या सर्व धार्मिक विधी-विधानांतील नाट्यात्मकता ताराबाईंना लहानपणीच भावली होती. पुढच्या काळात कदाचित त्यांतूनच त्या नाटकाच्या अभ्यासाकडे वळल्या. केवळ अभ्यासाकडे नाही, तर त्या नाट्यचळवळीत सामील झाल्या. नाट्यलेखन-दिग्दर्शनापासून ते थेट अभिनयापर्यंत त्यांनी रंगभूमी गाजवली. नोकरीच्या निमित्ताने पन्नास वर्षांपूर्वी सांगलीत येऊन स्थिरावल्यावर त्यांनी सांगलीतच एक प्रायोगिक नाट्यसंस्थाही सुरू केली. विशेष म्हणजे त्यांना राज्यस्तरावरील नाट्यस्पर्धेत अभिनयासाठी पुरस्कारही मिळाले आहेत. नाटकाच्या या आवडीतूनच त्यांनी पीएच.डी.साठी 'मराठी पौराणिक नाटकांची जडणघडण :

प्रारंभापासून १९२० पर्यंत' हा विषय निवडला. पीएच.डी.साठी या विषयाचा अभ्यास करतानाच त्यांची गाठ पौराणिक मिथकांपासून लोकरंगभूमीवरील विविध घटकांशी पडली आणि त्यांच्यासमोर अभ्यासाचं एक वेगळंच क्षेत्र अवचितपणे खुलं झालं. त्यानंतर मग त्यांचा पीएच.डी.चा अभ्यास कधीच पूर्ण झाला, लोकसाहित्य-लोकसंस्कृतीचा अभ्यास मात्र आजतागायत सुरू आहे. लोकसाहित्याच्या क्षेत्रात काम करणारे, करू इच्छिणारे त्यांच्याकडे कायमच मार्गदर्शक म्हणून पाहतात. ताराबाई मात्र आजही स्वत:ला लोकसाहित्याची विद्यार्थिनी समजतात. कारण लोकसाहित्य-लोकसंस्कृती ही प्रवाही गोष्ट आहे. ती कधीच थांबत वा संपत नाही. काळाच्या ओघात वेगवेगळी समकालीन रूपं धारण करून ती वाहत राहते. तेव्हा त्या त्या काळात लोकसंस्कृतीचा मागोवा घेऊन तिचा समकाळाशी सांधा जोडणं ताराबाईंना महत्त्वाचं वाटतं. म्हणूनच आजही त्या लोकगीतं-लोककथा-लोकश्रद्धा यांची आधुनिक काळाशी सांधेजोड करीत असतात.

लोकसाहित्याचा-लोकसंस्कृतीचा अभ्यास ताराबाईंनी त्यांचा त्यांनी केला, आणि तो करताना तो अगदी शास्त्रीय पद्धतीने केला. म्हणजे आज लोकसाहित्य ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा मानली जाते. मात्र या ज्ञानशाखेच्या अंतर्गत येणाऱ्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी विविध ज्ञानशाखांचा (मल्टी डिसिप्लिनरी) आधार घ्यावा लागतो. त्यानुसार ताराबाई इतिहासापासून ते थेट मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, दैवतशास्त्र, भूगोल अशा साऱ्या ज्ञानशाखांच्या क्षेत्रात मन:पूत रमलेल्या असतात. त्यांच्या या संशोधन वृत्तीमुळेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विश्वकोशात लोकसाहित्याबद्दलच्या नोंदी लिहिण्यासाठी त्यांना खास पाचारण केलं होतं.

महत्त्वाची बाब म्हणजे ताराबाई कुठलीही गोष्ट अंधपणाने स्वीकारत नाहीत, मग ती गोष्ट प्राचीन असो वा अर्वाचीन. म्हणूनच जेव्हा १९७५ साली आंतरराष्ट्रीय स्त्री-मुक्ती वर्ष भारतातही जोरदारपणे साजरं होत होतं, तेव्हा 'स्त्री-मुक्तीची कल्पना निदान आपल्याकडे तरी नवीन नाही' असा मुद्दा त्यांनी मांडला होता आणि त्यासाठी मध्ययुगात होऊन गेलेल्या संत स्त्रियांचे दाखले दिले होते. विठ्ठलाकडे आई-बाप-भाऊ या नात्यांपलीकडे जाऊन सखा, प्रियकर म्हणूनही पाहणाऱ्या संत स्त्रियांच्या क्रांतिकारकत्वाची त्यांनी नव्यानेच महाराष्ट्राला ओळख करून दिली. त्यातूनच आकाराला आलेलं 'स्त्री-मुक्तीचा आत्मस्वर' हे त्यांचं पुस्तक मध्ययुगातील स्त्री-मुक्ती संकल्पनेची स्त्रीवादाच्या









अंगाने अभ्यासपूर्ण मांडणी करणारं आहे. पण केवळ संत स्त्रियांपुरता स्त्री-मुक्ती किंवा स्त्रीवादाचा पुरस्कार करून ताराबाई थांबल्या नाहीत. नंतरच्या काळात त्यांनी एकूण लोकसंस्कृतीचाच त्या अंगाने मागोवा घ्यायला सुरुवात केली आणि त्यांच्या लक्षात आलं की- ही लोकसंस्कृती खरं तर मातृसंस्कृती आहे. 'लोकसंचित', 'लोकसाहित्यातील स्त्री-प्रतिमा' यांसारख्या पुस्तकांतून त्यांची लोकसाहित्याची स्त्रीवादी मांडणी पाहायला मिळते. ताराबाई एके ठिकाणी म्हणतात- 'लोकपरंपरेतील स्त्री कायमच कालसंवादी राहत आलेली आहे. सुख-दुःख, आनंद-असमाधान, वेदना-विद्रोह हे सारेच भाव लोकपरंपरेतील स्त्री व्यक्त करीत आली आहे. परंतु कालौघात आदिम स्त्रीसत्ताकाच्या खुणा पुसून तर टाकल्या गेल्याच, पण अनेकदा त्याच प्रथांची-कथांची स्त्रीला परवश करणारी मांडणी केली गेली. कधी भय दाखवून, तर कधी गौरवाचा मुलामा देत. म्हणूनच संपूर्ण संस्कृतीच्या प्रवाहात-प्रवासात दिसणाऱ्या स्त्रीच्या खुणाच शोधण्याचा प्रयत्न मी आजवर करीत आले आहे.'




लोकसाहित्याची अशी स्त्रीवादी अंगाने प्रथमच मांडणी केली गेल्यामुळेच ताराबाईंचं या अभ्यासक्षेत्रातील काम विशेष दखल घेण्यायोग्य आहे. अलीकडेच त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या 'सीतायन' या पुस्तकाने त्यांची ही स्त्रीवादी मांडणी अधिकच अधोरेखित झालेली आहे. अभिजात परंपरेने रामायणाचा स्वीकार केलेला असताना लोकपरंपरेतील स्त्रीच्या मनात मात्र 'सीतायन'च कसं आहे ते त्यांनी लोकपरंपरेतील लोकरामायणांच्या आधारे या पुस्तकात सिद्ध केलं आहे.

अर्थात ताराबाईंनी केवळ लोकसाहित्य वा लोकसंस्कृतीबद्दलच लेखन केलंय असं नाही. कथालेखन, ललितलेखन, विनोदीलेखन असं त्यांनी विपुल लेखन केलं आहे. त्यांची सुमारे पंचेचाळीसेक पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत. त्यातही त्यांचा एक अलक्षित राहिलेला पैलू म्हणजे, त्या उत्तम अनुवादकही आहेत. प्रसिद्ध दिवंगत हिंदी कवी हरिवंशराय बच्चन यांच्या 'मधुशाला' या कवितासंग्रहाचा त्यांनी उत्तम मराठी अनुवाद केलेला आहे आणि तो प्रकाशितही झालेला आहे. मात्र असं विविधांगी लेखन ताराबाईंनी केलेलं असलं तरी त्यांची खरी ओळख लोकसाहित्य-लोकसंस्कृतीच्या भाष्यकार अशीच मराठी जनमानसात रुजलेली आहे. कारण त्यांच्या प्रकाशित साहित्यावर नजर टाकली तर त्यांची 'यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा', 'लोकनागर रंगभूमी', 'मिथक आणि नाटक', 'लोकसंचित', 'लोकसाहित्यातील स्त्रीप्रतिमा', 'स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर', 'लोकसाहित्य वाङ्मयप्रवाह', 'मायवाटेचा मागोवा', 'लोकपरंपरा आणि स्त्री-प्रतिभा', 'पायवाटेची रंगरूपे', 'लोकांगण', 'लोकसाहित्याच्या अभ्यास दिशा', 'मातीची रूपे', 'लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा', 'कथा जुनी तरी नवी', 'मुक्ती








मार्गाच्या प्रवासिनी’ आणि ‘महामाया’ (रा. चिं. ढेरे यांच्यासह) ही लोकसाहित्य-लोकसंस्कृतीवर मूलगामी प्रकाशझोत टाकणारी पुस्तकं पटकन नजरेत भरतात. संस्कृतीचं उत्खनन आणि विश्लेषण हा ताराबाईंचा स्थायिभाव आहे. महाराष्ट्र फाऊंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार हा एकप्रकारे डॉ. तारा भवाळकर यांच्या अशा विलक्षण आणि विचक्षण अभ्यासवृत्ती-संशोधनवृत्तीला दाद देणाराच आहे. तसंच ताराबाईंचा हा गौरव म्हणजे लक्ष्यार्थाने लोकसाहित्य-लोकसंस्कृतीचा गौरव आहे नि ताराबाईंच्या औडकचौडक जगण्याचाही!

या पुरस्काराने ताराबाईंना नक्कीच आनंद झाला असेल; तसा तो त्यांच्या चाहत्यांनाही झालेला आहे. अन् तरीही ताराबाईंसाठी कोणत्याही पुरस्काराच्या दशांगुळे वर असलेल्या एका पुरस्काराचा उल्लेख इथे केल्याशिवाय राहवत नाही. व्यवसायाने घरात कुलकर्णीपण असल्यामुळे ताराबाईंच्या घरातल्या सगळ्यांचंच आडनाव कुलकर्णी आहे. फक्त ताराबाईच एकमेव ज्यांचं आडनाव भवाळकर आहे. कारण पहिल्यांदा शाळेत नाव घालताना त्यांचं नाव तारा भवाळकर असं घातलं गेलं. आपण आता कुलकर्णीपण करत नाही तर ते आडनाव कशाला लावा, असं बाईंच्या शाळाप्रवेशाच्या वेळी त्यांच्या काकाच्या मनात आलं. म्हणून त्याने ताराबाईंच्या नावापुढे भवाळकर हे आपलं मूळ आडनाव लावलं. मात्र कालांतराने इतर मुलांच्या शाळाप्रवेशाच्या वेळी या गोष्टीचं विस्मरण झालं आणि बाकीची सगळी भावंडं-कुटुंबीय कुलकर्णीच राहिले. साहजिकच ताराबाईंची आई देखील कुलकर्णी हेच आडनाव लावायची. पण पुढे कधी तरी वयाची पन्नाशी उलटल्यावर थोरल्या लेकीच्या म्हणजेच ताराबाईंच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटून त्यांच्या आईने आपल्या कुलकर्णी आडनावाऐवजी भवाळकर आडनाव लावायला सुरुवात केली. आज वडिलांऐवजी किंवा त्यांच्यासोबत आपल्या आईचंही नाव लिहिणाऱ्यांची कमी नाही, पण मुलीचं नाव आईने लावण्याचं हे बहुधा एकमेव उदाहरण असावं! ताराबाई अखंड लोकसाहित्यातील मातृसंस्कृतीचा-स्त्रीसंस्कृतीचा गौरव करतात. आईने आपल्या लेकीचं नाव लावावं यापेक्षा स्त्री-त्वाचा महान गौरव दुसरा कुठला असू शकतो?

mukundkule@gmail.com
Mob. 9769982424

डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार

# संवाद
## ‘अर्जक संघा’चे राष्ट्रीय अध्यक्ष शिवकुमार भारती यांच्याशी

□

संवादक : राहुल थोरात



*उत्तर प्रदेशमध्ये महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रामास्वामी पेरियार, संत कबीर यांचे समतावादी विचार रुजवण्यासाठी डॉ. राममनोहर लोहिया यांच्या सोशालिस्ट पार्टीचे अर्थमंत्री असलेले रामस्वरूप वर्मा यांनी 'अर्जक संघ' या सामाजिक संघटनेची स्थापना १ जून १९६८ रोजी लखनऊ येथे केली.*

**तुम्हाला 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' मिळाल्याबद्दल सुरुवातीलाच आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो.**

धन्यवाद. महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेने मला डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार दिला आहे. त्याबद्दल मी फाउंडेशनचे आणि पुरस्कार निवड समितीचे मन:पूर्वक आभार मानतो. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नावाने मला पुरस्कृत करणे हा माझा महाराष्ट्राच्या मातीने केलेला सन्मान आहे. तो मी नम्रपणे स्वीकारत आहे.

**तुमच्याविषयी मराठी वाचकाला फारशी माहिती नाही तेव्हा...**

मी शिवकुमार भारती. 'अर्जक संघा'चा राष्ट्रीय अध्यक्ष आहे. उत्तर प्रदेशमधील कानपूर या ऐतिहासिक शहरात सध्या राहतो. माझा जन्म एका समाजवादी पित्याच्या पोटी झाला. माझे वडील शिवनारायण कटियार हे डॉ. राममनोहर लोहिया यांच्यासोबत काम करत होते. ते लोहियाजींच्या उत्तर प्रदेश सोशालिस्ट पार्टीचे पूर्णवेळ कार्यकर्ते होते. त्यामुळे समाजवादी विचारांच्या वातावरणातच माझे बालपण गेले. मी हिंदी भाषेमध्ये पदवीधर झाल्यानंतर माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी पत्करली. मी विद्यार्थी असतानाच 'अर्जक संघा'शी जोडला गेलो. बहुजनांच्या सांस्कृतिक उत्थानासाठी काम करणारी उत्तर भारतातील 'अर्जक संघ' ही एक सत्यशोधक चळवळ आहे. ५५ वर्षांपासून उत्तर भारतात सत्यशोधक, पुरोगामी, विज्ञानवादी विचार रुजवण्यामध्ये 'अर्जक संघा'ची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

माझा हा पुरस्कार म्हणजे 'अर्जक संघा'च्या कामाचा सन्मान आहे असे मी समजतो. या पुरस्काराच्या निमित्ताने महाराष्ट्राला 'अर्जक संघा'ची ओळख व्हावी म्हणून मी आपणास विनंती करतो की माझ्या वैयक्तिक ओळखीपेक्षा मी काम करत असलेल्या आणि ज्या संघटनेने मला घडवलं त्या संघटनेची म्हणजेच 'अर्जक संघा'ची ओळख आपण या मुलाखतीच्या द्वारे महाराष्ट्रातील वाचकांना करून द्यावी.

**आपण ज्या 'अर्जक संघा'चे राष्ट्रीय अध्यक्ष आहात, त्या 'अर्जक संघा'विषयी थोडी माहिती सांगा.**

अर्जक म्हणजे अर्जन करणारा- कष्ट करणारा श्रमिक. अर्जक म्हणजे मजुरी किंवा श्रम करणारे




लोक. 'अर्जक संघा'चा सदस्य ब्राह्मणी संस्कृती नष्ट करून समतेवर आधारित मानववादाची प्रतिष्ठापना करून जात-वर्णविरहित संस्कृतीची स्थापना करू इच्छितो. अर्जक सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषणाला कारणीभूत असणाऱ्या श्रद्धा आणि प्रथा नाकारतो; विवाह आणि मृत्युसमयी ब्राह्मणाला बोलावत नाही. अर्जक जानव्याला उच्च वर्णाचे नव्हे, तर गुलामीचे प्रतीक मानतो. आदर दर्शविण्यासाठी ब्राह्मण व इतरांच्या पायाला स्पर्श करण्यास विरोध करतो.

उत्तर प्रदेशमध्ये महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रामास्वामी पेरियार, संत कबीर यांचे समतावादी विचार रुजवण्यासाठी डॉ. राममनोहर लोहिया यांच्या सोशालिस्ट पार्टीचे अर्थमंत्री असलेले रामस्वरूप वर्मा यांनी 'अर्जक संघ' या सामाजिक संघटनेची स्थापना १ जून १९६८ रोजी लखनऊ येथे केली. रामस्वरूप वर्मा हे लोहिया यांच्यासोबत राजकारणात काम करत होते, परंतु लोहियांची 'जितनी संभव हो सके उतनी समता' आणि वर्माजींची 'संपूर्ण समता' या मुद्द्यावर वाद-संवाद होऊन समाजात संपूर्ण समता स्थापनेच्या उद्देशाने वर्माजींनी 'अर्जक संघ' ही सांस्कृतिक-सामाजिक संघटना सुरू केली.

**देश नीतियों से चलता है नेताओं से नहीं -**
**चौ. महाराज सिंह भारती**

सध्या उत्तर प्रदेशात 'अर्जक संघा'च्या ५० शाखा कार्यरत आहेत. तसेच १३००० सभासद आहेत. 'अर्जक संघा'च्या प्रकाशन विभागाच्या वतीने ५० पेक्षा जास्त ग्रंथांची निर्मिती केली आहे. 'अर्जक' साप्ताहिकाचे दीड हजार वर्गणीदार आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाना, दिल्ली या राज्यातही 'अर्जक संघा'च्या शाखा कार्यरत आहेत.

**तुमच्या संघटनेचा प्रमुख कार्यक्रम कोणता?**

आमच्या संघटनेचे तीन कार्यक्रम आहेत.

पहिला कार्यक्रम - सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे. आमची घोषणा आहे - 'राष्ट्रपतीका बेटा हो या चपरासीकी संतान - सबकी शिक्षा एक समान।' दुसरा कार्यक्रम आहे - अर्जकाला म्हणजे कष्ट करून जगणाऱ्याला सन्मान मिळावा, उचित मेहनताना मिळावा. म्हणून आमची घोषणा.

ही शपथ घेतल्यानंतर विवाह संपन्न होतो. 'अर्जक संघा'च्या वतीने लग्न झाल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. गेल्या ५५ वर्षांत उत्तर भारतात 'अर्जक संघा'ने असे हजारो विवाह लावले आहेत.

'अर्जक संघा'च्या स्थापनेनंतर १९६८ साली कानपूरमध्ये माझा पहिला विवाह अर्जक पद्धतीने झाला. त्या वेळी धार्मिक लोकांनी मोठा कोलहल केला. हा विवाह धर्मानुसार नाही, म्हणून आम्ही अजून वधूवरांना कुंवारीच मानतो असा प्रचार ते करू लागले. पण आज या विवाहांना समाजमान्यता मिळत आहे. मागील चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशचे एक आय.ए.एस. अधिकारी हिमांशू सिंग यांनी स्वत:चा विवाह अर्जक पद्धतीने केला होता. 'अर्जक संघा'चे कार्यकर्ते आपल्या मुला-मुलींचे, आपल्या नात्यातील मुला-मुलींचे विवाह अर्जात पद्धतीनेच करण्यासाठी पुढाकार घेतात. मृत्यूनंतरच्या कर्मकांडांनाही 'अर्जक संघ' असाच ठामपणे विरोध करत आलेला आहे.



अर्जक पद्धतीने लग्न




**आपण कानपूरमध्ये मनुस्मृती ग्रंथ दहन सत्याग्रह केला होता, त्याविषयी सांगा.**

'मनुस्मृती'मध्ये स्त्रिया आणि शूद्रांना अपमानकारक कायदे सांगितले आहेत. धन, ज्ञान आणि मानापासून त्यांना वंचित ठेवले आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रामध्ये 'मनुस्मृती'चे दहन केले. हीच प्रेरणा घेऊन आम्ही उत्तर भारतात 'अर्जक संघा'च्या वतीने मनुस्मृतीच्या दहनाचे शेकडो कार्यक्रम आयोजित केले होते.

पोलिसांच्या तीस-तीस पलटणी बंदोबस्तासाठी असतानाही, अर्जक'च्या सात कार्यकर्त्यांनी नियोजित ठिकाणी पोचून 'मनुस्मृती'चे दहन केले. १९६८ची ही गोष्ट. खूप गदारोळ झाला होता तेव्हा. अशाच आणखी एका विषयावर शंबूकावरही आम्ही नाटक केले होते. आणि धर्मांध लोकांचा विरोध असतानाही ते सादर केले. त्यावेळी मला माध्यमिक शिक्षकाच्या नोकरीवरून सस्पेंड करण्यात आले. पाच वर्षे न्यायालयीन लढाई लढल्यावर मला पुन्हा नोकरीत सामावून घेतले गेले. 'नाटकं करतात' या कारणाने मला वीस वेळा अटकही झाली आहे. माझ्यावर अनेक वेळा हिंसक हल्ले केले गेले. एकदा तर कलाकार आत असताना पेट्रोल टाकून नाटकाचा कापडी मंडप जाळला. कलाकार कसेतरी बाहेर पडले; पण त्यांच्या अंगावरचे कपडेही जळले होते. मंडप जाळणारा नंतर धर्मांध पक्षाचा आमदार बनला.

**'अर्जक संघ' समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याचे काम करतो त्याविषयी सांगाल का?**

आम्ही 'अर्जक संघा'च्या वतीने समाजातील अनिष्ट रूढी-परंपरा, घातक अंधश्रद्धा यांच्याविषयी नेहमी बोलत असतो. अंधश्रद्धा जेथे असतात तेथे प्रत्यक्ष जाऊन प्रबोधन विरोध करत असतो.




गोपालपूर या गावातील माझ्या नात्यातील एका मुलीला भूत लागले आहे म्हणून एक ओझा (देवऋषी) तिच्यावर अघोरी उपचार करत होता. तुमच्या मुलीला चुडेलने घेरले आहे असे सांगून कुटुंबाला भीती घालत होता. जेव्हा हे मला समजले तेव्हा मी 'अर्जक संघा'च्या कार्यकर्त्यांच्या सोबत आमच्या या नातेवाइकांची भेट घेऊन त्यांना या सर्व अंधश्रद्धेविषयी कल्पना देऊन त्यांचे प्रबोधन केले. त्या ओझाला बोलवून त्याची उलट तपासणी घेतली. आम्ही सोबत जाताना एक डॉक्टरही घेऊन गेलो होतो. डॉक्टरांनी या मुलीला मानसिक आजार असल्याचे निदान केले. आम्ही त्या मुलीला कानपूरला घेऊन आलो, तिला एका मानसोपचारतज्ज्ञाला दाखवले. नियमित उपचार घेतल्यामुळे ती मुलगी आता सध्या व्यवस्थित आहे. 'अर्जक संघा'च्या अशाच एका प्रयत्नामुळे पुनर्जन्माच्या एका भाकड कथेचाही आम्ही खोटारडेपणा उघडकीस आणला.

**ज्यांच्यामुळे उत्तर भारतात पुरोगामी विचारांचे बीज पेरले गेले त्या 'अर्जक संघा'च्या प्रमुख नेत्यांचा परिचय करून द्याल का?**

१) संस्थापक रामस्वरूप वर्माजी : १९६८ साली 'अर्जक संघा'ची स्थापना रामस्वरूप वर्मा यांनी केली. एम.ए. एलएल.बी. झाल्यावर त्यांनी आय.ए.एस. परीक्षाही पास केली; पण प्रशासकीय नोकरी केली नाही. राममनोहर लोहियांच्या संपर्कात येऊन ते समाजवादी बनले. आमदार झाले.

**सौ में नब्बे शोषित हैं शोषितो ने ललकारा है**
**धन धरती और राजपाठ में नब्बे भाग हमारा है**
**दस का शासन नब्बे पर नहीं चलेगा नहीं**
**चलेगा - भारत लेनिन जगदेव बाबू**

१९६७ च्या चौधरी चरणसिंह यांच्या संविदा सरकारात अर्थमंत्री झाले. उच्च-नीचता, विषमता आणि धार्मिक पाखंड अशा खातेऱ्यात सामान्य जन पिचत असलेले पाहून त्यांनी 'अर्जक संघा'ची स्थापना केली. ब्राह्मण्यवादाला मूठमाती आणि मानववादी समाजनिर्मिती हे त्यांनी ध्येय ठेवले. वर्माजी भौतिकवादी होते. सृष्टी निर्माण करणारी किंवा चालवणारी कोणी बाह्य शक्ती नाही. सृष्टी स्वयंभू आहे, ही 'अर्जक'ची तत्त्वे आहेत. प्रत्येक पदार्थ गतिशील असून तो निसर्ग-नियमांनी बद्ध आहे. मानवी विकासासाठी उत्पादन आवश्यक असून ते श्रमाद्वारेच होऊ शकते. म्हणून शारीरिक श्रम श्रेष्ठ आहेत. ते म्हणत - 'जानो तब मानो।' समजून घ्या; मगच विश्वास ठेवा. तर्कशक्ती न वापरणे म्हणजे आत्महत्या होय. आपले विचार त्यांनी वीसभर पुस्तके लिहून मांडले आहेत. 'क्रांती क्यो और कैसे?', 'मानवतावाद बनाय ब्राह्मणवाद', 'ब्राह्मण महिमा क्यों और कैसे?', 'मनुस्मृती राष्ट्र का कलंक', 'अद्‌भुत समस्या और समाधान', 'आत्मा का मिथ्यत्व', 'अर्जक संघ, राजनीतिक विकल्प' इ. वर्माजींना 'अर्जक'चे कबीर म्हणतात.

२) चौधरी महाराजसिंग भारतीजी : महाराजसिंह भारती 'अर्जक'चे एक महत्त्वाचे नेते होते. त्यांचा जन्मदिवस १ नोव्हेंबर 'अर्जक संघा'तर्फे विज्ञानदिन म्हणून साजरा केला जातो. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले; पण विज्ञान आणि शेतीवरील इतके ग्रंथ त्यांनी वाचले की, ते त्यातील तज्ज्ञ मानले जाऊ लागले. १९५२ साली ते राम मनोहर लोहियांच्या बरोबर 'सोशालिस्ट पार्टी'त सामील झाले. १९६२ साली ते आमदार बनले. नंतर ते खासदार बनले. 'सृष्टी और प्रलय' हा मानवी उत्क्रांतीचा माहिती सांगणारा त्यांचा ग्रंथ खूपच गाजला आहे. तसेच 'ईश्वर की खोज', 'पाप और पुण्य', त्याशिवाय 'समाजवाद, ब्राह्मणवाद की शवपरीक्षा', 'नारी-उत्थान और पतन' अशी सुमारे १५ पुस्तके लिहिली आहेत.

३) बिहार लेनिन : बाबू जगदेव प्रसाद : शहीद जगदेव बाबू कुशवाह हे बिहारचे लेनिन म्हणून प्रसिद्ध आहेत. ते म्हणत - देशात ९० टक्के लोक शोषित आहेत, त्यांच्यावर १० टक्क्यांचे

**'अर्जक संघा'चे चार संस्थापक**



रामस्वरूप वर्मा | चौधरी महाराजसिंग भारती | ललईसिंग यादव | शहीद जगदेव बाबू कुशवाह

राज्य चालणार नाही. जगदेवबाबू जाहीर सभेत भाषण करत असताना पोलिसांनी त्यांच्या मानेमध्ये गोळी घातली, जखमी अवस्थेत फरफटत पोलीस स्टेशनमध्ये नेले, त्यांना पाणीही दिले नाही. प्रेत गायब करण्याचा प्रयत्न केला; पण जनक्षोभाच्या परिणामी, त्यांचे शव लोकांच्या स्वाधीन करावे लागले. ही १९७४ सालची घटना आहे. बाबू जगदेवसिंह मारले गेले; पण अर्जक विचार पसरत गेला. त्यांच्यामुळेच बिहारमध्ये आजपर्यंत ब्राह्मण मुख्यमंत्री होऊ शकला नाही.




४) पेरियार ललईसिंग यादव :

ब्राह्मण्यवाद्यांना सर्वांत मोठा विरोध महाराष्ट्रात सत्यशोधकांनी व ब्राह्मणेतर चळवळीने केला, तसा दक्षिणेत रामस्वामी पेरियार यांनी जस्टीस पार्टी काढून केला. मंदिरासमोरून जायला दलितांना परवानगी नव्हती, त्या विरोधात पेरियारनी केलेला वायकोम सत्याग्रह प्रसिद्ध आहे. त्यांनी केलेल्या प्रबोधनातून पुढे 'द्रविड मुन्येत्र कळघम' पक्ष उभा राहिला. पेरियार यांनी 'ट्रु रामायन' पुस्तक लिहून रामायणावर प्रकाश टाकला. रामायणात उत्तर भारतीय आर्यांना महत्त्व असून दक्षिणेतील द्रविडांना अपमानित करण्यात आल्याचे दाखले त्यांनी दिले. ललईसिंग यादव यांनी पेरियार यांची परवानगी घेऊन १९६८ साली 'ट्रु रामायन'चे हिंदीत भाषांतर केले 'सच्ची रामायण'. ते प्रसिद्ध होताच उत्तर प्रदेशमध्ये खळबळ माजली. शासनाने त्यावर बंदी आणून पुस्तकाच्या प्रती जप्त केल्या. तीन वर्षे खटला चालला आणि ललईसिंग यांनी खर्चासह न्यायालयाची लढाई जिंकली. पुस्तक मुक्त झाले. १९७४ साली पेरियार यांचे निधन झाले. त्यांच्या शोकसभेत भाषण ऐकून जमलेल्या लाखो जनतेसमोर ललईसिंगना 'उत्तरेतील पेरियार' म्हणून गौरविण्यात आले. ललईसिंग यादव 'पेरियार ललई' बनले आणि 'हिस्ट्री रिपीट्स इटसेल्फ' या म्हणीचा प्रत्यय आला. पेरियार ललईसिंग यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशात 'मनुस्मृती' आणि रामचरितमानस' जाळण्याचा सत्याग्रह झाला. पुढे ललईसिंग यादव बौद्ध बनले. त्यांनी धार्मिक गुलामगिरी विरोधात आवाज उठविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथावर तत्कालीन उत्तर प्रदेश

**देश नीतियों से चलता है नेताओं से नहीं - चौ. महाराज सिंह भारती**




सरकारने बंदी घातली होती, त्या विरोधात ललईसिंग यांनी आवाज उठविला. ते हायकोर्टात गेले. खटला जिंकून आंबेडकरांच्या ग्रंथावरील बंदी उठविली.

उत्तर भारतात 'अर्जक संघा'च्या कामाला कसे आणि किती यश मिळाले? 'अर्जक संघा'चे यश सांगताना असे म्हणावे लागेल की, 'अर्जक संघा'ने ब्राह्मण्यवादाच्या मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न केला आहे. दहा राज्यांमध्ये अनुयायी-कार्यकर्ते उभे केले आहेत. तन, मन आणि धनाने प्रचार करण्याचा संस्कार त्यांना दिला आहे. संघटना उभी करण्यातही आम्हांस यश मिळाले आहे. विचार-आचार-संस्कार आणि त्यौहार अशा चार मार्गांनी आमची वाटचाल सुरू आहे. उत्तर प्रदेशातील लोक पाप-पुण्य, आत्मा-परमात्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक या कल्पनांत गुरफटून पुरोहितालाच देव मानतात; खाण्या-पिण्यात, उठण्या-बसण्यात विषमतेने वागतात, गुलाम म्हणूनच आयुष्य काढतात, त्यातून मुक्ती मिळवणे हेच खरे स्वातंत्र्य आहे.

उत्तर भारतात अर्जक विचार घेऊन राजकारणात पुढे आलेले अनेक नेते आज दिसतात. काही पक्षांनीही हा विचार पाया म्हणून स्वीकारला. मंडल आयोगाची पार्श्वभूमी तयार होण्यातही 'अर्जक संघा'चा वाटा होता. सर्वांना सामावून घेता येईल, असा सणांचा पर्याय 'अर्जक संघा'ने दिला. शूद्रांना ताठ मानेने उभे राहता येईल, असे तत्त्वज्ञान दिले, आत्मविश्वास दिला. पन्नास वर्षांत अनेक लहान-मोठ्या संघटना वाढल्या आणि लयाला गेल्या; पण 'अर्जक संघा'चे काम अव्याहत सुरू आहे. 'अर्जक संघा'ने आत्मा-परमात्मा, ईश्वर, पुनर्जन्म, पाप-पुण्य नाकारून जाहीरपणे नास्तिकवादाचा पुरस्कार केला आहे; धार्मिक आणि पौराणिक ग्रंथांचे पुनर्मूल्यांकन सुरू केले.

'अर्जक संघा'ने वैज्ञानिक दृष्टिकोन आणि भारतीय संविधान जनतेपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. देशात वर्ग संघर्षापूर्वी वर्णसंघर्ष आवश्यक आहे, याची जाणीव वाढवली.

संवादक - राहुल थोरात
सांगली. मो. ९४२२४११८६२
(राहुल थोरात हे 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रा'चे संपादक आहेत.)

ग्रंथ पुरस्कार (ललित)

## काम तमाम @ वाघा बॉर्डर

# सतीश तांबे
# एक ‘नैतिक’ लेखक

□

हेमंत कर्णिक



*सतीश तांबे हा एकूण चिंतनशील प्राणी आहे. तत्त्व आणि व्यवहार यांना वेगळं ठेवून जगणारा नाही. याबरोबर जगतानाचा एकही क्षण तो गाफील नसतो. आणि त्याच्या विचक्षण नजरेतून कोणीच व काहीच सुटत नाही.*

सतीश तांबे याला मी अनेक वर्षं जवळून ओळखतो. त्यामुळे कथालेखक असण्याच्या पलीकडे तो बराच काही आहे, हे जसं मला माहीत आहे; तसंच तो कथालेखक आहे म्हणजे काय आहे, हेसुद्धा मला थोडं जास्त माहीत आहे.

सतीश तांबेला त्याचे मित्र 'बाबा' म्हणून ओळखतात. मुळात तो कविता करायचा. 'छापल्या कविता' हे त्याचं प्रसिद्ध झालेलं पहिलं पुस्तक. शब्दांच्या अर्था-आशयाबरोबर शब्दाचा नाद, त्याचं रूप, त्याचं इतर शब्दांशी असलेलं नातं, या सगळ्याची त्याला चांगली जाण आहे. स्वत: कविता करण्याबरोबर नाव झालेले आणि उमेदवारी करणारे अशा सगळ्या कवींची त्याला माहिती असते. कोण कुठे काय कविता लिहीत आहे, यावर त्याचं लक्ष तर असतंच; त्याला जोडून लक्षणीय वाटणाऱ्या कवितेकडे इतरांचं लक्ष वेधून घेण्याचं काम तो निष्ठेने करत असतो. 'अक्षर' या आमच्या दिवाळी अंकासाठी कितीतरी वर्षं तोच कविता निवडत असे. नंतर कविता या घाटाशी आपली अभिव्यक्ती नीटशी जुळत नाही, असं वाटल्यामुळे की काय, त्याने रस्ता बदलला आणि कथा लिहू लागला.

गेली अनेक वर्षं 'अक्षर'मध्ये दर वर्षी त्याची कथा असते, हेसुद्धा नमूद करायला हवं. आज मराठी जगत त्याला कथालेखक म्हणून ओळखतं. त्याचे आजवर सातेक कथासंग्रह आले आहेत आणि आणखी तीन संग्रहांचा ऐवज तयार आहे. त्याने लिहिलेल्या कथांची संख्या सत्तरच्या आसपास असावी. तो गेली चाळीसेक वर्षं कथालेखन करत आहे, हे लक्षात घेता ही संख्या मोठी नाही. पण म्हणजेच तो कथा 'पाडत' नाही, मागणीनुसार पुरवठा करत नाही, दिवाळी अंकांना रतीब घालण्यासाठी कथा लिहीत नाही, हेसुद्धा यातून दिसून येतं. त्याच्या कथा वाचल्या, तर त्यांचा कुठला साचा नाही आणि लक्षवेधक किंवा वैशिष्ट्यपूर्ण पात्र रंगवण्याच्या उद्देशाने अथवा चटकदार घटना-प्रसंग सांगण्यासाठी त्याची कथा नसते, हे कुणीही सांगू शकेल. मी त्यात थोडी भर घालू शकतो कारण त्याच्या कथानिर्मितीची प्रोसेस मला थोडीफार माहीत आहे.

तो इंग्रजी काहीही वाचत नाही, फेस्टिवलचे सिनेमे बघत नाही, त्याने अजून पासपोर्टही काढलेला नाही; म्हणजे तो अशी कुठून 'बाहेरून' स्फूर्ती, प्रेरणा घेऊन लिहीत नाही, हे उघड आहे. आसपास काहीतरी घडतं आणि त्यातून बाबाला काहीतरी जाणवतं. घडणारं थेट त्याच्या स्वत:च्या आयुष्याशी निगडित असू शकतं किंवा त्याचं स्वरूप वर्तमानपत्रातली बातमी, असंही असू शकतं. त्याला त्यात काहीतरी नैतिक मुद्दा जाणवतो. हा नैतिक मुद्दा ईसापनीतीतल्या किंवा पंचतंत्रातल्या बोधकथांमधल्या

तात्पर्यासारखा नसतो. मात्र तो मुद्दा सर्वसाधारण मनुष्याच्या जगण्याला लागू करण्यासारखा असतो. म्हणून जगण्याविषयी सजग असणाऱ्यांसाठी तो लक्षणीय असतो. तो मुद्दा मग बाबा धरून ठेवतो. हे धरून ठेवणं त्याची खासियत आहे. त्याने अशी अनेक निरीक्षणं मला सांगितली आहेत. त्यातून जाणवलेलं सांगितलं आहे. हे धरून ठेवणं कितीही काळ असू शकतं. काही दिवस, महिने, कित्येक वर्षंसुद्धा. त्याच्या मनात ते एखादं फळ पिकावं तसं परिपक्व होतं. यथावकाश त्यातला मुद्दा शब्दांत; किमान पात्रं आणि घटना यांच्या माध्यमात व्यक्त करण्याइतपत स्पष्ट होतो आणि -

आणि बाबाला कथेचं शीर्षक मिळतं! शीर्षक मिळाल्याशिवाय तो कथेला सुरुवात करत नाही; त्याच्या म्हणण्याप्रमाणे करू शकत नाही. कारण त्या शीर्षकातून कथेची दिशा, कथेचा सगळा फोर्स यांची निश्चिती होते. त्यापुढे उरतं ते तपशील भरणं. अर्थात ते करण्यातही भरपूर वेळ आणि कष्ट द्यावे लागतात. मग त्या तपशिलांसाठी तो अभ्यास करेल, वाचेल, कुठे कुठे जाईल, वगैरे. पण कथेचा आत्मा तयार असेल. यातली जादुई गोष्ट अशी, की कथेचं बीज पूर्णपणे फळात रूपांतरित होताना त्याचं मूळ रूप ओळखता येण्यासारखं राहत नाही. सतीश तांबेसाठी कथेचा, फिक्शन लिखाणाचा हा सर्वांत मोठा, सर्वांत मूलभूत असा गाभा आहे. जे घडलेलं असतं, ते संबंधितांच्या जगण्यातल्या मजबुरीतून किंवा परिस्थितीच्या रेट्यामुळे घडलेलं असू शकतं. म्हणून ज्या प्रसंगावरून वा ज्या



व्यक्तीवरून कथा सुचली, त्याची ओळख लागता कामा नये, कारण तो प्रसंग वा ती व्यक्ती महत्त्वाची नसून तेव्हा घडलेल्यातला तो नैतिक मुद्दा महत्त्वाचा आहे, असा त्याचा हट्ट असतो.

या हट्टाला इंटेग्रिटी - सचोटी किंवा आत्मनिष्ठा - म्हणतात. फिक्शन लिहिणारा प्रत्येक जण अनुभव, निरीक्षण आणि चिंतन यांच्या प्रक्रियेमधूनच सर्जन करत असतो. पण अलीकडच्या काळात उठलेल्या 'तपशीलवादी' लाटेत फिक्शन हे अशा प्रकारे मुद्द्याला धरून असणं दुर्मीळ आहे. अनुभवाचं नीतीच्या भिंगामधून निरीक्षण करून, त्यातून तात्त्विक सार काढून तेच तेवढं स्पष्ट करणारा संपूर्ण स्वतंत्र असा प्लॉट कल्पनेतून उभा करण्याचा उपद्व्याप करण्याला आत्मनिष्ठा नक्कीच म्हणता येईल.

याचसाठी तो कादंबरीच्या वाटेला न जाता कथाच लिहीत असावा!

आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी. त्याला जाणवणारा नैतिक मुद्दा 'सुटा' नसतो. तो जगण्याच्या व्यवहारात घट्ट गुंतलेला असतो. त्यामुळे त्याची कथा ऐसपैस होते. निवेदनात खूप काही येतं. ज्याचं काम हा मुद्दा फुलवणं, त्या मुद्द्याला कोंदण देणं हे असतं. अलीकडच्या बऱ्याच कथांमध्ये तपशील हाच आशय असल्याकारणाने त्या दीर्घ, प्रदीर्घ होऊ लागल्या आहेत. बाबाच्या कथा जेव्हा दीर्घ होतात, तेव्हा तसं नसतं.

'काम तमाम @ वाघा बॉर्डर' ही कथा आणि या नावाच्या संग्रहातल्या इतर कथा अशाच आहेत. 'काम तमाम @ वाघा बॉर्डर' या शीर्षककथेत साहित्याचे पुष्कळ संदर्भ येतात. खांडेकर, वपु हे पुलंच्या अल्याडपल्याडचे लेखक, असा उल्लेख येतो. गौरी देशपांड्यांपेक्षा कमल देसाईंचं लिखाण जास्त उधळलेलं वाटतं, असं विधान येतं. हे तपशील भरणं नाही. यातून कथेच्या मुद्द्याकडे थेट निर्देश होतो. पुढच्या 'कुत्तेकी मौत' कथेत मुख्य पात्र मुसलमान आहे. तिथे 'रमजानला देखील बडी नमाज पढला नसेल कधी' असं विधान येतं; पण त्याचा उद्देश केवळ मुसलमानी वातावरण निर्मिती करण्याचा नसतो; तर मुसलमान असणं म्हणजे काय, ही जाणीव करून देणारा, हा मुसलमान कसा वेगळा आहे, हे सांगणाऱ्या तपशिलांचा तो एक भाग असतो. मानवी संबंधांमधला कदाचित सर्वांत महत्त्वाचा भाग

















म्हणजे स्त्री-पुरुष संबंध, हा असावा. बाबाच्या कथेत या संबंधांची सखोल, संवेदनशील, सजग दखल असते. हे संबंध एकरेषीय, एकांगी नसतात; शरीर, मन, सहवास, आवडीनिवडी अशा कितीतरी गोष्टी एकात एक गुंतलेल्या असतात, हे त्याची कथा कधीही विसरत नाही. त्याचा, म्हणजेच त्याच्या निवेदकाचा आणि प्रमुख पात्राचा दृष्टिकोन पुरुषीच असतो, हे मान्य केलं तरी तो बाईची बाजू नीट मांडली जाईल, याची काळजी घेतो. 'करीना माझी व्हायग्रा', 'माझी लाडकी पूतनामावशी' ही शीर्षकं याची साक्ष देण्यासाठी पुरेशी आहेत. 'काम तमाम @ वाघा बॉर्डर' या कथेतला नायक आणि त्याची बायको, यांचा संबंध अवश्य न्याहाळावा.

आसपास काहीतरी घडलं, त्यातून एक बीज मनात रुजलं आणि यथावकाश त्यातून कथा फुलली, या त्याच्या प्रोसेसवरून निश्चित निष्कर्ष निघतो म्हणजे, कथा लिहिणं ही सतीश तांबेसाठी फुटकळ साहित्यनिर्मिती नाही. त्याची कथा म्हणजे त्याला गवसलेल्या माणसाविषयीच्या, माणसांच्या परस्परसंबंधांविषयीच्या 'सत्या'ची ललित मांडणी आहे. त्याच्या कथा वाचून 'सतीश तांबे यांची जीवनदृष्टी' असा निबंध सहज लिहिता येईल. त्याचा 'लेखाजोखा' नावाचा समीक्षापर लेखांचा संग्रहसुद्धा आहे. त्याला जे प्रखरपणे जाणवलं, आणि ते इतर साहित्यप्रेमींच्या लक्षात आणून देणं आवश्यक आहे, असं वाटलं; ते त्याने लिहून काढलं. त्यातलं लिखाण हे सौंदर्यलक्ष्यी नाही; कोणावर किंवा कशावर टीका करण्यापेक्षा, दोषदिग्दर्शन करण्यापेक्षा नैतिकता, याच मुद्याकडे झुकणारं आहे.

नेमस्त आणि अनाग्रही असला, तरी बाबा स्वत:च्या लिखाणाबाबत जागरूक आहे. तसंच साहित्य, कला यांच्या बाबतीत बांधिलकी मानणारा आहे. आम्ही तीन मित्रांनी मिळून 'आजचा चार्वाक' हे दिवाळी वार्षिक सुरू केलं, ती कल्पना त्याची. अंकाचं स्वरूप ठरवण्यात पुढाकार त्याचाच. संपूर्ण अंकामधून काही एक भूमिका प्रक्षेपित व्हावी, या दृष्टीतून आम्ही मग एकाच कवीच्या कविता निवडणं, कलेकडे चौकसपणे पाहील असा विशेष विभाग योजणं, असले प्रकार केले. चार्वाकच्या प्रत्येक अंकाचं मुखपृष्ठ प्रभाकर बर्वे ते अतुल दोडिया ते वासुदेव गायतोंडे, अशा आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या चित्रकाराचं

आहे आणि त्यात त्या मुखपृष्ठाविषयी, चित्रकाराविषयी टिपण आहे. अंक काढण्यामागची गंभीर भूमिका आणि बाबाबरोबर काम करण्याची संधी, यांच्यामुळे बाकी बरीच मित्रमंडळी उत्साहाने त्यात सामील झाली.

चार्वाकचं स्वरूप बहुतांश त्याने ठरवलं. एकदा ठरवल्यावर त्याला अनुसरून जे करायचं ते आम्ही इतरांनी केलं. पण स्वत: संपादक असलेल्या अंकात लिहायचं नाही, हे पथ्य त्याने कटाक्षाने पाळलं. पुढे आम्ही लहान मुलांसाठी 'अबब हत्ती' हे मासिक सुरू केलं, ती कल्पनासुद्धा त्याचीच. आणि या उद्योगात सर्वांत जास्त खोट सोसणारादेखील तोच. आजसुद्धा आम्ही काही मित्र 'सजग' हे केवळ समीक्षासम लिखाणाला वाहिलेलं त्रैमासिक काढण्याचा प्रयास करतो आहोत, तर त्यात सर्वांत जास्त लक्ष तोच घालतो आहे.

'चार्वाक' आणि 'हत्ती' या अंकांच्या निमित्ताने त्याचा एक गुण समोर आला; तो म्हणजे तो एक उत्तम नेता आहे. त्याच्या अनाग्रही पद्धतीने तो इतरांना भरपूर काम करण्यासाठी प्रवृत्त करू शकतो. त्याचं एकूण शांत व्यक्तिमत्त्व, कधीही न चढणारा आवाज, मर्यादा न ओलांडणारी त्याची भाषा (आणि त्याची दाढी!) यांच्यामुळे त्याला एक भारदस्तपणा मिळतो आणि असा भारदस्त माणूस आपल्याशी इतक्या मोकळेपणाने वागतो-बोलतो आहे, याने भारावून जाणाऱ्यांना त्याच्यासाठी काम करण्यात आनंद मिळतो!

अर्थातच तो आपला मित्र आहे, असं वाटणारे जगात पुष्कळ, म्हणजे पुष्कळच आहेत. कारण तो उत्तम श्रोता आहे. बोलण्यापेक्षा ऐकण्यावर त्याचा भर असतो. लोकांच्या बोलण्यातून, मतप्रदर्शनातून त्याला त्याच्या कथांसाठी मालमसाला मिळत असतो. आणि कोणाचं ऐकावं, याला काहीच बंधन नाही. तो खऱ्या अर्थानं 'डी-क्लास' झालेला माणूस आहे. समाजातल्या अत्यंत वरच्या ते अत्यंत खालच्या अशा सर्व वर्गातल्या माणसांना त्याच्याशी संभाषण करायला संकोच वाटत नाही. कारण त्याच्या दिसण्या-वागण्या-बोलण्यात वर्गजाणीव कुठेच सापडत नाही. शिवाय त्याच्या धारणा पक्क्या असल्या,















तरी त्या तुमच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न तो करत नाही. त्याच्या फेसबुक पोस्टी अशाच असतात. इतक्या पक्क्या धारणा असणारा, त्या धारणांनुसार वर्तन करणारा आणि तरीही परक्या धारणांविषयी जराही कडवटपणा न बाळगणारा मनुष्य माझ्या पाहण्यात नाही.

सतीश तांबे हा एकूण चिंतनशील प्राणी आहे. तत्त्व आणि व्यवहार यांना वेगळं ठेवून जगणारा नाही. याबरोबर जगतानाचा एकही क्षण तो गाफील नसतो. आणि त्याच्या विचक्षण नजरेतून कोणीच व काहीच सुटत नाही. त्याचा मित्र होणं, त्याच्या संगतीत राहणं, ही एक प्रकारची परीक्षा असते. असा हा माणूस स्वत:च्या वर्तनाविषयी किती जागरूक असेल! त्याने त्याच्या आयुष्यात खूप पाहिलं-भोगलं आहे. स्वत:च्या धारणांसाठी जे करावं लागेल ते केलं आहे. तात्त्विक भूमिकेचा जराही गाजावाजा न करता स्वत:च्या तत्त्वांची जी पडेल ती किंमत त्याने चुकवलेली आहे. महाराष्ट्र फाउंडेशनचा हा पुरस्कार मिळणे, हा त्याच्या साहित्याचा सन्मान असेल; पण एका माणूस या नात्याने त्याच्या जगण्यात जी आत्मनिष्ठा, जी सचोटी व्यक्त झालेली दिसत आली आहे, त्यामुळे तो मोठा ठरतो. अशा माणसाचं दीर्घ सान्निध्य लाभल्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो.

hemant.karnik@gmail.com
Mob. 9821550498, 9869202157

# शांताराम चव्हाण
# लढवय्याच्या सत्काराचा दुर्मीळ योग

□

अरुण ठाकूर



*स्वत:च्या वाढदिवसाचे मोठे मोठे बॅनर लावून स्वत:ला लोकांच्या माथी मारण्याचा उद्योग न करताही शांतारामभाऊंना रस्त्यावरची माणसं ओळखतात. पोलिसांच्या लेखी ते चिथावणीखोर भाषणे देणारे उपद्रवी माणूस आहेत. गरिबांच्या ओरडण्याचा शांतताप्रेमी नागरिकांना फारच त्रास होतो.*

सिद्धांतांची आठवण सोयीनेच येणाऱ्या व्यावसायिक राजकारण्यांची छायाचित्रे चौकाचौकात मिरवण्याच्या या काळात सिद्धांतांना जीवनाचा आधार समजून जगणारा शांताराम चव्हाण यांच्या सारखा कार्यकर्ता सर्वांनाच गैरसोयीचा वाटतो. अशा कार्यकर्त्याचा पुरस्कार देऊन सत्कार होतो, ही गोष्ट चळवळीतील कार्यकर्त्यांना बळ आणि ऊर्जा देणारी आहे.

रस्त्यावरच्या माणसांचा नेता ही गेल्या काही वर्षांतली शांताराम चव्हाणांची ओळख आहे, ते त्यांचे बिरुदच आहे. 'गरिबी हा शाप नव्हे तो व्यवस्थेचा अपराध आहे, त्याची शिक्षा निरपराध माणसांना होता कामा नये' असे मानणाऱ्या लोकशाही-समाजवादी चळवळीत शांतारामभाऊ वाढले. राष्ट्रसेवा दलाच्या शाखेत ते केवळ खेळ खेळले नाहीत तर सामाजिक न्याय, समता, बंधुता या मूल्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

शांतारामभाऊंचे वडील पांडुरंग ऊर्फ पांडोबा चव्हाण हे प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते होते. नाशकातील चांदवडकर लेनमधील त्यांचे पॉप्युलर हेअर कटिंग सलून हा त्या वेळी सामाजिक व राजकीय चळवळीतील कार्यकर्त्यांचा अड्डा होता. या अड्ड्यात आपोआपच राजकीय शिक्षण होत राहिले. भाऊंचे बालपण असे राजकीय वातावरणातच घडले. गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, यांवरील चर्चा ऐकतच ते मोठे झाले. 'समाजवादी समाजरचना झालीच पाहिजे' हा आग्रही विचार त्यांच्या वडिलांच्या कामाचा पाया होता. या विचारांचा प्रभाव शांतारामभाऊंवर कायम आहे.

पुढे ते एचएएलमध्ये फाईल क्लार्क म्हणून रुजू झाले तरी ते तेथे रमले मात्र नाहीत. त्यांची स्वतंत्र वृत्ती स्वत:ची वाट शोधत होती. त्यातूनच त्यांनी सुखाची नोकरी सोडून प्रिंटिंग प्रेस टाकला. प्रिंटर म्हणून ते चांगले यशस्वी ठरले.

देशात आणीबाणी पुकारण्यात आली तो काळ मुस्कटदाबीला शांतता व धरपकडींना शिस्त म्हणण्याचा, नागरिकांचा श्वास गुदमरविणारा होता. भाऊंनाही स्वस्थ बसवले नाही. गुप्तता बाळगून भूमिगत चळवळीचे साहित्य छापण्याच्या कामात ते गुंतले. वसंत नारगोलकरांचे 'जयप्रकाश जी ने कहा ही था' हे पुस्तक त्यांनी असेच गुपचुप छापले आणि थेट जयप्रकाशजींची भेट घेण्यासाठी अतिशय नाट्यमय घटनांचा सामना करत त्यांच्यापर्यंत पोहचले. पुढे जनता पर्वात नव्या नेतृत्वाचा उदय झाला, त्यात भाऊ आघाडीवर होते. पण जनता पक्ष ही खरोखर एक आघाडी होती. जनता पक्षाची आघाडी




विद्रोही साहित्य संमेलनात जीवनगौरव

फुटताच एकसंधपणे भाजप या नव्या वाटेने जनसंघ चालू लागला. समाजवाद्यांच्या मात्र पार चिरफळ्या उडाल्या.

ऐंशी नंतरचे दशक हा सामाजिक-राजकीय घुसळणीचा काळ होता. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, ग. प्र. प्रधान, बाबा आढाव यांच्यासारखे समाजवादी नेते महाराष्ट्रभर समता, सामाजिक न्याय यांची मांडणी करत होते. बाबा आढावांनी केलेल्या मनुवादाच्या मांडणीने भाऊ प्रभावित झाले व सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन नामांतर आंदोलनात सक्रिय राहिले.

नव्वदच्या दशकातील पुढचा टप्पा होता मंडल आयोगाच्या मागणीचे आंदोलन. नाशिक जिल्ह्यामध्ये मंडल आयोग कृती समितीच्या माध्यमातून शांतारामभाऊ व इतरांनी चळवळ उभी केली. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीने इतर 'मागासवर्गीय' सत्तास्थानापर्यंत पोहोचलेही, पण ते केवळ माळी, धनगर, वंजारी, तेली असे जमीनदारच. ग्रामीण भागातील बलुतेदारी नष्ट झाली या कारणाने गावातून विस्थापित होऊन शहराकडे स्थलांतरित झालेले स्वत:च्या जीवित राहण्याचा हक्क, रोजगार यांच्यासाठी वणवण करायला लागले. स्वत:चा रोजगार स्वत: शोधून, निर्माण करून हा वर्ग स्वयंरोजगारित झाला. हॉकर्स, टपरीवाला, पथारीवाला झाला. भाऊ असंघटितांसाठी पदरमोड करून लढत राहिले. देशभर फेरीवाल्यांच्या प्रश्नावर अनेक संघटना काम करत होत्या, त्यातूनच राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी झाली.

नाशिक शहरातील साधारण २५,०००हून अधिक व्यावसायिकांच्या रोजगाराला भाऊंच्या हॉकर्स



‘हरवलेल्या वाटेवरचा प्रवासी’ आत्मकथेचे प्रकाशन डॉ. बाबा आढाव, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हस्ते. सोबत साथी अरुण ठाकूर.

नेतृत्वाखालील युनियनमुळे संरक्षण मिळाले. प्रस्थापित समाजाने पत नाकारलेल्या, रस्त्यावरील या छोट्या व्यावसायिकांचा प्रश्न गुंतागुंतीचा आहे हे ओळखून यांना पत मिळवून देण्यासाठी २ ऑक्टोबर १९९८ रोजी डॉ. राममनोहर लोहिया नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. व्यावसायिक शिस्त नसलेला वर्ग सोबत घेऊन, पारदर्शकतेने सर्व व्यवहार सांभाळत पतसंस्था आज २५ व्या वर्षात ब दर्जा मिळवून स्वत:च्या मालकीच्या जागेत काम करत आहे.

राजकारणात शांतारामभाऊंनी जॉर्ज फर्नांडिस आणि इतर जहाल वाणीच्या नेत्यांना आपला नेता मानून त्यांच्या निर्णयाशी आपले राजकीय आयुष्य जोडून दिले. वेळ येताच हे पुढारी जातीयवाद्यांशी पाट लावून पळाले तेव्हा मात्र भाऊंनी त्यांना दमदारपणे विरोध केला. समता पार्टीचे नाशकात विसर्जन करून भाऊंनी आपली वाट वेगळी केली. पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. शांतारामभाऊंसारखा असंघटित क्षेत्रातील हॉकर्स-टपरीधारकांचा नेता नाशिकच्या औद्योगिक नगरीत सामर्थ्याने उभा करणे सहज शक्य होते. त्यासाठी फार आर्थिक पाठबळाचीही गरज नव्हती. पण तोपर्यंत समाजवाद्यांच्या कामगार आघाड्या आपले स्वत्वच गमावून बसल्या होत्या. पक्षबळ पाठीशी नसल्याने समाजवादी कार्यकर्त्यांची अवस्था त्रिशंकूसारखी झाली. जनता पक्षाच्या चिंधड्या उडाल्यामुळे सर्वांत जास्त नुकसान शांतारामभाऊंसारख्या प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्त्यांचे झाले. राजकीय आयुष्यच उद्ध्वस्त झाले.

स्वत:च्या वाढदिवसाचे मोठे मोठे बॅनर लावून स्वत:ला लोकांच्या माथी मारण्याचा उद्योग न करताही शांतारामभाऊंना रस्त्यावरची माणसं ओळखतात. पोलिसांच्या लेखी ते चिथावणीखोर भाषणे देणारे उपद्रवी माणूस आहेत. गरिबांच्या ओरडण्याचा शांतताप्रेमी नागरिकांना फारच त्रास होतो. भाऊंनाही खरे तर शांतताच हवी आहे. पण गरिबांची घरे जाळून निर्माण केलेली स्मशानशांतता नको आहे. अन्याय दिसला की ते खवळतातच.




'मधू लिमये कार्यकर्ता गौरव पुरस्कार' भाई वैद्यांच्या हस्ते

२००६ साली गंगाघाटावरील भाजीवाल्यांना शहरातील गुलहौशी सौंदर्यवाद्यांनी लांबवर फेकून द्यायचे ठरविले. १५०वर्षांची परंपरा असलेला बाजार अविवेकी आग्रहाखातर नष्ट होणे हा केवळ गरिबांच्या रोजीरोटीचाच प्रश्न नाही तर शहराच्या सांस्कृतिक हानीचाही प्रश्न आहे असे मानून ते या संघर्षात उतरले. पोलिसांचा मार सोसला, कोर्ट केसेस मागे लागल्या. शेवटी तटस्थ नागरिकांची एक समिती बनवून त्यांनी हा बाजार सुरू करवलाच. मात्र शासनाने स्ट्राइकिंग फोर्सचा वापर करून हे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. मानवी हक्क आयोगाकडे भाऊंनी हे प्रकरण नेले पण तेथेही न्याय मिळत नाही हे लक्षात आल्यावर आपला निषेध बेडरपणे स्पष्ट केला. राजकीय कार्यकर्त्यांवरील केसेस मागे घेण्याचा निर्णय तेव्हाचे गृहमंत्री आर. आर. पाटलांनी जाहीर केला. सोयिस्कर राजकीय हितसंबंधितांवरील केसेस त्वरित मागे घेण्यात आल्या पण भाऊंवरील खोट्या केसेस मागे घेतल्या गेल्या नाहीत. यामुळे ते त्रासले, वैतागले पण जिथे जिथे अन्याय घडला तिथे धावलेच कारण डॉ. लोहियांच्या 'गुस्सा करो' या शिकवणुकीचा त्यांना कधीही विसर पडत नाही. भाऊंसारख्यांचा सात्त्विक संताप ही खरे तर समाजाच्या जिवंतपणाची निशाणी आहे. हा लोभसवाणा संताप ही या थंड समाजाला मिळणारी ऊब आहे. नाही तर सारे निपचित पडून अन्याय सहन करण्यालाच शांतता समजू लागतील!

सार्वजनिक जीवनात इतक्या स्वच्छ चारित्र्याचा माणूस पहायला मिळणेही दुर्मीळ आहे. निवडणुका लढवून उरलेला निधी खिशात घालण्याऐवजी त्यांनी सर्व हिशोब जाहीर मांडून उरलेले पैसे राष्ट्र सेवादलाला देऊन टाकले.


2 लाखांत,
हक्काच्या
घरात.
गंगापूर रोड


विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा, मंडल आयोग अंमलबजावणी चळवळ, भंगार व्यापारी युनियन, भंगार वेचक महिलांचे रक्षण, शेतकरी आंदोलन, पोलिसांशी-प्रशासनाशी सतत संघर्ष, पतसंस्थेची उभारणी हे सारेच एखाद्या चित्रकथेसारखे भुरळ घालणारे आहे. या राजकीय सामाजिक घटनांचे सखोल तपशील त्यांनी आपल्या 'हरवलेल्या वाटेवरचा प्रवासी' या आत्मकथेत लिहिले आहेत.




आज त्यांचे वय ८० वर्ष आहे. थकवा जाणवतोय. पोलिसांनी केलेल्या लाठीमारामुळे पाय लंगडतो आहे, पण हृदयातील अंगार जागा आहे. जागतिकीकरणाच्या लाटेने आता सर्वच जण भारावलेले आहेत. सेन्सेक्सच्या शिखराकडे नजर लावून चाललेल्या मध्यम व उच्च वर्गाला पायाखाली चिरडल्या जाणाऱ्या कष्टकऱ्यांच्या किंकाळ्या ऐकूही येत नाहीत. त्या ऐकू येऊ नये यासाठी चित्रवाणीचे संच २४ तास सुरू आहेत. एक भ्रामक जाल मॅट्रिक्ससारखे आपल्या भोवताली विणले जाते आहे. अशा वेळी शांताराम चव्हाण मात्र मॅट्रिक्स सिनेमामधील मॉर्फससारखे एकाकीपणे लढत आहेत. वास्तवाची जाणीव करून देणारी लाल गोळी ते आपल्याला खायला लावणारच, कारण त्यांची तर टोपीच लाल आहे!

(स्मृतिशेष साथी अरुण ठाकूर याने लिहिलेल्या लेखांच्या आधारे
संपादन : श्यामला चव्हाण, डॉ. मिलिंद वाघ)

मो. ९४२२६६८३९४ (श्यामला चव्हाण)

ग्रंथ पुरस्कार (वैचारिक/अपारंपरिक)

# डॉ. कालिदास शिंदे
## झोळी : नाथपंथी डवरी गोसावी समाजाचा महत्त्वाचा दस्तऐवज

□

रणधीर शिंदे



*'झोळी' हे डवरी गोसावी समाजातील एका तरुणाच्या शैक्षणिक धडपडीचा प्रवास सांगणारे आत्मकथन. कालिदासची, त्याच्या कुटुंबाची आणि माणदेशातील डवरी समाजाची ही कहाणी. आई-वडील वेगवेगळ्या गावांत आणि दूरवरच्या गावात भिक्षा मागून जीवन जगत. या काळात कालिदासने दिघंची, पेठवडगाव, फलटण, कोल्हापूर व मुंबई येथे शिक्षण घेतले.*

सोलापूर, सातारा, सांगली जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेले दिघंची हे आटपाडी तालुक्यातील शेवटचे गाव. दिघंची गावातून जुन्या काळापासून मल्हारपेठ (कराड)-पंढरपूर हा रस्ता वाहतो. दिघंची हे सामान्यजणांचे व पशुपालकांच्या बाजार आणि व्यापाराचे गाव. अर्थात गजबजलेले नव्हे. गावाचे पूर्वी सुरापूर आणि दिघंची (वरची पेठ खालची पेठ) असे दोन भाग होते. माण नदीकाठी असल्यामुळे पूर्वी भरपूर कलिंगडं पिकत. शेतकरी आणि पशुपालक-मेंढपाळ व इतरही जाती-जमातीचे गाव. यमाई, नाथ व गोयबाची गावात मंदिरे. यात्रा व तमाशासाठी हे प्रसिद्ध गाव होते. गावातील विणकर घोंगडी करत. दिघंची हे औंध संस्थानात होते. बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे या गावावर विशेष लक्ष होते. त्यांच्याच प्रोत्साहनाने १९२८ साली दिघंचीत 'श्री. दिघंची जिनिंग फॅक्टरी' सुरू झाली. पंढरीनाथ पाटील यांच्या फुले चरित्रात (१९२७) दिघंचीस एकोणिसाव्या शतकात गालीप्रदान विधी चालत असल्याची नोंद आहे. उजाड लांबच्या लांब गवताळी माळरानं आणि दरसाल दर दुष्काळ असा हा माणदेश. माण अनेक अनाम भटक्यांचे विसावास्थान. व्यंकटेश माडगूळकर लहानपणी दिघंची यात्रेतील तमाशा फड पहायला जात. प्रसिद्ध आध्यात्मिक तुरेवाले शाहीर बाबाखान दरवेशी हे दिघंचीचे. डफ, तुणतुणे, झांजर, ढोलक आणि पेटीच्या साहाय्याने सामाजिक सहिष्णुतेची शाहिरी बाबाखानने गायिली. व्यंकटेश माडगूळकरांनी या बाबाखान दरवेशीचे अतिशय हृद्य असे व्यक्तिचित्र 'माणदेशी माणसं'मध्ये रेखाटले आहे (१९४९). 'भडक हिरव्या रंगाचा कोसला पटका, रंगीत कापडाची मुंडेछाप पैरण, घोडं, म्हैस, बैल, कुत्रं, अस्वल' घेऊन फिरणाऱ्या बाबाखानचं बोलणं





पदवीदान समारंभ : कालिदास शिंदे, टाटा ट्रस्टचे डॉ. अप्पादुराई

'खडीसाखरेसारखं' असल्याचा उल्लेख माडगूळकरांनी केला आहे. बाबाखानच्या पाच-सहा मुलांना पाहून एक जण विचारतो, 'बाबाखान, चिगोर बराच दिसतोय गड्या.' तर बाबाखान आपलं नेहमीचं हसू तोंडावर आणून म्हणाला, 'असू द्या मायबाप! अल्लाघरचा पानमळा हाय.' अशा बाबाखानचे विलोभनीय असे व्यक्तिचित्र माडगूळकरांनी रेखाटले आहे. पत्रकार व संपादक आल्हाद गोडबोले दिघंचीचे. बाबाखान दरवेशी यांचे शिष्य प्रसिद्ध शाहीर जयवंत दळवी याच गावचे. तर कथा-कादंबरीकार सीताराम सावंत लगतच्या इटक गावचे. 'झोळी'चे लेखक कालिदास शिंदे हे याच गावच्या पालावरील.

२०२१ च्या जुलैमध्ये एकदा कालिदासचा फोन आला. 'मी असे असे एक पुस्तक लिहिले आहे. तुम्ही प्रकाशनला या' म्हणून. १४ ऑगस्ट, २०२१ ला 'झोळी' आत्मकथनाचा प्रकाशन समारंभ कालिदासने लक्ष्मीकांत देशमुख व माझ्या हस्ते त्याच्या पालावर ठेवला होता. १४ तारखेला सकाळी ७ वा कोल्हापूरहून निघालो. कुंडल, विटा, भिऊघाट ओलांडले. आभाळ नुसते ढगांनी झांजरलेले आणि भणभण वारा वाहत होता. दिघंची चौकात आल्यानंतर कालिदासचा पत्ता विचारला. लोक कालिदासचा ठावठिकाणा नीट सांगत नव्हते. कालिदास शिंदे म्हटले की लोक थंडपणाने बघत. इथे या नावाचे कोणी नाहीत असा चेहरा असे. कदाचित लोकांना नीट माहीतही नसावे. डवरी वस्तीवर तो आहे म्हटल्यावर एका वयस्क माणसाने सांगितले, 'त्या तकडं हायस्कूल समूरून जाणाऱ्या रस्त्यावरनं

जावा, ततं खंडोबा आळाला डवऱ्याची पालं आहेत.’ कालिदास रस्त्याच्या कोपऱ्यावर येऊन थांबला होता. तो पालाकडं घेऊन गेला. अलीकडेच त्याने पत्र्याच्या दोन खोल्या बांधल्या होत्या. अवतीभवती एखाद दुसरं घर. त्याचाही या घराशी, पालाशी काही संबंध नव्हता असं वातावरण. पालासमोर थोडे पटांगण, खुरटी झाडं, शेरडं करडं, कुत्री, घोडं, प्लॅस्टिकच्या तीन-चार खुर्च्या आणून ठेवलेल्या. कालिदासचे आई-वडील, भाऊ-भावजय, पत्नीचा वावर आनंदाचा होता. घरातील चिमुकली मुलं नटून-थटून बागडत होती. दरम्यान लक्ष्मीकांत देशमुख आले. पाण्याचे तांबे दिले. चहा झाला. काही पाहुणे आलेले. घरातील स्त्रियांनी आम्हाला ओवाळले. आई-वडील आणि लक्ष्मीकांत देशमुखांच्या हस्ते अनौपचारिकपणे ‘झोळी’चे पालात प्रकाशन झाले. छोट्या मुलांनी पुस्तकातील काही मजकूर वाचला. गावातील एकही माणूस नव्हता. शिकलेली तरुण मुलंही नव्हती. याची कारणे आपल्या सामाजिक व्यवस्थेतही असावीत. पुस्तकाबद्दल आणि कालिदासबद्दल घरच्यांना धन्यता वाटत होती.

‘झोळी’ हे डवरी गोसावी समाजातील एका तरुणाच्या शैक्षणिक धडपडीचा प्रवास सांगणारे आत्मकथन. कालिदासची, त्याच्या कुटुंबाची आणि माणदेशातील डवरी समाजाची ही कहाणी. आई-वडील वेगवेगळ्या गावांत आणि दूरवरच्या गावात भिक्षा मागून जीवन जगत. या काळात कालिदासने दिघंची, पेठवडगाव, फलटण, कोल्हापूर व मुंबई येथे शिक्षण घेतले. त्याच्या या खडतर आणि संघर्षमय जीवनाचा शिक्षणप्रवास या आत्मकथनात आहे. अनेक प्रकारच्या अभावाच्या स्थितीत कालिदास मुंबईच्या टाटा इन्स्टिट्यूटमधून समाजकार्य विषयात पीएच.डी. पदवी मिळवतो. रस्तोरस्ती, गावोगावी भटकंती करत भिक्षा मागणारा डवरी समाजातील मुलगा पीएच.डी. मिळवतो ही लोकविलक्षण घटना. फी भरायला, पुस्तके घ्यायला, रहायला व कोणताही निवारा नसणाऱ्या मुलाचा हा शिक्षण प्रवास आहे.



महेंद्र कदम, राजन गवस, प्रवीण बांदेकर, कालिदास शिंदे



अडल्यानडल्यांना मदत : कालिदास शिंदे व प्रिया शिंदे

कालिदासच्या संघर्षशील खडतर प्रवासाचे कथन या आत्मकथनात आहे. कालिदासच्या वेगवेगळ्या गावांमधील शिक्षण प्रवासाचे हे कथन आहे. स्वत:च्या खडतर शिक्षणप्रवासाबरोबरच, घरातील गरिबी दारिद्र्य आई-वडिलाच्या फिरस्तीचे, त्यांच्या भिक्षा मागणूकीचे, कुचंबणेचे व कालिदासच्या एकटेपणाचे चित्र आत्मकथनात आहे. अगदी फलटणला हॉटेलमध्ये राहिलेले जेवण ओळीने रांगेत उभे राहून मिळवण्यापासून ते निराधार तरुणाचा शिक्षणप्रवास या कथनात आहे. तसेच शिक्षणाने आलेल्या आत्मभानाची जाणीवही त्यामध्ये आहे. तसेच या प्रवासात शिक्षकांनी, मित्रांनी केलेल्या मदतीच्या कृतज्ञता नोंदीही आहेत. 'झोळी'मध्ये आई-वडिलांची वेधक व्यक्तिचित्रणे आहेत. आईचे कष्ट, कुटुंबाचे पालन, अनेक गावांत भिक्षा मागणे, मुलाला शिकवण्याच्या आई-वडिलांच्या इच्छेचे चित्र आहे. वडिलांचे दारूचे व्यसन, भांडणे, अपंगत्व व स्वभावाचे उल्लेखनीय कथन आहे. इतके शिकूनही कालिदास आजही नोकरीपासून वंचित आहे.

'झोळी' ही जशी कालिदासची आत्मकथा आहे, तशीच ती नाथपंथी डवरी समाजाची समाजकथा आहे. लेखकाने आत्मकथनात समांतरपणे या दोन कथा सादर केल्या आहेत. स्वत:चा प्रवास आणि समाज प्रवासाची गुंफण या कथनात आहे. त्यामुळे ती व्यक्तीची आत्मकथा न होता ती समाजाची आत्मकथा झाली आहे. त्यामुळे 'झोळी'मधील समाजशास्त्रीय दस्तऐवज महत्त्वाचा आहे. डवरी गोसावी समाजातील जीवनशैलीचे, भटकंतीचे तपशीलवार कथन या आत्मकथनात आहे. 'काकाला झोळी, हातात त्रिशूल, डवर, कपाळी गुलाल, गळ्यात शिंगी, कानात मुद्रा असलेले डवरी गावोगावी भिक्षा मागत फिरतात.' वेगवेगळ्या गावाबाहेरील पालसंस्कृतीची ही चित्रे आहेत. या पालाभोवती असणाऱ्या



पालावरचा प्रकाशन समारंभ : लेखक, लक्ष्मीकांत देशमुख, रणधीर शिंदे यांच्या हस्ते

अन्य भटक्या समाजाची चित्रे आहेत. तसेच साधारणतः हे डवरी कोणत्या प्रदेशात फिरस्ती करतात, त्याचे एक भूमापन या आत्मकथनात आहे. नाथपंथी डवरी समाजाच्या पूर्वज परंपरेचा शोध आहे. दंतकथा, मिथके, स्थान माहात्म्याच्या अनुषंगाने हा समाजशोध घेतला आहे. डवरी समाजाच्या रीतिव्यवहाराचे आणि संकेतांचे चित्र आत्मकथनात आहे. धर्मसमाजाशी निगडित वेगळा असा शब्दनिधी देखील ('गवनी', 'बाजार चानकायला जायचू' असे अनेक समाजविशिष्ट शब्द) यात आहे. या आत्मकथनाला अनेक सामाजिक संदर्भ आहेत. धर्म आणि समाज, जात आणि गावसंबंध, भटक्यांची संस्कृती आणि उपजीविका, परंपरा आणि मानसविश्वाचे अनेक आयाम आत्मकथनातून साकार झाले आहेत. केवळ पीठ मागायचं आणि 'सगळं काही लोकांच्या दया याचनेवर, इनवणीवर' असणाऱ्या समूहाचे जगणे आत्मकथनात आहे. त्यामुळे 'मागतकरी' समाजाचे मानस वर्तनव्यवहाराचे सखोल आणि विविधांगी चित्र कालिदासने मांडले आहे. 'झोळी'चा आणखी एक विशेष म्हणजे माणदेशातील भटक्या समाजाचे विशेषतः डवरी समाजाचे आलेले चित्रण. प. महाराष्ट्र व माणदेशात डवरी समाजाची स्थाने, देवस्थाने व गावांचे मापन त्यात आहे. 'आयगादी खरसुंडी' तसेच सोनारीपर्यंतचे भटक्या नाथजोगींच्या प्रवासभूगोलाचे चित्र यामध्ये आहे.

जीवनाविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन हा कालिदास शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष. जीवनात एवढी अभावग्रस्तता, संघर्ष, दारिद्र्य असतानाही कधीही कोणाबद्दलही विद्वेषाचा, तुच्छतेचा उद्गार



हातात 'झोळी' - खुंटीला झोळी
आई - कमल, वडील - अंकुश

या कथनात आलेला नाही. त्यामुळे या जीवनदृष्टीत कृतज्ञताभाव कायम झरत ठेवला आहे. 'मी अत्यंत ऋणी आहे बळीराजाचा. कारण त्याने माझ्या आई-बापाच्या अन् कित्येक पिढ्यांच्या झोळीत भरभरून घातलं नसतं तर आम्ही आज नाथपंथाची परंपरा टिकवू शकलो नसतो. तुम्ही दिलं म्हणून आम्ही जगू शकलो,' असा कृतज्ञताभाव त्यामध्ये आहे. अनेक भटके समूह गेल्या तीस वर्षांत आधुनिकतेच्या काळात फरफटत आहेत. एका बाजूला पारंपरिक ठेवण कामे आणि काळबदलामुळे त्यांच्या उपजीविकेत बदल झाले. पारंपरिक देवपूजा कमी होत गेल्यामुळे ही मंडळी भिक्षा मागून जीवन जगतात तर काही स्टोव्ह रिपेअरी, जनावरांच्या बाजारात हेड्याचे दलाल म्हणूनही ही माणसे काम करत आहेत. या स्थित्यंतराचे व दुविधेचे चित्र आत्मकथनात आले आहे.

या आत्मकथनाची भाषा अतिशय समंजस, सुजाण स्वरूपाचे आहे. आयुष्य 'जसे घडले तसे' ते सहजपणे कथन केले आहे. आत्मकथनात बऱ्याचदा वैयक्तिक तसेच समाज दुःखाची कैफियत सांगताना उद्वेग, संतापाचा स्वर येणे स्वाभाविकही असते. मात्र तसे 'झोळी'मध्ये झालेले नाही. समाज दुःखाचे गाऱ्हाणे सांगताना हे केवळ 'असे असे घडले' याला ते प्राधान्य दिले आहे. या आत्मकथनाची शैली ही विनयाची जिव्हाळशैली आहे. ती कदाचित डवरी समाजाच्या 'मागणूक'च्या स्थितीमुळे अशी विनयभाषा अवतरली असावी. तसेच लेखकाच्या स्वभाव-वैशिष्ट्याचे कथन म्हणूनदेखील ती ऋजुतेची



डवरी समाज

आहे. 'कोणाही जिवाचा न घडो मत्सर' या भावनेने ती साकारली आहे. या अर्थाने प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथन शैलीशी नाते सांगणारी ही कथनशैली आहे. ही शैली समूहवाचक शैली आहे. 'आम्ही', 'आमचं', 'आमच्या' अशा समाज सर्वनामसूचक कथनशैलीने ती घडली आहे. 'आम्ही नाथाचं डवरी', 'आपला नाथाचा गुलाल घिवून जावा,' अशी रूपे जागोजागी आहेत. या आत्मकथनाचा एक भाषिक विशेष म्हणजे व्यक्तीच्या अंतरंगाचा व आंतरिकतेचा भरगच्च प्रत्यय या निवेदनात आहे. विश्वास-जिव्हाळ्याने गोष्ट सांगावी तसे हे आंतरिक जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेले गद्य आहे. 'तवा मी दादाला म्हणलू', 'आता माजा लहान भाव अमूल शेंडूफळचा पाळणा लिंबाच्या झाडाला हुता', 'त्या गावाच्या जवळच एक डोंगर हुता', 'मोटं मासं आमी काटा काढून खायाचू', 'मिरचीचा खरडा, भाकरी एका सुताच्या लुगड्याच्या फडक्यात बांधल्या. घोड्यावर अमलू, लली आन आमचा पायी उनातानाचा जीवनमरणाचा प्रवास सुरू झाला' अशी ही कथनशैली आहे. जी दारिद्र्य, अभावग्रस्ततेमधून आलेली आहे. एका अर्थाने हे 'इनवणीकथन' आहे. अंतरंगात आत आत खेचणारे हे सहजकथन आहे.

भटक्यांच्या हालअपेष्टा, दुःख, दारिद्र्य आणि कुचंबणेचे हे दाहक चित्र आहे. जे मन विषण्ण करणारे आहे. डवरी समाजाची ही परवडकथा आहे. 'भटकळण्यामुळे आमच्या सगळ्यांचं आयुष्य वावटुळासारखं गरगर फिरण्यात चाललं हुतं', 'आय दादाचा तर अखंड दाहीदिशा प्रवास सुरू हुता तर दुसऱ्या बाजूला माजाबी जीवन बदलण्यासाठीचा खडतर प्रवास सुरूच हुता' या प्रवासाचे प्रांजळ समाजशील आत्मकथन आहे.

शायनिंग इंडियाच्या पार्श्वभूमीवर आजही भटक्या समाजाची स्थिती केविलवाणी अशी आहे. महाराष्ट्रात असे अनेक बेदखल समाज विखुरलेले आहेत. ना त्यांची कोणाला दखल ना चिंता. अशा एका भटक्या समाजाच्या दु:खाचे आणि परवडीचे चित्र या आत्मकथनातून पुढे आले आहे. जागतिकीकरण व नवभांडवली व्यवस्थेत अनेक प्रकारच्या 'कार्डनी' माणसाला ओळख दिली आहे. या पार्श्वभूमीवर 'आमच्याकडे कायबी रहिवाशी पुरावा नव्हता. रेशनकार्ड बी नव्हते' अशा 'कार्डलेस समाजा'ची केविल करुणचित्रे या आत्मकथनातून पुढे आली आहेत. समाज बदलावा, भटक्यांना निवारा मिळावा, माणूस म्हणून त्याचे अधिकार आणि सन्मान मिळावा, आणि एक दिवस डवरी समाजाची 'झोळी' बंद व्हावी या धारणेचे एक सूत्र कालिदासच्या दृष्टीत आहे.

मराठी साहित्यात आत्मकथनाची समृद्ध परंपरा आहे. दलित, भटक्या समाजातील आत्मभानाबरोबरच सामाजिक दस्तऐवजाचे मोलाचे काम केले आहे. 'झोळी' हे नाथपंथी डवरी गोसावी समाजातील पहिलेच आत्मकथन आहे. त्यामुळे डवरी समाजाच्या खडतर जीवघेण्या प्रवासाचे हे समाजकथन महत्त्वाचे ठरते. धर्मपरंपरेने या माणसांच्या खांद्यावरील झोळीमुक्ती मिळावी आणि माणूसपण वाट्याला यावे एवढीच हाक या कथनामागे आहे.

रणधीर शिंदे
मो. ९८९०९१३०३१

सामाजिक प्रश्न, विशेष कार्य पुरस्कार

# नीतिन पवार
# परिवर्तनाच्या चळवळीतील संघर्षयात्री

□

ॲड. दत्ता काळेबेरे



*डॉ. बाबा आढाव यांच्याबरोबर गेल्या २५ वर्षांपासून नीतिन पवार*
*विविध चळवळींमध्ये सातत्याने कार्यरत आहेत.*
*'हर जोर तुल्मके टक्कर में, संघर्ष हमारा नारा है'*
*हे त्यांचे केवळ घोषवाक्य नाही, जीवनाचा मंत्र आहे.*

नीतिन पवार यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९६७ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे माता-पिता अल्पशिक्षित, कष्टकरी होते. किशोर वयातच पितृछत्र हरपल्यामुळे त्यांचे बालपण खूप कष्टात गेले. 'कमवा व शिका' हे वास्तव स्वीकारून त्यांनी शालांत परीक्षा-छपाई तंत्रज्ञानाचे शिक्षण आणि कला शाखेचे शिक्षण प्राप्तीसाठी मोठा संघर्ष केला.

नवी बाराखडी - पुणे महानगरपालिकेच्या मुद्रणालयात नोकरी करीत असताना साक्षरता मोहिमेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करणारी एक हस्तपत्रिका त्यांच्या वाचनात आली, आणि त्यांच्या जीवनाला नवीन प्रेरणा मिळाली. नोकरी जवळपास सोडून देऊन साक्षरतेच्या भारत विज्ञान समिती या चळवळीचे ते पूर्ण वेळ कार्यकर्ते बनले. पण त्यांचे काम बघून पुणे महानगरपालिकेच्या तत्कालीन आयुक्तांच्या आमंत्रणावरून पुणे शहर साक्षरता मोहीम-अक्षर आंदोलनाचे नीतिन पवार हे मुख्य समन्वयक झाले. या मोहिमेमध्ये त्यांनी स्वत:ला झोकून दिले. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रकिया आहे, सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या जाणिवेतून साक्षरता मोहिमेमध्ये वस्ती पातळीवर व जिल्हा आणि महाराष्ट्र पातळीवरही त्यांनी नावीन्यपूर्ण प्रयोग केले. कष्टकरी निरक्षरांसाठी क-कामाचा, घ-घामाचा, भ-भाकरीचा, स-समतेचा अशी अभिनव वर्णमाला-बाराखडी त्यांनी तयार केली.

जीवन साक्षरता-मानवी जीवनातील खरे खुरे प्रश्न आणि वास्तव परिस्थिती समजावून घेण्यासाठी साक्षरता मोहिमेतील अनुभव साहाय्यकारी झाले पाहिजेत. साक्षरता ही केवळ अक्षर, अंक ज्ञानापुरती मर्यादित न राहता तिने जीवन साक्षरतेचे उद्दिष्ट गाठले पाहिजे या दृष्टिकोनातून अभ्यासक्रम व साक्षरतेचे विविध उपक्रम, रेशनपासून रोजगारापर्यंतच्या कार्यक्रमांची त्यांनी योजनापूर्वक मांडणी केली. निरक्षरांना केवळ अक्षर ज्ञानच नव्हे तर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची द्वारे खुली व्हावीत यासाठी त्यांनी प्रभावी चळवळ उभारली. नवसाक्षरांची अभिनव लोकसभा भरवली. तुरुंगातील निरक्षर बंदीजन तर पुढे जाऊन पदवीधर झाले. तसेच निरक्षर महिला आधी साक्षर होऊन चौथी पास झाल्या. अक्षर आंदोलनाचे सन १९९१ ते १९९७ या काळात प्रभावी व समर्थ नेतृत्व केले. या मोहिमेतील कलाजथ्यांद्वारे स्त्री-पुरुष, सामजिक, आर्थिक समता, धर्मनिरपेक्षता, बंधुतेची मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला. यातूनच बाबरी पाडली गेल्यावर ऑगस्ट क्रांती सुवर्णमहोत्सवात सामाजिक सौहार्दासाठी भारतातील पहिल्या व कदाचित एकमेव अशा लोकप्रतिनिधींच्या माणूस या पथनाट्याची निर्मिती झाली. ३ कि.मी. लांब मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले.




लोकशाही रक्षणार्थ निदर्शने

साक्षरता मोहिमेतील अनेकविध अनुभवांमुळे नीतिन पवारांना त्यांचे जीवनध्येय गवसले. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये पूर्ण वेळ सहभागी होण्यासाठी त्यांनी पुणे महानगरपालिकेच्या नोकरीचा राजीनामा दिला. नंदिनीने- नीतिनच्या सुविद्य जीवनसाथीच्या प्रोत्साहन व आधारानेच हे होऊ शकले. आंतरजातीय विवाह केल्यामुळे उभयतांच्या नातेवाइकांची व त्यांची नाती तुटली होती. या खडतर पार्श्वभूमीवर, कवी मंगेश पाडगावकरांच्या शब्दानुसार 'तेल नाही, आधाराचा हात नाही, तेथे एक दिवा लावू, ज्याच्या घरी काही नाही, अंधारावाचून काहीच नाही, तेथे एक दिवा लावू!' हे जीवनव्रत या ध्येयवादी दाम्पत्याने मनोमन स्वीकारले आणि दृढनिश्चयी वाटचाल केली.

माहिती अधिकार कायदा -सन १९९७ मध्ये महाराष्ट्रातील राजकीय वातावरण कमालीचे तप्त होते. भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन आणि माहितीचा अधिकार चळवळीत नीतिन पवारांनी उडी घेतली. अण्णा हजारे, बाबा आढाव, ग. प्र. प्रधान यांच्या नेतृत्वाखाली 'जनआंदोलन' या मुखपत्राची संपादकीय जबाबदारी स्वीकारली. या न्यासाचे सर्वांत तरुण निमंत्रित विश्वस्त म्हणून मंत्र्यांची, नेत्यांची, अधिकाऱ्यांची भ्रष्ट प्रकरणे निर्भयपणे वेशीवर टांगली. भ्रष्टाचार विरोधात विविध आंदोलने, चळवळी, लढयांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान केले. जनआंदोलनाला संघटनात्मक चौकट देण्यासाठी बाबा आढाव, ग. प्र. प्रधान सर, पन्नालाल सुराणा यांच्यासमवेत राज्यभर कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. या महाराष्ट्रव्यापी आंदोलनामुळे काही भ्रष्ट मंत्र्यांची गच्छंती झाली. राजस्थान, गोव्यानंतर प्रथमत: महाराष्ट्र व २००५ साली केंद्र सरकारने माहिती अधिकार कायद्याची निर्मिती केली आणि या



अत्याचार पीडित महिला, मुली. मनोधैर्य निधीसाठी राज्य महिला आयुक्तालयासमोर निदर्शने

आंदोलनाची यशस्वी फलश्रुती झाली.

अंगमेहनती कष्टकऱ्यांचा सखा - डॉ. बाबा आढाव यांच्याबरोबर गेल्या २५ वर्षांपासून नीतिन पवार विविध चळवळींमध्ये सातत्याने कार्यरत आहेत. हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी, अंध-अपंगांच्या संघटना, मोलकरीण पंचायत इत्यादी कष्टकऱ्यांना संघटित करून त्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी सामाजिक, आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी प्राण पणाला लावून झुंजत आहेत. 'हर जोर तुल्मके टक्कर में, संघर्ष हमारा नारा है' हे त्यांचे केवळ घोषवाक्य नाही, जीवनाचा मंत्र आहे.

बांधकाम कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी सन २००३ मध्ये नीतिन पवार यांनी बांधकाम मजदूर सभेची स्थापना केली. विविध आंदोलने करीत पुणे महानगरपालिकेचा बांधकाम कामगारांच्या सुरक्षिततेसाठी नवीन नियम तयार करण्यास भाग पाडले. ४ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर २००६ या ४० दिवसांमध्ये समताभूमी, पुणे ते दीक्षा भूमी नागपूर अशी रोज एक या प्रमाणे महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमध्ये कष्टकऱ्यांची सामाजिक सुरक्षा रॅली आयोजित केली. कलाजथे, पोस्टर प्रदर्शन, सभा, घर बांधणारे बेघर व कष्टकऱ्यांची सावली अशा अभ्यास पुस्तकांतून व १०० कार्यक्रमा-सभांतून दीड लाख कष्टकऱ्यांशी संवाद साधला. या दरम्यान जिल्हानिहाय ३० पत्रकार परिषदा घेतल्या. नागपूर येथे विधिमंडळावर प्रचंड मोर्चा नेला. रॅलीचा उद्देश सफल झाला. महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांना जानेवारी २००७ मध्ये कायदा मिळाला. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ स्थापन झाले. आज या मंडळामध्ये हजारो कोटी रुपयांचा निधी जमा झाला आहे. लक्षावधी बांधकाम कामगारांना त्यांच्या योजनांचा लाभ मिळत आहे.

पुण्याजवळील केंद्रीय द्राक्ष संशोधन केंद्रातील शेतमजुरांना किमान वेतनही मिळत नव्हते. नीतिन पवार यांनी या शेतमजुरांचे संघटन केले, प्रदीर्घ आंदोलन केले आणि त्यांना किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, ईएसआय आणि दिवाळीला बोनस इत्यादी सद्यस्थितीत अविश्वसनीय वाटणारे हक्क मिळवून दिले.




झुंडबळीच्या घटनांनंतर अमन परिषद

असाच अनुभव रिक्षा चालकांच्या चळवळीचाही आहे. रिक्षा चालकांच्या संघटनांच्या राज्य कृती समितीचे ते सरचिटणीस आहेत. रिक्षा चालकांचे विविध प्रश्न त्यांनी मार्गी लावले आहेत. सध्या सर्वत्र चर्चेत असलेल्या रिक्षा चालक कल्याणकारी मंडळाची मागणी, पाठपुरावा व त्याच्या ७ सदस्यीय शासकीय अभ्यास समितीचे सदस्य म्हणून त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

नीतिन पवारांच्या नेतृत्वाखाली अंगणवाडी कर्मचारी सभा पुण्यात गेल्या १५ वर्षांपासून अखंडपणे विविध आंदोलने करीत आहे. अंगणवाडी सेविकांना मासिक १०,०००/- रुपये आणि मदतनीस महिलेला ५५००/- रुपये मानधन सध्या मिळत आहे. सेवानिवृत्ती लाभ एक लाख रुपये आणि मदतनीस महिलेला ७५,०००/- रुपये पर्यंत मिळत आहे. चिखली, पिंपरी-चिंचवड मध्ये घरकुल योजनेत ८० अंगणवाडी सेविकांना एक बीएचकेची सदनिका सवलतीच्या किमतीत मंजूर झाली आहे. त्यापैकी ४० भगिनींना सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला आहे.

सामाजिक चळवळी - महात्मा फुले, समता प्रतिष्ठानचे सरचिटणीस व कार्याध्यक्षपदावरून त्यांनी विविध चळवळींचे-आंदोलनाचे नेतृत्व केले. फुले-आंबेडकर व्याख्यानमालेचे यशस्वी आयोजन केले. महात्मा फुले, सावित्रीबाई व फातिमा बेग यांनी १७५ वर्षांपूर्वी मुलींची पहिली शाळा स्थापन केली. त्या शाळेची वास्तू भग्नावस्थेत होती. त्या शाळेचे, भिडेवाड्याचे राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी नीतिन पवारांनी सातत्याने आंदोलने केली. नुकतीच त्यांची यशस्वी फलश्रुती झाली आहे. महाराष्ट्र सरकारतर्फे नजीकच्या काळात भव्य राष्ट्रीय स्मारक प्रत्यक्षात साकार होणार आहे. तीच गोष्ट बिबवेवाडी येथे उभारण्यात आलेल्या अण्णाभाऊ साठे स्मारक नाट्यगृहाची.

जयपूर येथील उच्च न्यायालयासमोर मनुस्मृतीचा निर्माता 'मनू' याचा पुतळा उभारण्यात आला आहे. विषमतेचे प्रतीक असलेला हा पुतळा हटविण्यात यावा, या मागणीसाठी महाड ते जयपूर असा



अंगणवाडी ताईंची निदर्शने




खासगीकरणाविरोधी बँक, विमा, एसटी, वीज कर्मचाऱ्यांची संयुक्त निदर्शने




भिडे वाडा मुलींची पहिली शाळा. राष्ट्रीय स्मारक २५ वर्षांचा यशस्वी लढा




तरुण अभियंत्यांच्या बेरोजगारीविषयी उपोषण

शेकडो किलोमीटर अंतराचा डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली पायी मोर्चा आयोजित करण्यात आला होता. त्याचे यशस्वी नियोजन नीतिन पवार यांनी केले होते.

महात्मा फुले यांच्या विचारांच्या प्रभावामुळे त्यांचे कार्य स्त्री केंद्रित राहिले आहे, आपल्या सर्वांच्या जगण्यातील स्त्रीचे दुय्यम स्थान कुठे आहे, याचा तपास घेऊन त्यात बदल केला पाहिजे, ही त्यांची धारणा आहे. त्यातूनच आई-बहिणीवरून शिवी देणार नाही-घेणार नाहीचे शपथ कार्यक्रम, मुलग्यांनी कपडे धुण्याचे जाहीर कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. आई-बहिणीवरून शिवी देणाऱ्यांविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदवण्याची मागणी करणारा मोर्चाही आयोजित केला गेला.

पुणे महानगरपालिकेच्या महिला सफाई कामगारांना मुकादम पदावरती नियुक्ती मिळालेली आहे. पुणे महानगरपालिकेच्या १७० वर्षांच्या इतिहासात असे प्रथमत:च घडले आहे.

नीतिन पवार यांनी गेल्या ३०-३५ वर्षांमध्ये असंख्य आंदोलने केली. धरणे, मोर्चे, जेलभरो, उपोषणे इत्यादी सनदशीर मार्गाने शोषित समाज घटकांच्या अनेक मागण्या धसास लावल्या. केंद्र सरकारने सन २००८ मध्ये सामाजिक सुरक्षा कायद्याची निर्मिती केली. त्यामागे कष्टकऱ्यांच्या या असंख्य आंदोलनांची पार्श्वभूमी आहे. कष्टकऱ्यांचे हे आंदोलन केवळ महाराष्ट्राच्या पातळीवर मर्यादित न ठेवता राष्ट्रीय पातळीवर कार्य करण्यासाठी डॉ. बाबा आढाव यांनी 'राष्ट्रीय हमाल पंचायत' स्थापन केली आहे. नीतिन पवार यांनी संघटनेची नोंदणी करण्यासाठी पुढाकार घेतला, इतर सहकाऱ्यांच्या सहभागाने महाराष्ट्राच्या धर्तीवर दिल्ली माथाडी व हमाल कायद्याचे प्रारूप तयार करून दिल्ली सरकारला सादर केले आहे. या कष्टकऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, बोनस इत्यादी आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

नीतिन पवार यांनी ध्येयवादी व त्यागी वृत्तीने केलेल्या लोकसेवेला लोकमान्यता व राजमान्यता मिळाली आहे. त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते एका भव्य कार्यक्रमात त्यांना 'दिवंगत धनंजय थोरात आदर्श कार्यकर्ता पुरस्कार' मिळाला आहे. छात्र भारतीचा 'डॉ. अरुण लिमये युवा जागर पुरस्कार', 'लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार', 'अण्णाभाऊ साठे पुरस्कार', आवाबेन नवरचना केंद्राचा 'सुमतीबाई साठे पुरस्कार', 'कॉ. दत्ता देशमुख स्मृती पुरस्कार', सोलापूरचा 'सुशील स्नेह पुरस्कार' इत्यादी अनेक सन्माननीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

स्त्री, दलित, आदिवासी, हमाल, कष्टकरी इत्यादी उपेक्षित आणि शोषित जनसमूह हे नीतिन पवार यांचे कार्यक्षेत्र आहे. लोकशाही, समाजवाद, इहवाद, विज्ञाननिष्ठ समाजाची निर्मिती करण्यासाठी अहर्निश कृतिप्रवण राहणे हा त्यांचा ध्येयवाद आहे. भारतीय संविधानातील ही मूल्य साकार व्हावीत यासाठी ते सदैव कटिबद्ध आहेत. या सर्व चळवळीमागे त्यांच्या जीवनसाथी नंदिनी पाडपत्रीकर व मुले अमन व रोशनी यांचे प्रोत्साहन व सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

दत्ता काळबेरे
मो. ९४२२३१९००७

रा. शं. दातार नाट्यसंहिता पुरस्कार

# चैतन्याने रसरसलेला रंगकर्मी चैतन्य सरदेशपांडे

□

रमाकांत मुळे



*‘रविवार डायरीज’ हे चैतन्यचे सामान्य माणसाच्या सुखाच्या स्वप्नांचा शोध घेण्यासाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीचे चित्रण आहे.*
*‘उकळी’ ही चैतन्य सरदेशपांडे यांची नवी कोरी एकांकिका.*
*मागील वर्षी ती अनेक स्पर्धांमध्ये गाजली आणि वाजलीसुद्धा.*

अपेक्षा आणि इच्छांचे ओझे जेव्हा माणसाच्या जगण्यावर अतिक्रमण करतात, नातेसंबंधांच्या भवतालाची वेल जेव्हा जगण्याच्या रोपट्याला फास बनवून घट्ट आवळू पाहते तेव्हा जगण्यातील तर्क शोधण्याची तहान लागते आणि नवीन स्वप्नांचा शोध घेणाऱ्या वाटेवर नाटकातील ‘साने’ हे पात्र मॉल रूपी विशाल अवकाशात सुखात्मक स्वप्नाचा शोध घेण्यासाठी स्वत:ला अंतर्बाह्य झोकून देते. तेव्हा सुरू होतो ‘रविवार डायरीज’चा नाट्याविष्कार. हा नाट्याविष्कार रसिकांच्या समोर घेऊन आलाय नवीन पिढीतील प्रायोगिक नाटकाची वाट चोखंदळपणे तुडवणारा तरुण अभिनेता आणि लेखक चैतन्य सरदेशपांडे.

आजची चैतन्यची ओळख आहे ती ‘स्टार प्रवाह’ या वाहिनीवरील ‘ठरलं तर मग’ या मालिकेचा हिरो म्हणून. तसा तो अनेक मालिका, वेब सिरियल यांमुळे गाजतो आहे. मात्र चैतन्य याच्या अभिनेता, लेखक, आणि दिग्दर्शक या बहुअंगी व्यक्तिमत्त्वाचा पाया नाटक हाच आहे. नाटक हाच त्याच्या कर्तृत्वाचा केंद्रबिंदू म्हणता येईल.

त्याच्या घरातच नाटकास पोषक असं वातावरण असल्यामुळे आणि बालनाट्यात भूमिका केल्यामुळे चैतन्याच्या नाट्यविषयक जाणिवा बलदंड झाल्या. विज्ञान शाखेत संगणक विषयात पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी त्याने मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला. मुंबई विद्यापीठाच्या ‘नाट्यकला विभागा’त चैतन्यला वामन केंद्रे आणि शफात खान यांसारख्या दिग्गज नाट्यकर्मीकडून मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्याच्या नाट्य विषयक जाणिवा, विचार आणि चिंतन अधिक गहिरे झाले. रंगभूमीवर मुक्तपणे काम करताना रंगभाषा, रंगतंत्र आणि रंगविचार हाताळताना चैतन्यने पारंपरिक नाट्यशैलीला छेद देऊन प्रायोगिक रंगभूमीची वाट धरली आणि त्यात तो यशस्वी देखील झाला. चैतन्यचा लेखन प्रवास सुरू झाला तो ‘द क्युरिअस केस ऑफ’ या एकांकिकेपासून. विविध एकांकिका स्पर्धांमध्ये अव्वल ठरलेल्या या एकांकिकेत चैतन्यने, तारुण्यात पदार्पण करणाऱ्या युवकांच्या लैंगिक जाणिवा आणि त्यातील गूढतेची उकल असा आगळावेगळा विषय हाताळला आहे. मानवी मनाचा वेगळ्या पातळीवर अभ्यास करून त्याचे प्रतिबिंब प्रेक्षकांसमोर ठेवणारी नाटके चैतन्यने रंगभूमीवर आणली. ज्यात ‘ठसका’, ‘एक्सपायरी डेट’, ‘शिकवण’, ‘विसर्जन’, ‘इंटरोगेशन’, ‘तुंबई’, ‘दंतकथा’, ‘कोपरा’,’ रंगारी’, ‘होल्ड माय हॅन्ड’, ‘फॉसेस’, ‘पाहिजे म्हणजे पाहिजे’, ‘शिवाजी सुपर मार्केट’, ‘खादाड’, ‘फोबिया’ या एकांकिका आणि ‘माकड’, ‘गुगली फाय’, ‘कॉफीन’, ‘रविवार डायरीज’



'रविवार डायरीज' - चैतन्य सरदेशपांडे




यांसारख्या आगळ्यावेगळ्या नाटकांचा उल्लेख करता येईल. त्याचं वय पाहता हे त्याचं नाट्यकर्तृत्व नजरेत भरणारे आहे. चैतन्यची प्रायोगिक नाटके म्हणजे पारंपरिक मळलेली वहिवाट सोडून आडवाटेला घुसून माणसाच्या जगण्याचा, त्याच्या मानसिक स्थित्यंतराचा शोध घेणारी नाटके आहेत. नाट्यलेखन करताना त्याच्या स्वत:च्या जाणिवांना स्पर्शून जाणारे विचार भवताल शोधत संवादाच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत प्रवाहित होतात तेव्हा नाट्य लेखक जणू चित्रकारच बनतो. नाट्यचित्रण करण्यासाठी त्याने निवडलेला कॅनव्हास हा अमर्याद अवकाशासारखा असतो, ज्याची लांबी, रुंदी, खोली आणि उंची मोजता येत नाही. चैतन्यचा नाट्य विषयक प्रवास खरा प्रकाशात आला तो 'माकड' या प्रायोगिक कम व्यावसायिक नाटकामुळे. 'आपले आपल्या देशाकडे नीट लक्ष आहे का?' अशी टॅगलाईन घेऊन चैतन्य 'माकड' हे नाटक घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला आला. हे त्याचे नाट्यव्यवसायाच्या क्षेत्रातले पहिले पाऊल. 'माकड' या नाटकात चैतन्यने स्वत: केलेला अभिनय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला होता. त्यामुळेच 'माकड' या नाटकाला महाराष्ट्र राज्य व्यावसायिक मराठी नाट्य स्पर्धेत लेखनाचे प्रथम पारितोषिक मिळाले होते. त्यानंतर 'कॉफीन' हे नाटक आले. एखाद्या जोडप्यास मूल होण्याअगोदरच त्यांच्या जन्माला येणाऱ्या मुलाबाबत इतक्या अपेक्षा असतात आणि त्या अपेक्षांचे ओझे ते बाळ जन्माला येण्यापूर्वी आईच्या पोटात असलेल्या गर्भावरच टाकतात. परिणामी चेतनाशून्य बालक जन्माला येते. ते त्या अपेक्षा काय पूर्ण करणार? या नाटकाचा विषय असा अफलातून होता.

नाट्यसंहितेसाठी चैतन्य सरदेशपांडे यास सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)चा मानाचा समजला जाणारा 'रा. शं. दातार नाट्यसंहिता पुरस्कार' मिळाला आहे. त्याच्या 'रविवार डायरीज' आणि 'उकळी' या नाटकांचा तपशीलवारपणे विचार या ठिकाणी करावा लागेल. 'रविवार डायरीज' हे





'रविवार डायरीज' - चैतन्य सरदेशपांडे

चैतन्यचे सामान्य माणसाच्या सुखाच्या स्वप्नांचा शोध घेण्यासाठी कराव्या लागणाऱ्या धडपडीचे चित्रण आहे. हे नाटक आगळ्या वेगळ्या अशा अभिनित अभिवाचन पद्धतीने रंगमंचावर आणले गेले म्हणून ते प्रायोगिक नाट्य निर्मितीच्याही रुळलेल्या वाटा सोडून नवीन शैलीच्या वाटा निर्माण करणारे ठरले. या नाटकामध्ये 'साने' हा मध्यमवर्गीय माणूस, त्याची टिपिकल मध्यमवर्गीय बायको, मॉलमधील सेल्स गर्ल, बिलिंग काउंटरवरील माणूस आणि एक गिऱ्हाईक अशी एकूण पाच पात्रे रंगमंचावर दिसतात. परंतु स्वप्नांसाठी प्रतीक म्हणून वापरलेला 'शर्ट' हासुद्धा व्यक्तिरेखा बनून प्रेक्षकांच्या समोर येतो. केवळ येतच नाही तर त्याची, रंगीत, मळलेला, जीर्ण झालेला, डाग पडलेला अशी विविध रूपे प्रेक्षकांना दिसतात. त्यामुळे तो जिवंत असल्याचा भास प्रेक्षकांना होतो. त्याच्या हालचाली, रुसणे-फुगणे, त्याच्या भावभावना, सगळे प्रेक्षकांना दिसू लागते. साने नावाचा मध्यमवर्गीय माणूस आपल्या बायकोसह एका रविवारी शर्ट घेण्यासाठी एका मॉलमध्ये जातो, परंतु त्याच्या आवडीचा, ज्यात त्याची स्वप्ने दडली आहेत, ज्यात भावभावना आहेत असा शर्ट शोधताना तो त्या मॉलमध्ये अनेक दिवस, अनेक महिने स्वत:ला अडकवून घेतो. परंतु अखेरपर्यंत त्याला त्याच्या स्वप्नातला शर्ट काही मिळत नाही. वरवर सामान्य वाटणारे पण तसे नसणारे कथानक या नाटकात आहे. हे कथानक कधी विनोदाच्या माध्यमातून तर कधी फँटसीच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर येते. या नाटकातील साने ज्या प्रकारचे अतिसामान्य जीवन जगत असतो त्या जगण्यातील अर्थहीनता आणि क्षुल्लकपणा त्याला पदोपदी जाणवत असतो. नाटकात लेखकाने तिरकस विनोदाने नाटकाच्या प्रारंभी प्रसंग चित्रे उभी केलेली आहेत. पण नाटक

## ‘रविवार डायरीज’







जसे पुढे सरकते तशी ही चित्रे भेदक उपहासाने अधिकच गडद होत जातात. त्याला हवे असलेले स्वप्न सापडत नसल्याने त्याच्या विस्कटत चाललेल्या स्वास्थ्याचे, कौटुंबिक दुभंगलेपणाचे चित्रदेखील लेखकाने मोठ्या खुबीने प्रतीकात्मक शैलीने या नाटकात रंगवले आहे. सदर नाटकात लेखकाने मॉल हे सर्वसामान्यांचे आकर्षण असणारे स्थळ निवडले. ते निवडल्यानंतर तेथील बारीक-सारीक तपशिलांचे, तिथल्या चाकारमान्यांचे दैनंदिन व्यावसायिक जगणे, जगण्यासाठी वर्चस्व टिकवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे तसेच मॉलमध्ये जाणाऱ्या सामान्यांच्या मानसिक उलाढालीचे वर्णन लेखकाने संवादामधून आणि मंच सूचनेनुसार होणाऱ्या हालचालींमधून प्रेक्षकांसमोर ठेवले आहे. प्रेक्षक कधी सानेमध्ये तर कधी सेल्स गर्लमध्ये तर कधी सानेंच्या बायकोमध्ये स्वत:ला शोधू लागतात. शर्ट या




मानवी सुखाच्या प्रतीकाचा प्रेक्षकांवर इतका परिणाम होतो की सानेने निवडलेला शर्ट आपलाच आहे असे प्रेक्षकाला वाटू लागते. हा शर्ट प्रेक्षकांमध्ये इतका रुळतो की साने ऐवजी शर्ट हीच मध्यवर्ती भूमिका आहे असे प्रेक्षकाला वाटू लागते. नाटकात लेखकाने प्रेक्षकांना 'आरसा' संबोधले आहे.. म्हणून तो सानेंच्या माध्यमातून सतत या आरशातील प्रेक्षकांशी बोलत असतो. हा प्रेक्षकरूपी आरसा 'समोर काय चाललंय', 'कसं चाललंय', 'चित्र कसं रंगलय' हे सांगत असतो. एकूण काय तर, प्रेक्षकच समीक्षक बनलेला असतो. या नाटकातून चैतन्यमध्ये दडलेला आगळा लेखक, सकस अभिनेता आणि सर्जनशील दिग्दर्शक प्रेक्षकांच्या समोर येतो. चैतन्यचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व या नाटकातून प्रकट होते..

'उकळी' ही चैतन्य सरदेशपांडे यांची नवी कोरी एकांकिका. मागील वर्षी ती अनेक स्पर्धांमध्ये गाजली आणि वाजलीसुद्धा. (वाजली म्हणजे प्रथम क्रमांक या अर्थाने.) त्यामुळे चैतन्य हा युवा वर्गाचा चाहता लेखक आणि अभिनेता बनला. त्याच्या नेहमीच्याच, सुरुवातीस विनोदी वाटणारी, पण गंभीर आशय असणारी ही फँटसी काहीशा रहस्यमय अशा शैलीत प्रेक्षकांपुढे उलगडते आणि त्यांच्या पसंतीस उतरते. चैतन्याच्या बहुतांश एकांकिकांमध्ये फँटसी असतेच. त्याचे कारण त्याने लहानपणी अनेक बालनाट्यांत केलेल्या भूमिका किंवा वाचलेल्या / पडद्यावर पाहिलेल्या हॅरी पॉटरसारख्या अद्‌भुतिका हे असू शकते.

'उकळी' या एकांकिकेत महानगरात चाळीमध्ये एका खोलीत राहणाऱ्या कनिष्ठ मध्यमवर्गीय जाधव कुटुंबाची कथा चितारली गेली आहे. सामान्य माणसाला, हलाखीच्या परिस्थितीत जगत

‘उकळी’







असताना कधीतरी आपल्याला अचानक लॉटरी लागावी आणि भक्कम पैसे मिळावे मग आपल्याला सगळ्या सुखसोयी, सुविधा, चैनीचे आयुष्य जगता येईल, अशी स्वप्ने सतत पडत असतात. प्रस्तुत एकांकिकेतील संतोष जाधव या अतिसामान्य कुटुंबातील कुटुंबप्रमुखालासुद्धा अशी स्वप्ने पडतातच. सतत काटकसरीने आणि हलाखीच्या परिस्थितीत, तुटपुंज्या उत्पन्नामध्ये संसाराचा गाडा कसाबसा ओढत असताना एके दिवशी एका गर्भश्रीमंत उद्योगपतीच्या मुलाला तो अपघातातून वाचवतो. त्याच्या उपकाराची परतफेड म्हणून तो श्रीमंताचा मुलगा त्याच्याकडे रक्कम न लिहिलेला चेक पाठवतो आणि हवी असलेली रक्कम टाकून तो वटवून घ्या असे कळवतो.

अचानक झालेल्या या धनलाभामुळे त्याचे आयुष्य पार बदलून जाते. मिळणाऱ्या पैशातून स्वत:साठी मोठा फ्लॅट, मुलीला व्यवसायासाठी भांडवल, त्याच्या आईची सहलीची इच्छा, पत्नीचे शानशोक, विलासी जीवन हे सगळं सगळं मिळणार असतं. पण अचानक येणारा हा पैसा त्याचे नातेसंबंध, जगण्यातला आनंद, कष्टाची सवय, काटकसरीने पण आनंदात जगण्याची रीत, निखळ मैत्री, घट्ट शेजारधर्म हे सारे सारे हिरावून घेऊ पाहतो. म्हणून अखेरीस नाटकाचा नायक तो ब्लँक चेक श्रीमंताच्या मुलास परत करण्याचा निर्णय घेतो; असे कथानक लेखकाने या एकांकिकेत विनोदी आणि उपहासात्मक खुसखुशीत संवादाच्या माध्यमाने रंगवले आहे.

चैतन्याच्या 'रविवार डायरीज' आणि 'उकळी' या एकांकिकेच्या लेखनशैलीचा आणि निर्मितीशैलीचा विचार केल्यास असे जाणवते की, त्याचा नाट्यानुभव त्याच्या समकालीन प्रायोगिक लेखकाच्या शैलीपेक्षा जरासा वेगळा आणि अपरिचित असा राहिला आहे. नाट्यवस्तूच्या बांधणीसाठी त्याने मानवी जीवनातील भावनिक आंदोलनाचा उपयोग केलेला दिसतो. म्हणूनच प्रेक्षक त्याच्या नाटकात स्वत:ला शोधत असतो. नाट्य प्रसंगातील घटनांमध्ये खळखळून हसायला लावणारा बोचरा विनोदसुद्धा आहे. त्यामुळे या एकांकिकेमधील संवाद आणि व्यक्तिरेखांच्या परस्पर संबंधांमुळे नाट्याशयाची उकल सहजपणे होते. त्यामुळे जाधवांच्या घरात सतत येणारी चहाची उकळी आणि अचानक धनलाभ झाल्याने सर्व व्यक्तिरेखांच्या मनात येणारी आनंदाची उकळी एकरूप होऊन जाते.

रमाकांत मुळे
९८६००६४६३३

कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)

# विजय देठे

☐

मनीष राजनकर



*चंद्रपूर जिल्ह्यातील गोडपिंपरी तालुक्यातले पाचगाव हे गोंड जमातीच्या आदिवासींचे गाव. कधीकाळी रोजगाराची संधी नसल्याने असलेले दारिद्र्य, त्यातच व्यसनाधीनता याने त्रस्त झालेल्या गावाचे चित्र पर्यावरणमित्र संघटनेचे विजय देठे यांनी पत्नी स्मिता आणि सहकाऱ्यांसह बदलले. सर्वात प्रथम जनजागृती करून लोकांना एकत्र आणून गावाभोवती असणाऱ्या जंगलातल्या वनसंपत्तीवरील सामूहिक वन हक्काचा लढा दिला. ३ वर्षांच्या संघर्षांनंतर २०१२ साली हा वन हक्क गावाला मिळाला. बांबूची तोड आणि विक्री करण्याचा अधिकार गावाला मिळाला, त्यासोबतच जंगल राखण्याची जबाबदारी देखील गावाने स्वीकारली.*

विजय झुंगराजी देठे यांनी, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर वृक्षमित्र संस्थेसोबत २००५ साली अंशकालीन कार्यकर्ता म्हणून कामाला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात चंद्रपूर जिल्हा व गडचिरोली जिल्ह्यामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी कार्य सुरू केले. वन्यजीव वाचवा व मानव वाचवा यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या सदस्यांना सोबत घेऊन विरूर वनपरिक्षेत्रामध्ये सात दिवस सायकल यात्रेद्वारे ३० गावांमध्ये जाणीव जागृती करून वन व वन्यजीव संरक्षणामध्ये लोकांचा सहभाग प्राप्त करून घेतला. त्यांतर गोटा या गावातील संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या लोकांसोबत बांबूपासून अगरबत्ती बनविण्याचे प्रकल्प सुरू करून वन आधारित रोजगाराची निर्मिती केली.

सायकल यात्रा, बांबूपासून उदबत्ती काड्या बनविण्याचे प्रशिक्षण चंद्रपूर जिल्ह्याच्या राजुरा तालुक्यातील विरूर स्टेशन या स्वत:च्या गावातही आपली सहचारिणी स्मिता देठे हिच्यासोबत काम सुरू केले. घरी पालक आणि गावातले शेजारी सर्व मजूर म्हणून राबणारे आणि त्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला आणि माणूस म्हणून सन्मान मिळत नाही, ही परिस्थिती स्वस्थ बसू देत नव्हती. किशोर वयापासून बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रेरणा देत होते. रोजगार हमीच्या कायद्याने मागेल त्याला काम आणि मागेल तेवढ्या दिवसांचे काम मिळण्याची हमी असली तरी लोकांना काम नव्हते. पर्यावरण मित्र नावाची संस्था स्थापन करून आपल्या गावातच लोकांना काम मिळवण्यासाठी रोजगार हमी मजूर युनियन तयार केली. त्याला अभ्यास गटाची जोड दिली. दिवसा काम करायचे आणि रात्री अभ्यास हा जणू विरूरमधल्या लोकांचा दिनक्रमच झाला होता. कायद्यातील सर्व कलमांचा बारकाईने अभ्यास आणि त्या आधारे कामाची रूपरेषा ठरवणे ही पद्धत फारच प्रभावी ठरून लोकांना हक्काने काम तर मिळालेच पण जास्तीत जास्त काम करून ४०० ते ५०० रुपये रोज मिळायला लागले. याने लोकांचा आत्मविश्वास तर वाढलाच, सोबतच आर्थिक परिस्थितीत बदल होऊन मुलांचे शिक्षण



विरूर स्टेशन येथील लोकांद्वारे रोजगार हमी योजनेचे काम करताना

आणि आरोग्याबाबतही गुंतवणूक व्हायला लागली. या कामाची माहिती शेजारच्या गावांना मिळत गेली आणि गावे जुळत गेली. मजूर युनियनच्या माध्यमातून मजुरांचे संघटन आणि अभ्यासाची जोड देऊन कायदेशीर मार्गाने हक्क मिळवण्याचे हे काम राजुरा, गोंडपिपरी व भद्रावती तालुक्यातील २० गावांमध्ये सुरू झाले.

याच दरम्यान कोरो, मुंबई संस्थेसोबत जुळून विदर्भ पातळीवर समन्वयक म्हणून स्थानिक नेतृत्व विकास प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग घेतला. या माध्यमातून तळातील समूहांमधून युवक-युवतींचे नेतृत्व विकसित करून त्यांनी स्वत:च्या समूहांचे प्रश्न सोडवण्यात पुढाकार घ्यावा याकरिता विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये काम करत असतानाच आपल्या गावातील व कामाच्या क्षेत्रातील युवक-युवतींनाही या प्रक्रियेत सहभागी करून त्यांचे नेतृत्व विकसित करण्यालाही प्राधान्य देऊन समविचारी कार्यकर्त्यांची एक टीम तयार केली.

राजुरा हा तालुका जंगल व्याप्त क्षेत्रात येतो. लोक शेती पण करतात मग मजुरीवर एवढे अवलंबून का राहावे लागते? या प्रश्नातून जंगलाचा अभ्यास सुरू झाला. त्याच सुमारास वनविभागाची संयुक्त वनव्यवस्थापन योजना सुरू होती. गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांत या कामाशी संबंधित अभ्यास गटामध्ये सहभागी होऊन जंगलाबाबतचे काम सुरू झाले. पुढे आदिवासी व वनांच्या लगत राहणारे परंपरागत निवासी यांच्यावरील ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी, वनहक्क कायदा संसदेने पारित



पाचगावचे सामूहिक वनहक्क दाव्याला मान्यता देण्याची ग्रामसभा





ग्रामसभा पाचगावला रात्रीच्या अभ्यास बैठकीमध्ये सहभागी

केल्यावर त्या कायद्याचा लोकांसोबत बारकाईने अभ्यास करून त्यातील सामूहिक वन हक्काच्या अंमलबजावणीच्या कामाची गावांसोबत सुरुवात झाली. गोंडपिपरी तालुक्यातील पाचगाव या गावातील लोकांनी, मुख्यत: युवकांनी या कायद्याच्या अभ्यासात आणि जंगलावर गावाचे सामूहिक हक्क स्थापन करण्यात पुढाकार घेतला. पाचगावने वनहक्क कायद्यासोबतच माहिती अधिकार कायदा आणि दप्तर दिरंगाईचा यांची जोड देऊन १००६ हेक्टर क्षेत्रावर दावा मिळवला.

बांबू वाहतूक परवाना मिळवण्यासाठी पाचगाव ग्रामसभेचे आंदोलन पाचगावला वनहक्क दावा मिळाल्यावर नियोजन प्रक्रिया त्यानंतर गावातील युवकांच्या माध्यमातून सामूहिक वन क्षेत्राचे नकाशे तयार करणे, जंगलातील संसाधनांची नोंद करणे व त्या आधारे वन व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे काम लोकांसोबत केले. सोबतच वनांचे संरक्षण, संवर्धन व शाश्वत वापरासाठी ग्रामसभेसोबत नियम तयार केले. जंगलातील बांबूची कटाई करून, लिलावाद्वारे विक्री करून, ग्रामसभेत आलेल्या पैशातून लोकांना काम देण्याची स्वत:ची योजना तयार केली. गावातील प्रत्येक कुटुंबाला वर्षभर काम आणि महिला-पुरुषांना समान काम, समान वेतन सुरू केले. एवढेच नाही तर गावातील मुली लग्न होऊन बाहेरगावी गेल्या तरी त्यांचा जंगलावरचा आणि गावाच्या नैसर्गिक संसाधनांवरचा अधिकार कायम राहील असा ग्रामसभेचा नियम केला आणि तो अमलातही आणला. एवढेच करून न थांबता वन्यजीवांचा आणि जैवविविधतेचा विचार करून गावाला मिळालेल्या सामूहिक वन क्षेत्रातील १० टक्के जंगल म्हणजे १०० हेक्टर देवराई म्हणून राखीव ठेवले.

लोकांसोबत केलेल्या कामामुळे स्थानिक पातळीवर नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनासोबतच लोकांची उपजीविका सुरक्षित करण्याचे काम तर होत होते परंतु जंगलासंबंधित कामासोबतच इतर कामांची आवश्यकताही लोक बोलून दाखवत होते. सोबतच नैसर्गिक संसाधनांवर आधारित स्थानिक उद्योग उभारणीचीही गरज जाणवत होती. अशा वेळी समविचारी आणि विदर्भातील सामाजिक क्षेत्रातच वेगवेगळ्या समूहांसोबत आणि वेगळ्या विषयांवर काम करणाऱ्या विजय देठे, मनीष राजनकर व कौस्तुभ पांढरीपांडे या मित्रांच्या तीन वेगळ्या संस्थांची एक फांउडेशन फॉर इकॉनॉमिक इकॉलॉजिकल डेव्हलपमेंट ही ना नफा तत्त्वावरची कंपनी स्थापन केली आहे. या माध्यमातून विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये पाणी आणि त्यावर आधारित समूह, जंगल व त्यावर आधारित समूह आणि गवताळ भाग व त्यावर आधारित समूह असे काम तर सुरूच आहे, सोबतच एकमेकांच्या कामाला जोड देऊन लोकांच्या जिव्हाळ्याच्या इतर कामांची सुरुवातही प्रत्येक ठिकाणी केली आहे. जंगलाच्या कामासोबतच आता चंद्रपूर जिल्ह्यात तलाव जिवंत करून स्थानिक माशांच्या माध्यमातून मत्स्य उत्पादन वाढविण्याचे काम गोंदिया जिल्ह्यातील अनुभवाच्या आधारे सुरू झाले आहे. या एकत्रीकरणातून आता सहकारी पण वाढले आहेत आणि कामाचे क्षेत्रही वाढले आहे.

वनहक्काचे काम तीन तालुक्यांतील ३० गावांसोबत सुरू झाले, या मध्ये ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रातील ग्रामसभांसोबतही काम सुरू झाले आहे. नाम फाउंडेशनच्या मदतीने गौण वनोपज आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीचे काम सुरू आहे. सोबतच जंगलाच्या लगत असणाऱ्या गावांमध्ये जंगली प्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीचा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. त्या संबंधांत निवडक गावांसोबत औषधी वनस्पती लागवडीचे प्रयोग सुरू आहेत. त्यासाठी वनऔषधींच्या रोपांची एक नर्सरी ताडोबा लगत सुरू केली आहे, जिथून लोकांना रोपे देऊन वनऔषधी शेती केली जात आहे. या वनऔषधींच्या शेतीला जंगली जनावरांचा त्रास होत नाही. या बाबतचे काम आणि अभ्यास सध्या सुरू आहे.

याच काळात कायद्याच्या मार्गाने लोकांचे प्रश्न सोडवणे आणि हक्क मिळवणे शक्य असले तरी जेव्हा गावात प्रश्न सुटत नाही आणि कोर्टाची पायरी चढावी लागते, त्या वेळी लोकांच्या उपयोगाच्या कायद्यांबाबत अभ्यास असणारे वकील मिळत नाहीत आणि मग त्या पातळीवर कधी कधी लढाई हरतो, त्यामुळे स्वत: वकिलीची परीक्षा देऊन सनद घेतली आणि सद्यस्थितीत जिल्हा कोर्टात वैयक्तिक वनहक्क दावे केलेल्या आणि सामूहिक वनहक्क नाकारलेल्या ग्रामसभांचा वकील म्हणून काम करत आहेत. सामाजिक काम करण्याची आवडही जपलेली आहे. ताडोबा अभयारण्यामधील ४ गावांचे सामूहिक वनहक्क दावे अमान्य करण्यात आले. त्या विरुद्ध राज्यस्तरीय सनियंत्रण समितीला कायदेशीर नोटीस देऊन, दावे जिल्हास्तरीय समितीने मंजूर करावे, यासाठी निर्देश देण्यात यावे, यासाठी लोकांना मदत करण्याचे कार्य सुरू आहे. संस्थेतील सहकारी आणि मित्रांच्या मदतीने सामाजिक कामही दुसऱ्या बाजूला सुरूच आहे.

मनीष राजनकर
मो. ९४२३११८३०७

कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)

# लढवय्ये
# निसार अली आणि वैशाली महाडिक

□

शरद कदम



*मुंबईच्या गोरेगाव पूर्वमधील आर्थिक परिस्थिति बेताची असल्याने टिफीनचा व्यवसाय करणारी वैशाली महाडीक आणि पोलिस खात्यात असलेल्या वडिलांच्या आजारपणामुळे शिक्षण सोडावे लागलेले निसार अली सय्यद यांचे धर्म भिन्न असले तरीही सामाजिक कामातून भेट होऊन २००३ मध्ये ते विशेष विवाह कायद्यानुसार विवाहबद्ध झाले. राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून कार्यरत असणारे निसार आणि वैशाली यांनी सफल विकास वेल्फेअर सोसायटी या संस्थेची स्थापना केली आहे. डॉ. दाभोळकर यांच्या हत्येनंतर रस्त्यावर विवेक जागर परिषद आयोजित केली होती. हे दांपत्य ऐन कोरोनाच्या काळात लोकांना आधार देण्यासाठी बाहेर पडले. या काळात त्यांनी ८०० लोकांना जेवणाचे पाकीट वाटप, औषध फवारणी, रेशन वाटप, मास्क वाटप, तसेच जनजागृतीचे काम केले.*

**लढवय्ये निसार अली आणि वैशाली महाडिक**

२४ मार्च २०२० पासून लॉकडाऊन सुरू झाल्याने सुरुवातीला काय करावे हे समजत नव्हते. तसेच कोरोनाच्या भीतीमुळे बाहेर पडायची हिम्मत होत नव्हती. आमचा मालवणी परिसर तसा दाटीवाटीचा, मुंबईच्या मालाड स्टेशनपासून लांब असलेला. मराठी, मुस्लीम, ख्रिश्चन, उत्तर भारतीय अशी मिश्र वस्ती असलेली वसाहत, लॉकडाऊन काळातील परिस्थिती बघता मन अस्वस्थ झाले होते. त्यातच पत्नी वैशाली ही मधुमेह आणि जास्त रक्तदाबाचा त्रास असल्याने आजारी. आपण मदतीकरिता घराबाहेर पडलो तर त्याचे परिणाम तिच्या आरोग्यावर व १२ वर्षीय मुलगी ईशाच्या आरोग्यावर होण्याची भीतीपोटी पाऊल पुढे पडत नव्हते. त्याच वेळी राष्ट्र सेवा दलाचे संस्कार घरीही बसू देत नव्हते. मालवणीमध्ये आम्ही राष्ट्र सेवा दलाची शाखा चालवितो, मी संघटक आहे. सेवा दलाचे ऑफिस आहे, चांगली टीम आहे आणि तरीही आम्ही काही करीत नाही ही खंतही होती. अशा वेळी माझी पत्नी वैशाली महाडिक आणि सेवादलामधले मित्र मनोज परमार, नमिता मिश्रा, गणेश, लालजी, साक्षर वेल्फेअर सोसायटीचे सर्व सहकारी यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे हिम्मत करत आम्ही दोघे बाहेर पडलो. राष्ट्र सेवा दलाचे मालवणी, मालाड विभागाचे संघटक निसार अली सय्यद कोरोना काळातला अनुभव सांगत होते.....

‘हातात कसली ही साधने नाहीत, नगरसेवक, आमदार किंवा कोणताही पक्ष पाठीशी नाही. सोबत आहेत फक्त राष्ट्र सेवा दलाचे संस्कार आणि सेवा दलाच्या कामाचा, विचारांचा भक्कम पाठिंबा आणि



कोविड काळात पोलिसांना सॅनिटायझर, मास्क वाटप करताना सहकाऱ्यांसोबत

हाक मारली तर सोबत उभी राहणारी मुंबई सेवा दलातली आणि मालवणीमधील मित्रमंडळी,' निसार अली सांगत होते.

गेल्या वर्षीच्या लॉकडाऊनपासून आजतागायत काम करणारे निसार अली सय्यद आणि वैशाली महाडिक हे सेवा दलातले कार्यकर्ता जोडपे. आंतरधर्मीय लग्न केलेले, विचाराने पक्के, डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या झाल्यानंतर मालवणीच्या रस्त्यावर 'विवेक जागर परिषद' भरविणारे निसार आणि वैशाली.

बकरी ईदच्या दिवशी कुर्बानीमधील थोडी रक्कम बाजूला काढण्याचे आवाहन मुस्लीम समाजातील तरुणांना करून, ती रक्कम सातारा जिल्ह्यातील माण, खटावमधल्या दुष्काळी गावात जाऊन अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हातात पोहचवून तसेच गेल्या वर्षी कोल्हापूर भागात आलेल्या पुराच्या वेळी पूरग्रस्त बांधवांना मदत देण्यासाठी पुढाकार घेणारे निसार अली या कोरोनाच्या काळात घरी कसे बसतील?

सावित्री उत्सवाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये खासदार सुप्रिया सुळे यांना भेटायला गेलो होतो तेव्हा सेवा दलाच्या कामाचा आणि विशेषत: निसार अलीचा विषय निघाला, तेव्हादेखील सुप्रियाताईंनी बकरी ईद निमित्ताने 'प्लाझ्मा डोनेशन' करण्यासंबंधी निसारने केलेल्या प्रयत्नाचे आणि ही मुस्लीम समाजातील तरुण मुले वेगळ्या पद्धतीने विचार करतात याचे कौतुकही केले.



बकरी ईद निमित्ताने कुर्बानीतील काही रक्कम बाजूला काढून समाजातील गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप

मार्च २०२०च्या शेवटच्या आठवड्यात साक्षर वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या व सेवा दलाच्या माध्यमातून सुरवातीला त्यांनी १५ गरजूंना रेशन मिळवून दिले. मात्र परिस्थिती बिकट होत असल्याने स्वत: अनेक संस्थांशी संपर्क केला व गरजूंना रेशन मिळवून देण्यास सुरुवात केली. मात्र तरी काही रोजंदारीवर काम करणारे मजूर, कारागीर, घरेलू काम करणाऱ्या महिला, सुरक्षा रक्षक, रिक्षा, टॅक्सी चालक अशा अनेक लोकांची परिस्थिती बिकट होत असल्याने त्यांना शिजवलेल्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी ३० मार्च २०२० पासून अवघे ३२ फूड पाकीट मिळवून कामाला सुरुवात केली. हळूहळू ३२ पाकिटांची ७०० पाकिटे कधी झाली ते त्यांना कळलेच नाही. यात साक्षर वेल्फेअर या संस्थेने जेवण पुरवले.

अनेक दिवसांपासून सरकार, पालिका, परिसरात sanitization बाबत काहीतरी करेल असे वाटत होते. मात्र काहीच हालचाल होत नव्हती आणि नागरिक कोरोनामुळे धास्तावले होते. अशा परिस्थितीत 'अपनी सुरक्षा अपने हाथ' ही मोहीम राबवत त्यांनी स्वखर्चाने 2 sanitization मशिन विकत घेतल्या व केमिकल खरेदी करून स्वत: ते, त्यांची पत्नी वैशाली व काही सहकारी, सुरेश शेलार, फारूक अली सय्यद, सुमित कनोजिया यांच्या सहकार्याने sanitization मोहीम त्यांनी सुरू केली. बघता बघता sanitization करण्याची मागणी वाढत गेली व लोक जोडत गेले. यात महिलाही पुढे आल्या व त्यांनी ही स्वत:च्या वस्तीचे sanitization करण्यास सुरुवात केली.



एकल महिलांना मार्गदर्शन करताना

हे करताना जाणवले की आपण सर्वत्र पोहचू शकत नाही मग त्यांनी ठरवले की प्रत्येक घरात जाऊन लोकांना sanitizationच्या गोळ्या देऊन त्यांना स्वत:च्या घर, परिसर sanitization करण्यासाठी प्रेरित करायचे. त्यासाठी पुन्हा स्वखर्चाने गोळ्या मागवून जवळपास ५०० घरांत त्यांनी गोळ्यांचे वाटप केले.

तसेच या दरम्यान मुख्यमंत्र्यांनी रक्तदानाची गरज असल्याचे माध्यमातून सांगितले. मग दिनांक १२ जून २०२०रोजी जसलोक हॉस्पिटलच्या मदतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले व त्यात ५५ नागरिकांनी रक्तदान केले. त्यानंतर पुन्हा एकदा रक्तदान शिबिर घेऊन ४९ लोकांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे यात मुस्लीम तरुणांची संख्या लक्षणीय होती.

केरळ सेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी पाठविलेले मास्कचे वितरण त्यांनी केले आहे. सेवा दलाच्या मध्यवर्तीने पाठविलेले तांदूळ हे गरजूंपर्यंत पोहचविले आहेत. Physical distancing बाबत जनजागृती सुरू आहे. त्याच बरोबर कल्याण, डोंबिवली, जोगेश्वरी, बोरिवली, माटुंगा, गोरेगाव पूर्व येथील काही गरजूंसाठी कडक लॉकडाऊन असतानाही रेशनची मदत त्यांनी मिळवून दिली आहे. काही कोरोना रुग्णांना बेड मिळवून देण्यासाठी पालिकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून बेड मिळवून दिले आहेत.

आता आलेल्या दुसऱ्या लाटेनंतरही निसार अलीने कामाला सुरुवात केली आहे. आज त्याच्याकडे फवारणी मारण्याची तीन मशिन आहेत. केमिकल ठेवण्यासाठी ड्रम, गोळ्या, मास्क आणि इतर




तामिळ वस्तीत सावित्री उत्सव पहिल्यांदा साजरा करताना सहकाऱ्यांसोबत




मणिपूर हिंसा विरोधात सर्वपक्षी, तसेच समविचारी संस्था संघटनांच्या वतीने निदर्शने करताना




मढ येथे तरुणांच्या व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेच्या वेळी ग्रुप फोटो

साहित्याची गरज आहे हे सांगण्यासाठी त्याने मला फोन केला होता. औषधाची फवारणी, गोळ्या वाटप, पोलिसांना मास्क, आणि लसीकरण करण्यासाठी लोकांना आवाहन करण्यासाठी पत्रके, बॅनर सह प्रचार यंत्रणा उभी करायची आहे. कारण अजूनही आमच्या वस्तीत लसीकरण मोठ्या संख्येने होत नाही असे निसारने सांगितले. त्यानंतर सेवा दलातल्या काही मित्रांशी मी बोललो. थोडी-फार आर्थिक जुळवाजुळव झाली आणि त्याने काम सुरू केले आहे. दोन-चार वर्तमानपत्रांत तो स्ट्रिंजर पत्रकार म्हणून काम करतो त्यावर त्याचे घर चालते. पण त्याचा पिंड हा समाज कार्यकर्त्याचा. अगदी प्रामाणिक कार्यकर्ता. काही दिवसांपूर्वी मालवणीमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्याला मारहाण केली होती. लॉकडाऊन असताना मुख्यमंत्री, पालक मंत्री 'सोशल अंतर पाळा, सार्वजनिक, गर्दीचे कार्यक्रम टाळा' असे आवाहन करतात आणि त्यांच्याच पक्षाचे नगरसेवक 'सेल्फी पॉईंटचे' उद्‌घाटन करून ढोल-ताशा वाजवून गर्दी गोळा करतात, त्या वेळी निसारने नगरसेविकेला प्रश्न विचारला. त्याचा राग येऊन कार्यकर्त्यांनी निसारला मारहाण केली. त्याच्या तक्रारीची एक महिन्याने दखल घेतली गेली.

चिपळूण येथे आलेल्या पुरामध्ये पूरग्रस्तांच्या मदतीला निसार आणि वैशाली धावून गेली. आमच्या सोबत निसार आठ-दहा दिवस पुरात काम करीत होता. घरात, दुकानात घुसलेला गाळ काढत होता. मुंबईहून आणलेली मदत घराघरात जाऊन पोहचवत होता. एस.टी. स्टँड, सरकारी कार्यालय, येथे औषधाची फवारणी करीत होता.

मागील काही वर्षांपासून तो आणि वैशाली एकल महिलांसोबत काम करीत आहे. त्यांच्यासोबत




मुंबईतील गोरेगाव येथील आरे या नैसर्गिक जंगलातील झाडांची कत्तल विरोधातील आंदोलनात

सहली आयोजित करणे, प्रशिक्षण शिबिरे घेणे, सांस्कृतिक कार्यक्रम करणे असे उपक्रम तो करीत असतो. एकल महिलांना सरकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून मार्गदर्शन शिबिराचे आणि त्यांच्या काही मुलींच्या शालेय फीची व्यवस्था करणे. नशा मुक्तीसाठी कार्यशाळेचे आयोजन. सर्वधर्मीय सलोखा कायम राखण्यासाठी मशिदीमध्ये दिवाळी आणि ईद मिलनचे तो कार्यक्रम आयोजित करीत असतो. यंदा बकरी ईदच्या कुर्बानीमधून मिळालेल्या रकमेतून त्याने १५० गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. कर्करोग तपासणी शिबिर, डोळे तपासणी शिबिर, १५ वर्षांखालील मुलांना मोफत चष्मा वाटप असेही उपक्रम तो करीत असतो.

सानेगुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलाप्रमाणे, 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या भावनेने काम करणाऱ्या निसार अली आणि वैशाली महाडिक यांना सलाम.....

पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन.

शरद कदम
मो. ९२२४५७६७०२

# भालचंद्र नेमाडे भाषण

**मागील वर्षाच्या (२०२३च्या) पुरस्कार समारंभाचे प्रमुख पाहुणे होते प्रा. भालचंद्र नेमाडे. त्यांनी समारंभात केलेले हे भाषण**

महाराष्ट्र फाउंडेशनचे अमेरिकेचे अध्यक्ष आणि इतर सर्व कार्यकारी सभासद, शोभा चित्रे वगैरे, कार्यक्रमाचे निमंत्रक मासूम, साधना आणि इथं जमलेले पुरस्कार विजेते, सुदैवानं मी त्यांचा मित्र आहे, मी त्यांचा वाचक आहे, अतिशय मनापासून वाचणारा, सुदैवानं मी त्यांचं सगळंच वाचलेलं आहे त्यामुळे मी त्यांच्याबद्दल चांगलं बोलू शकतो अशी परिस्थिती आज आहे. दुसरं, समोर आज फार मोठमोठे लोक असावेत. अंधार असल्यानं मला सारे दिसत नाहीत. पण कुमार केतकर दिसत आहेत. पण बरीच चांगली मंडळी आहेत. दुर्दैवानं मी त्यांच्यासमोर काही बोललो तर त्यांनी मला माफ करावं. मी मनाला येईल ते बोलतो. ते आपण सगळं सहन करावं, एवढीच मी आपल्याला विनंती करतो..

मित्रहो, गेली २८ वर्षं हा ज्ञानयज्ञ सुरू आहे. आजचे सगळेच विचारवंत म्हणतात की, जग हे 'हॅवज्' आणि 'हॅव नॉटस्'मध्ये विभागलेलं आहे. आणि त्यांच्या परस्परसंबंधांवर जगात सगळं चालतं. दुर्दैवानं आपल्या देशात 'हॅव नॉटस्'च वाढत आहेत कायम आणि अमेरिकेत कायम 'हॅवज्' वाढत आहेत. त्यातल्या त्यात आपलं सुदैव की, अमेरिकेत बरेच मराठी लोक 'हॅवज्'मध्ये जाऊन बसलेले आहेत आणि त्यामुळे आपल्याला - बौद्धिक ज्ञानाचा म्हणा किंवा इतके सगळे लोक बक्षीसपात्र आहेत हे दाखवण्याचा म्हणा किंवा एकूण ज्यांचा सत्कार होतो त्यांची पात्रता, श्रेष्ठता दाखवण्याचा म्हणा - फायदा होतो आहे. एवढ्या सगळ्या गोष्टी फक्त 'हॅवज्' करू शकतात. नाहीतर महाराष्ट्र सरकारही दर वर्षी बक्षिसं देतं, अर्ज मागवून घेऊन! त्यात काही अर्थ असतो का? त्यात बहुधा खराब लोकांनाच बक्षीस मिळत असतात. मी 'कोसला' लिहिली तेव्हा तर मी विद्यार्थी होतो. तेव्हापासून मी एकदाही महाराष्ट्र सरकारच्या पुरस्कारासाठी अर्ज केलेला नाही. त्या पुरस्कारासाठी अर्ज करावा लागतो आणि त्यामध्ये बऱ्याच अटी असतात. 'कोसला' मी पुण्यातच 'रा. ज. देशमुख आणि कंपनी'मध्ये बसून लिहिली. तिथंच बाजूला शहाणे होता. तिथं अशोक शहाणेने 'क्ष किरण' लिहिला. ते सगळं मी आता आठवतो आहे.

त्या वेळेला श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर असे लोक पुरस्कारासाठी अर्ज करायचे. त्या अर्जात असं लिहून द्यावं लागायचं की, 'या पुस्तकातला सगळा मजकूर मी स्वत: लिहिलेला आहे.' मला वाटायचं आता हे सगळं मीच लिहिलेलं असल्यानंतर पुन्हा अर्जामध्ये तसं कशाला लिहून द्यायचं? पण परिस्थिती अजूनही तशीच आहे. पण ही सगळी माणसं ते अर्ज भरून पाठवायची. आणि कितीची बक्षिसं असायची ती? अडीचशे रुपयांची! बऱ्याचदा ते बक्षीसही विभागून मिळायचं. अशा काळामध्ये 'महाराष्ट्र फाउंडेशन' एकेक लाखाचं बक्षीस देत होतं. मला ते मिळालं २००१ मध्ये. तेव्हा मला साहित्यिक असल्याचा खरंच आनंद झाला. अडीचशे रुपयांचं बक्षीस मिळालं नाही तरी चालेल पण एक लाखाचं मिळतंय ना मग चांगलं झालं! असा 'हॅवज्' आणि 'हॅव नॉटस्'मधला फरक मी आपल्यासमोर मांडतो.

तर मित्रहो, अशा प्रसंगी मला चार शब्द बोलण्याची त्यांनी परवानगी दिली, मला इथं बोलावलं याचा मला आनंद आहे. पण माझे मित्र सुनीलही आता आपल्यात नाहीत हे पाहून मला भडभडून आलं. ते एकदा स्वत:हून माझ्या घरी आले होते. मुंबईत कुठलातरी पुरस्कार द्यायचा होता. आणि ते अतिशय लीनतेनं मला सांगत होते, 'कृपा करून तुम्ही वेळ काढून येता का? एक बक्षीस द्यायचं आहे.' एवढा सत्शील आणि मराठीवर अतिशय प्रेम करणारा माणूस 'हॅवज्'मधलाच असू शकतो. हे वाढावं असं मला वाटतं. आणि त्याच्यावरच मी जास्त बोलणार आहे.

मराठी संस्कृती आजच्या इतकी संकुचित कधीच नव्हती. २०२३ मधली जी मराठी संस्कृती आहे, ती सगळ्यात खालची आहे असं मी मानतो. मी नेहमी 'एक्स्ट्रीम' बोलतो. तसंच आहे हे. पण तरीही तुम्ही लक्षात घ्या की, मी हे खरं बोलतो आहे. आज आपली परिस्थिती इतकी वाईट आहे, आज बक्षिसं इतक्या खराब लोकांना दिली जातात, ज्यांना जाहीर होतात त्यांनाही ती प्रत्यक्षात दिली जात नाहीत. हे साहित्यातलं वातावरण आहे बाकीचं तर काही जास्त बोलण्यात अर्थ नाही. आपल्या सर्वांना ते माहीतच आहे. या सगळ्या वातावरणामध्ये महाराष्ट्र फाउंडेशननं फार मोठं काम केलं आहे. ते जर अडचणीत असले आणि आपण 'हॅव नॉटस्'मध्ये असलो तरी आपण त्यांना काही मदत करू शकतो असं मी माझ्या वतीनं त्यांना सांगू शकतो. कारण 'हॅव नॉटस्'मध्येही काहीतरी पॉवर असते ना थोडी तरी. ती तरी आम्ही दाखवू. त्यामुळे तुम्हाला काही लागलं तर आम्हाला कळवत चला, आम्ही करू अशी मी त्यांना विनंती करतो.

आज मी बोलणार आहे ते मुख्यत: समाजकार्य आणि साहित्य यावर. साहित्यावर मी जास्त चांगलं बोलू शकतो कारण सामाजिक कार्याचा मी काही फारसा अनुभव घेतलेला नाही. चार-पाच वर्षं मी सामाजिक कार्य केलं. एक विद्यापीठ दुरुस्त करायचा प्रयत्न केला. साधारणत: पाच वर्षांची मुदत असते. त्यात मला लोकांनी निवडून दिलं काहीतरी करेन म्हणून. पण पाच वर्षांनंतर मी कानाला खडा लावून म्हटलं की, यापुढे सामाजिक कार्य करायचं नाही. पाच वर्षं वाया गेली, घरातलं वातावरण बिघडलं. व्हाइस चान्सलरच्या घरी युनिव्हर्सिटीचा ट्रॅक्टर महिनाभर होता. त्यामुळं इकडं विद्यापीठातली काम अडली होती, त्याच्यासाठी आम्ही भांडत होतो आणि घरामध्ये अडचणी. अशा परिस्थितीत आम्ही समाजकार्य केलं. पण असं करू नये हे मी त्यातून शिकलो. कारण त्यानं काही होत नाही. परत समाज होता तसाच होतो. असं आपलं दुर्दैव आहे.




अशा परिस्थितीत आपण काय करावं, असं मला वाटतं. हे मी अगदी खरं बोलतो आहे. नंतर मी सामाजिक कार्यात कधी भाग घेतला नाही. नंतर मी फक्त लिहिलं आणि वाचलं. आणि तेच मला मोठं सामाजिक कार्य वाटतं. दुसरं काही करू नये. दुसरं एक मला यानिमित्ताने आठवतं की, इतके सगळे चांगले चांगले लोक आता लिहायला लागले आहेत. आमच्या वेळी एकाच वर्षी एकदम चार-पाच लोक चांगलं लिहिणारे नव्हते. हे इतके सगळे लोक व्यवस्थित लिहितात आणि अजूनही बरेच असतील. पण हे तर समोर आहेतच. मी वाचलेलं आहे यांचं. आणि ते अतिशय मनापासून काम करतात. मला २००१ मध्ये हे बक्षीस मिळालं होतं. त्या वेळी निवड समितीत जे लोक असायचे त्यांना पत्र दिलं जायचं की, अत्यंत नि:स्वार्थी आणि उदारमतवादी पद्धतीनं जे लिहितील त्यांच्याच नावांची शिफारस करावी. अजूनही ते असणार. हे नि:स्वार्थी आणि उदारमतवादी लोक आहेत. समाजाला पुढे नेणारे लोक असेच असतात. जे आहे ते समाजाला दाखवणं याहून दुसरं काही ते करू शकत नाहीत. पण एवढं केलं हेच खूप असतं. कारण आपल्याकडे त्याची परंपराच आहे. ज्ञानेश्वरांपासून ते मुक्ताबाईपर्यंत. मुक्ताबाईलासुद्धा ज्ञानेश्वरांना 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हे म्हणावं लागलं. 'संतमुखे व्हावे पाणी'. बाकीचं काय होईल ते होईल, लोक आगी लावू देत. आपण संतमुखाने पाणी देत राहावं ही आपली परंपरा आहे. आणि हे पाणी आपण वाढवलं पाहिजे. इथल्या सगळ्यांची माफी मागून मी

म्हणतो की, समाजकार्यातून फार काही घडत नाही असा माझा अनुभव आहे. परत परत आपण त्याच त्याच ठिकाणी येतो.

मराठी संस्कृती अगदी अफगाणिस्तानापासून सगळीकडे पसरलेली होती. काही उदाहरणं सांगतो. जम्मू भागामध्ये 'डोगरा' भाषा आहे. त्या भाषेत सत्यरंजन साठे नावाचे साहित्यिक आहेत, त्यांना पुरस्कार मिळाला. मी म्हटलं हे एकारान्त, म्हणजे मराठीच दिसतात. मी त्यांना विचारलं की, तुम्ही साठे असून- मराठी असून - डोगरा कसे? ते म्हणाले की, आमचे पूर्वज मराठीच होते. पण आम्ही पानिपतच्या लढाईमध्ये पकडले गेलो. आणि त्यांना अब्दालीने महिनाभर काबूलजवळच्या एका छावणीमध्ये डांबून ठेवलं आणि नंतर सोडून दिलं. अतिशय लिबरल माणूस होता. आपल्या इतिहासात खोटंच सांगितलं जातं. पण तो अतिशय लिबरल, मोठ्या मनाचा माणूस होता. शिवाजी महाराजांसारखीच त्याची अफगाणिस्तानामध्ये परंपरा आहे. हे मी तिकडचं साहित्य वाचून ठरवलं आहे. युद्धामध्ये मारामाऱ्या होतातच. आपले लोकही तसेच करतात, तेही तसेच करतात. पण तो दुष्ट होता आणि आपले लोक खूप चांगले होते, असं म्हणता कामा नये. तोही चांगलाच होता. एक महिन्यानंतर त्यानं या सगळ्यांना सोडून दिलं. हे सगळे लोक मग पुण्यात आले. तेव्हा पुण्यातल्या कर्मठ लोकांनी सांगितलं की, तुम्ही मुसलमानाच्या छावणीत महिनाभर जेवलेला आहात. तुम्ही आता बाटलात. तुम्ही आता ब्राह्मण राहिलेला नाहीत. तुम्ही कृपा करून इथे राहू नये. पण हे लोकही पक्के एकारान्तच होते. ते त्यांना म्हणाले, 'तुम्ही गेला खड्ड्यात! आमचं आम्ही बघतो.' त्यांनी जम्मूमध्ये जाऊन स्वत:चं राज्य वसवलं. मागे मी तिथं गेलो होतो, तिथं अगदी मराठी वातावरण होतं. तशाच पद्धतीचा स्वयंपाक, तशाच पद्धतीचं बोलणं-चालणं. आता ते बरेचसं काश्मिरी होत चाललं आहे. मराठीची अशी परिस्थिती १९४७ सालापर्यंत होती.

आपण मागं मागं गेलो तर आजच्यासारखी परिस्थिती होती का? तर अजिबात नव्हती. आपले लोक सगळीकडे क्रांती करणारे होते. मोठमोठ्या गोष्टी करून मराठी लोकांनी खूप क्रांती केलेली आहे. माझ्या नव्या कवितासंग्रहाचं नाव 'सट्टक' आहे. तो तमाशाचाच एक प्रकार होता. दुर्दैवानं पेशवाईच्या काळात त्याचं 'तमाशा' झालं. पण खरा तो 'सट्टक' नावाचा प्रकार होता आणि पाणिनीपासून त्याचे उल्लेख आहेत. काशीमधला एक विद्वान माणूस तामिळनाडूमधल्या एका विद्वान माणसाला 'महाराष्ट्री'तलं 'अमुक अमुक सट्टक तुम्ही वाचलं आहे का', असं विचारतो असा एक उल्लेख आहे. म्हणजे इसवी सनाच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून त्याचे उल्लेख आहेत. हा आपला मराठी फॉर्म देशभर वाचला जात होता. राजशेखरानं खूप सट्टक लिहिलेले आहेत. 'कुवलयामाला'पासून सगळे सट्टकच आहेत. आमच्याकडे खानदेशात बाया जेव्हा भांडायच्या, तेव्हा तेव्हा त्यांच्या शिव्या कशा असायच्या? 'ये बाहेर.. मी तुझी सट्टक काढते.' तेव्हा मला वाटायचं की, ही काय भानगड? नंतर असं लक्षात आलं की, सट्टक काढते म्हणजे तुझा तमाशा करते असा त्याचा अर्थ होतो. तर हा मराठी फॉर्म त्या वेळी देशभर वाचला जात होता. आज काय परिस्थिती आहे? आज मराठी साहित्याला आपल्या संकुचित बुद्धीमुळे आहे का देशभर प्रसिद्धी? नाही. आणखी एक उदाहरण देतो. मघाशी मी ज्या डोगरा भाषेचा उल्लेख केला, त्या भाषेची सुरुवात आपल्याकडल्या मधुसूदन साठे नावाच्या एका मराठी माणसाने केली. आपल्याकडे जसे ज्ञानेश्वर समजले जातात, तसेच मधुसूदन साठे हे डोगरा भाषेचे

निर्माते आहेत. आजही डोगरा भाषा भारतातल्या २५ भाषांपैकी एक अशी आपल्या संसदेने मान्य केलेली भाषा आहे. तिचे संस्थापक आपले मराठी आहेत. हे मी अभिमानाने सांगत नाही, देशीयतेचं एक तत्त्व मी सांगतो आहे. आपण देश हा असा अफाट मानला. कसा आपण हा अफाट देश बांधला! 'अंबिकातनयदत्त' द. रा. बेंद्रे हे कानडीतले क्रांतिकारक कवी, तेही मराठी होते. घरात ते मराठी बोलत होते. ओडिया भाषेतले पहिले क्रांतिकारक कवी आहेत, राधाकृष्ण राव. आमचे मित्र रमाकांत रथ आणि सीताकांत महापात्र म्हणतात की, राधाकृष्ण राव यांच्या व्याकरणामुळे आम्ही नीट ओडिया बोलतो. मराठी माणसाची आज ही परिस्थिती आहे. त्यांनी जे व्याकरण लिहिलं, त्याच्यामुळे अजूनही लोक त्यांचं नाव घेतात. आपल्याकडच्या शाळांमध्ये अजूनही जसं दामले व्याकरण आहे तसं ते तिथं समजलं जातं. आणखी एक उदाहरण सांगतो. आपले तंजावरचे भोसले, तामिळनाडूमध्ये खूप क्रांती केलेले... नाटकांमध्ये, संगीतामध्ये त्यांनी खूप काम केलेलं आहे. ते इकडून गेलेले मराठीच गृहस्थ होते. तामिळमध्ये जो सांबार नावाचा शब्द वापरला जातो तो मुळात मराठी आहे. मूळ आपण 'संभार' असं म्हणत होतो, तो तिकडे 'सांबार' झाला आणि मग नंतर देशभर पसरला. आपण आता इतके संकुचित झालो आहोत की सांबार काय आपण चटणीसुद्धा देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे!

मिर्झा गालिबचा काका शिंद्यांच्या पदरी वाढला. ताजमहाल बांधणाऱ्या शहाजहानची आई हिंदू होती. आपण त्यांना मुसलमान म्हणतो ते चुकीचं आहे. बाप अर्धा असतो तशी आईही अर्धी असते. शहाजहाननं उपनिषदांची भाषांतरं केली. मोठमोठे संस्कृत ग्रंथ करवून घेतले. आता संकुचित झाल्यामुळे आपण हिंदू-मुसलमान, तामिळनाडू-महाराष्ट्र ही विभागणी केली. अशी मराठी संस्कृती आधी नव्हती. सगळीकडे देणं-घेणं होतं. शिंदे, होळकर हे तर त्याचं उदाहरणच आहे.

आणखी अशी मी बरीच उदाहरणं सांगू शकतो. पण आज अमेरिकेतले हे जे लोक मराठीकडे आस्थेने पाहतात हे आपण जरा समजावून घेतलं पाहिजे. दर वर्षी दोन-अडीच लाख भारतीय लोक परदेशात कायम स्थायिक होतात. त्यात मराठीही खूप असतील. ते परत येत नाहीत. एवढे लोक आपण देत राहतो. पण ते इकडचीच संस्कृती घेऊन गेलेले असतात. ती संस्कृती आपलीच समजली पाहिजे. यातला देश आणि राष्ट्र यातला फरक मी तुम्हाला नंतर सांगतो. पण हे देशीच लोक आहेत. त्यामुळे ते मराठीची आस्था ठेवून हे काम करतात. मग राष्ट्र कोणतंही असो. राष्ट्र हा एक भंपक असा प्रकार आहे हे मी मुद्दाम सांगतो. 'नॅशनॅलिझम इज अ सीन' हे जर्मन तत्त्वज्ञांनी शोधून काढलं. पण राष्ट्रवादामुळे युरोपचं जे नुकसान झालं ते नंतरच्या काळात त्यांनी आपलंही केलं. आपली राष्ट्रं त्यांनी तयार केली. पाकिस्तान वेगळा, हिंदुस्थान वेगळा, बांगलादेश वेगळा हे कोणी सांगितलं? हे लोक वेगळे नाहीतच. हे एकच आहेत. मूर्ख लोक हिंदुस्थानात काय कमी आहेत, तसे तिकडंही आहेत. सगळीकडचेच लोक कष्ट करतात. अगदी तुम्ही पाकिस्तानात गेला तरी तिथल्या बिचाऱ्या बाया कडेवर मुलं घेऊन कामावर जात असतात. त्यांना काय करायचं आहे राष्ट्र? पण आपली मिलिटरी खराब असते, राज्य खराब असतं. राष्ट्र' (नेशन) आणि राज्य' (स्टेट) यांच्यात हा फरक आहे. देशी असणं याचा अर्थ तुम्ही या सगळ्यांवर प्रेम करणं. देशी लोक इकडंही आहेत तिकडंही आहेत. ते आपापलं काम करतात. मध्ये जे काही राष्ट्रीय हरामखोर लोक आहेत, त्यांनी या सगळ्या भानगडी केलेल्या आहेत. शिक्षणावर तुमचा तीन-साडेतीन टक्के खर्च आणि युद्धावर बारा-साडेबारा टक्के खर्च? हे लोक

आपल्याला कशाकरता पाहिजेत? शिक्षणावर खर्च नाही आणि आपले लोक जास्तीत जास्त अडाणी होत चाललेत. मी १९९८ मध्ये मुंबई विद्यापीठातून निवृत्त झालो. आता २४-२५ वर्षं होत आली, ती जागा अजून भरलेली नाही. तौलनिक साहित्य भारतात दोन ठिकाणी शिकवलं जातं जाधवपूर विद्यापीठ, कोलकाता आणि मुंबई विद्यापीठ. आता गेली २५ वर्षं तो विषय शिकवला जात नाही. म्हणजे आपली मुलं अडाणी होत आहेत की नाही? मराठी किती जुनी होती आणि ती कशाशी संबंधित आहे, हे जे मी अभ्यास करून शिकवत होतो ते आता कोणाला माहीत नाही. मराठीमध्ये 'ज्ञानेश्वरमाने पहिला' असंच शिकवलं जातं. ज्ञानेश्वर अजिबात पहिला नाही. ज्ञानेश्वरीच्या आधी मोठमोठे संग्रह होते. कथासरित्सागर, गुणाढ्याचं बृहत्कथा हे मराठीच आहे. जैन महाराष्ट्रीमध्ये किती ग्रंथ आहेत. समराईच्चकथा, धूर्ताख्यान, कुवलयमाला हे मोठमोठे संग्रह आहेत, कविता आहेत. एका चर्चासत्रामध्ये मी सांगितलं की, कादंबरी हा फॉर्म युरोपियन आहे हे कोणी सांगितलं? हा मराठीच फॉर्म आहे, कारण जगात पहिली कादंबरी मराठीतच लिहिली गेली. समराईच्चकथा किंवा वसुदेव.... (?) ही अतिशय सुंदर कादंबरी आहे. दुर्दैवाने आपल्या विद्यापीठांमध्ये त्या शिकवल्या जात नाहीत, त्या मिळतही नाहीत कुठे. मराठीचं जे काही मोठेपण होतं आणि जो काही सगळीकडे प्रसार होता, तो आपण पुन्हा आणला पाहिजे तरच आपलं दारिद्र्य मिटेल. हे असं संकुचित राहून आणि नुसतं मराठी आणि ज्ञानेश्वरमाने पहिला, हे काही कामाचं नाही. आधी खूप मराठी लोक होते आणि खूप मोठे मोठे ग्रंथ झाले आहेत. गुणाढ्याची बृहत्कथा, त्याचं पुढे संस्कृतमध्ये कथासरित्सागर झालं आणि ते संस्कृतमधून मग आपल्याकडे भाषांतरित झालं. पण आपलं प्राकृतमध्ये असलेलं बृहत्कथा पहिल्यांदा जर्मन लोकांनी भाषांतरित केलं. त्याच्यामध्ये एक अशी गोष्ट आहे की, एक माणूस सकाळी उठला आणि त्याला असं वाटलं की, आपण किडा झालेलो आहोत.. मला एकदम 'मेटॅमॉर्फसिस' आठवलं की, हे काफ्काला कसं काय कळलं? 'काफ्काची मेटॅमॉर्फसिस' अशीच आहे. एका घरामध्ये एक माणूस असतो तो बिचारा सकाळी उठतो आणि त्याला वाटतं की, आपण अंथरुणावर किडा होऊन पडलेलो आहे. तो नुसता वळवळ वळवळ करतो आणि घरातले लोकही वू वू करतात. बहीण पळून जाते. घरातले लोक म्हणतात की, याला उचला. त्याला कोपऱ्यात टाकतात आणि त्याच्याशी कोणी बोलत नाही. आणि मग पुढे त्याची ती मेटॅमॉर्फसिस नावाची जगप्रसिद्ध गोष्ट आहे. काफ्का हा फार मोठा लेखक समजला जातो. त्या गोष्टीतलं जे सूत्र किंवा मोटिव्ह आहे, ते मराठी कथेतलं आहे. हे आता कोण कुणाला सांगणार? असं सांगितलं तर लोक हसतील. हा काही खोटा राष्ट्राभिमान वगैरे आहे का? राष्ट्राभिमान वेगळा आणि देशाभिमान वेगळा हे मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे. हे आपल्याला शिकलं पाहिजे.

'रॉबिन्सन क्रूसो' आणि 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' या इंग्रजीतल्या पहिल्या कादंबऱ्या समजल्या जातात. त्या अप्रतिम आहेत. परवाच मला वाचता वाचता कळलं की, रॉबिन्सन क्रूसो ही मुळात चिनी कथा आहे. त्या कथेमध्ये एक बाई असते. तिला बेटावर अडकवून टाकतात. ती तिथं शेती करते. मार्को पोलोने ती गोष्ट एका कुठल्यातरी जर्मन माणसाला सांगितली. ज्याला सांगितली तो माणूस कैदेत होता. त्याच कैदेत 'रॉबिन्सन क्रूसो'चा लेखक डॅनियल डिफोसुद्धा होता. तो हेरगिरी वगैरे करायचा म्हणून त्यालाही पकडून कैदेत टाकलं होतं. त्याला ती गोष्ट तिथं सापडली. अरे, ही चांगली आहे चिनी गोष्ट, असं

त्याला वाटलं. मग हेरगिरीच्या आरोपातून सुटका झाल्यानंतर त्यानं ती गोष्ट लिहिली. मूळच्या गोष्टीत बाई होती तिचा पुरुष केला. खरं तर पुरुष काही शेती करू शकत नाही. शेती ही स्त्रीचीच कर्तबगारी आहे. हंटिंग, गॅदरिंग स्टेजपासून इसवी सनाच्या पूर्वी २०-२५ हजार वर्षांपूर्वीपासून ते इसवी सनाच्या १५ हजार वर्षांपूर्वी शेती सुरू झाली तोपर्यंतची (म्हणजे 'मोहेंजोदारो'च्या थोडा आधीचा काळ) जी काही डेव्हलपमेंट आहे, हिमयुगानंतरची जी शेतीची अवस्था आहे, ती खरं तर बायकांनीच वाढवली. पुरुषांनी शिकार वगैरे करायची आणि बायकांनी शेती करायची. ती बाई बेटावर सापडली आणि मग शेती पुढे वाढली, हे चिनी कथेतलं बरोबर होतं. डिफोला ते माहीत नसल्यामुळे त्यानं चुकीचं सगळं केलं. इंग्लंडमध्ये शेती आहेच कुठे? तर अशी ही आपल्याकडे सगळी एकूण जागतिकीकरण वगैरेची परिस्थिती आहे, इकडचं सगळं तिकडे सहज जात असतं. कुठलेही फॉर्म आपण स्वत: निर्माण केलेले नसतात, ते देणंघेणं असतं. पण त्याचं सारखं देशीकरण होणं आवश्यक असतं. जसं त्यांनी देशीकरण केलं तसं आपण बाहेरून जे घेतो ते आपल्याशी जुळवून घेतलं पाहिजे. ते आपलं झालं पाहिजे. आणि तरच मग आपण उदारमतवादी होतो, विस्तारित होतो आणि असं म्हणत नाही की, हा ताजमहाल मुसलमानांचा आहे. मलिक अंबरचं मी मघाशी उदाहरण घेतलं. त्यानं मराठ्यांना एकत्र केलं आणि त्यांना सांगितलं की, तुम्ही एक होऊन या मोगलांना हाकला. मराठी बाणा त्यानं घेतला. शेतसारा नवीन पद्धतीने वसवला. ती पद्धत हिंदुस्थानात इतरत्र कुठे नाही! शेतकऱ्याची जमीन, सातबारा हे मलिक अंबरचं देणं आहे. हे आपण विसरायचं? हा कोण होता बिचारा? तो इथिओपियामधला निग्रो. आठ वर्षांचा असताना त्याला बगदादमध्ये विकलं. इथल्या निजामशहाने त्याला घेतलं. इथे येऊन स्वत:च्या शौर्यानं तो मोठा सेनापती झाला. त्यानं हे सगळे मराठे एकत्र केले, अगदी जिजाबाईच्या लग्नाच्या बाबतीतसुद्धा ते वरच्या दर्जाचे आणि हे खालच्या दर्जाचे म्हणून शहाजीला ते देत नव्हते. त्या वेळी त्यानंच कान धरून सांगितलं की तुम्ही एकच आहात, असं काही चालणार नाही, हे करा आणि त्याच्या खालच्या सगळ्यांना ते ऐकावं लागलं. मग पुढे जिजाबाई, शिवाजी महाराज ही सगळी परंपरा सुरू झाली. ती आपण शहाजीराजांपर्यंतच का नेतो? त्याच्यामागे मलिक अंबरपर्यंत का नाही नेत? कारण आपला संकुचितपणा. हा संकुचितपणा मराठीला फार नडतो आहे. आणि त्यामुळे तो सारखा साहित्यातसुद्धा येतो. याचं मी एक शेवटचं उदाहरण घेतो आणि संपवतो.

परदेशात जाणारे हे जे आपले लोक आहेत, त्यांना मराठी संस्कृती जिथं कुठं दिसेल तिथं त्यांना असं वाटेल की, आपल्याकडे का नाही असं? अगदी सेव्हन सिस्टर्स, ब्रह्मदेशपासून अफगाणिस्तानपर्यंत गेलं तर लक्षात येतं की, हे सगळं एकच होतं. पण हे सगळं जर एकच होतं तर याची राष्ट्रं आपण कशाकरता केली? फरक आहेच कुठे त्यांच्यात? आधी सगळे एकमेकांमध्ये लग्नं करत होते. जातीसंस्थासुद्धा सातव्या शतकापर्यंत नव्हती. अर्जुन जिकडे जाईल तिकडे लग्नं करायचा. बाणभट्टानं आत्मकथा लिहिली आहे. तो इकडे दक्षिण महाराष्ट्रात आला. तिथं कुठल्या तरी बाईनं अतिशय चांगला स्वयंपाक केला. तो म्हणाला की, इतका चांगला स्वयंपाक इतक्या कमी वेळात कसा काय केला? ती म्हणाली, 'आमची मुलगी आहे, तिने केला.' मग तो म्हणाला, 'कोण आहे तुमची मुलगी?' मुलगी पाहिल्यानंतर तो म्हणाला, 'अरे, ही इतकी हुशार मुलगी... मला बायको नाही, मी हिला करू का?' तेव्हा तिची आई म्हणाली, 'अहो, आम्ही खालच्या दर्जाचे. तुम्ही...' त्यावर तो म्हणाला, 'असं काही

नाही.' मी जरी पंडितबिंडीत असलो तरी मला तुमची मुलगी द्या.' अशी ही इसवी सनाच्या सातव्या शतकापूर्वीची गोष्ट आहे. ती त्यानं स्वत: लिहून ठेवलेली आहे. ती खरी नाही मानायची तर काय? होत्या कुठे जाती त्या वेळी? पण नंतर हे वाढत गेलं. चक्रधरांपासून ज्ञानेश्वर, तुकाराम या सगळ्यांना या संकुचित वृत्तीचा त्रास झाला. सगळ्यांना मारून टाकण्यात आलं. एकनाथालाही. म्हणतात ते गंगेत बुडाले. पण बुडवलंच असणार. तुकाराम हवेत गेले असं म्हणतात. हवेत कोणी जातो का विमानातून? पण विमानातून यांनीच त्यांना घालवलं. ज्ञानेश्वराला जिवंत समाधी घ्यावी लागली. कशामुळं? मुक्ताबाईनं त्याला सांगितलं होतं की, हे बरोबर नाही. तरी बिचाऱ्याला नको वाटलं. इतका त्रास. संन्यासी म्हणून परत आल्यामुळे आई-बापांना तर त्रास होताच, पण यांनाही सगळ्यांना त्रास. अशी ही सगळी परंपरा आजपर्यंत आहे. अगदी दाभोलकरांपर्यंत. अगदी खिसेकापूसुद्धा पकडला जातो आणि १० वर्षांपूर्वी माणूस मारणारा सापडत नाही. ही काय मराठी संस्कृती आहे का? करायचं काय ह्याला?

म्हणून आपल्याला हे पुरस्कारप्राप्त लोक करतात ते काम वाढवलं पाहिजे. आपले लोक उझबेकिस्तानापर्यंत आहेत. पंजाब, मध्य प्रदेशमध्ये आपली संस्कृती आहे. मोठमोठे साहित्यिक, कलाकार आपण निर्माण केले आहेत. या सगळ्यांचा एक व्ह्यू घेतला तर केवढा विशाल आपल्या संस्कृतीचा कोश आहे. आणि तो दुर्दैवाने आपण घालवला. आपण आता संकुचित होत गेलो. त्यामुळे आपल्याला हे सहन करावं लागत आहे. आता असे सामाजिक कार्यकर्ते किंवा साहित्यिकच काही करतील तर आपल्याला यातून बाहेर पडता येईल.

मित्रहो, मी आपल्यासमोर मनात येईल ते बोललो. पुन्हा एकदा पुरस्कार विजेत्यांचं मी अभिनंदन करतो. मलाही हा पुरस्कार मिळालेला असल्यामुळे मला फार आदर आहे या पुरस्काराबद्दल. शेवटी पुरस्कारांचं मोठंच जग आहे नोबेल पुरस्कारापर्यंत. चर्चिलसारख्या मूर्ख माणसाला नोबेल पुरस्कार मिळाला, त्याच वर्षी महात्मा गांधींचं नाव होतं. महात्मा गांधींना मिळत नाही आणि चर्चिलला मिळतो? जगातल्या सगळ्या देशांमध्ये महात्मा गांधी स्ट्रीट असतो, महात्मा गांधींचा पुतळा असतो. त्यांना नोबेल नाही आणि चर्चिलसारख्या मूर्ख माणसाला तो पुरस्कार? असंसुद्धा असतं. पुरस्काराच्या ज्या समित्या असतात, त्यांच्यावर ते सगळं अवलंबून असतं. पुरस्कार स्वीकारणाऱ्यांना मी सांगेन की, आपल्यालाच मिळाला आहे ना तो? मग आपल्याइतका कोणी चांगला नाही असं समजूनच तो घ्यावा. आणि आणखी एक नकारात्मक भीती अशी की, मी जर नाही घेतला तर माझ्यापेक्षा खराब माणसाला मिळेल. म्हणून तो घेत जावा आणि विशेषत: अशा संस्थांचा घेत जावा.

शब्दांकन : सुहास पाटील

# रंगनाथ पठारे भाषण

**मागील वर्षाचा दिलीप वि. चित्रे साहित्य जीवनगौरव पुरस्कार प्रा. रंगनाथ पठारे यांना देण्यात आलेला होता. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी केलेले हे भाषण**

आदरणीय भालचंद्र नेमाडे, डॉ. भालेराव, शोभा चित्रे आणि व्यासपीठावरील – मी विचारपीठ म्हणत नाही, कारण व्यास आपलाच आहे ना? तर व्यासपीठावरील सर्व पुरस्कार विजेते लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते, आणि बंधूंनो आणि भगिनींनो,

इथं महाराष्ट्रातली, वेगवेगळ्या क्षेत्रांतली प्रतिष्ठित मंडळी मला समोर दिसत आहेत. मुख्य म्हणजे हा पुरस्कार समारंभ पुण्यात होतो आहे. तुम्हाला दुनियेत कुठेही काहीही मिळो, पुण्यात मिळालं तर त्याच्या इतकं श्रेष्ठ काही नाही! दिल्लीत मिळालं तरी पुण्यात मिळालं पाहिजे तर मग ती प्रतिष्ठेची मोहर तुमच्यावर उमटते. 'महाराष्ट्र फाउंडेशन'चा पुरस्कार आणि तोही पुण्यात; म्हणजे आज दुग्धशर्करा योग असं म्हणता येईल. आणि यासाठी सगळ्यांच्या वतीने, विशेषत: सामाजिक कार्यकर्त्यांच्या व संस्थांच्या वतीने, आणि आम्हा लेखकांच्या वतीने मी महाराष्ट्र फाउंडेशनला अतिशय अंत:करणापासून धन्यवाद देतो. माझा पुण्याशी संबंध फार जुना आहे. माझ्या जन्माच्या आधीपासूनचा आहे. दुसऱ्या महायुद्धात लढलेले माझे वडील नंतरच्या काळात काही काळ ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करत होते. आणि पुण्याजवळचं कोथरूड - जे आज पुण्याचा भाग झालेला आहे - तेव्हा एक बारीकसं खेडं होतं, गरीब वर्गातील लोकांना सहज राहता येईल अशी छोटी घरं होती तिथे. तिथे माझे आई-वडील राहत होते. आमचे वडील ट्रीपला गेले की कितीही दिवस परत यायचे नाहीत. तेव्हा आई गर्भवती होती. त्या काळात इथे पेरूच्या उत्तम बागा असत. घरामध्ये अन्न नसेल आणि भूक लागली तर अनेकदा आमची आई त्या बागांमधले पेरू चोरून खात असे. एकदा एका शेतकऱ्याने पाहिलं की, ही तरुण बाई आहे, ती पेरू चोरून खाते आहे आणि ती गर्भवती दिसते. त्याने तिला बोलवून घेतलं. आणि सांगितलं, 'बाई, तुला पाहिजे तितके पेरू इथे येऊन खात जा. कोणाचीही भीती बाळगू नकोस आणि चोरून खाऊ नकोस.' त्या कोथरूडच्या पेरूचा अंश माझ्यामध्ये नक्की उतरलेला होता. म्हणून मी म्हटलं की, माझा जन्म जरी माझ्या गावी झालेला असला तरी जन्मापूर्वीचा माझा पुण्याशी संबंध आहे. त्यामुळे पुणे




माझ्यावर कायमच प्रसन्न राहिलेलं आहे. काही काळ शिक्षणासाठी मी इथे होतोच.

आज हा पुरस्कार नेमाडे सरांच्या हस्ते मिळणं हा आम्हा सर्वांसाठी फार महत्त्वाचा, अभिमानाचा आणि मनामध्ये फार जपून ठेवावा असा क्षण आहे. याचं कारण सरळच आहे. गेल्या सुमारे साठ वर्षांमध्ये मराठी साहित्यावर त्यांनी नुसता प्रभावच टाकलेला नाही तर मराठी साहित्याला काही एक ठाशीव, वेगळं आणि ज्याला सर्वसमावेशक म्हणता येईल असं वळण दिलेलं आहे. अनिल साबळे, कुमारी बाई, प्रमोद झिंझाडे या तिघांच्या भाषांचा लहेजा किती वेगवेगळा होता! आणि या सगळ्या मराठी भाषाच आहेत. नाही तर आपल्याकडे म्हणजे, 'अरें काय तें...' हीच (पुणेरी बोली) भाषा म्हणजे मराठीतली शुद्ध भाषा. बाकी भाषा या अशुद्ध असं एकेकाळी होतं. आता ते उरलेलं नाही. साहित्यामध्ये ते उरलेलं नाही याचं बरंचसं श्रेय किंवा अधिकाधिक श्रेय नेमाडे यांनी रुजू केलेल्या, शिकवलेल्या मराठी भाषेला जातं. समाजाच्या इतक्या वेगळ्या स्तरांतून जातीधर्मांतून लेखक तुम्हाला लिहिताना, आत्मविश्वासाने वावरताना दिसत आहेत. याच्यामध्ये त्यांचं कार्य, त्यांनी दिलेलं योगदान अत्यंत महत्त्वाचं, अत्यंत उल्लेखनीय आहे. आम्हा सगळ्यांना त्याची जाणीव आहे. त्याच्याविषयी आम्हाला अभिमान वाटतो.

या पुरस्काराच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने जी स्मरणिका काढलेली आहे ती मी बघत होतो. विनोद

शिरसाठ यांनी उल्लेख केला की, १९९४ मध्ये हे पुरस्कार सुरू झाले तेव्हा मी साधारणत: ४४ वर्षांचा होतो आणि मला तो पहिलाच पुरस्कार मिळाला. त्या स्मरणिकेमध्ये १९९४ सालचा माझा एक फोटो आहे आणि सध्याचा फोटो सुरुवातीला टाकलेला आहे. ते दोन्ही फोटो बघत असताना माझ्या असं लक्षात आलं की, साधारणत: ७३ व्या वर्षी आता जसा मी दिसतो आणि ४४ व्या वर्षी मी जसा दिसायचो याच्यामध्ये महदंतर आहे. आणि तुम्हाला पुरस्कार मिळाला ठीक आहे पण तुमचा जीवनगौरव व्हायचा असेल तर तुम्हाला केवढं अंतर पार पाडायला लागतं ते त्याच्यातून लक्षात येतं.

मित्रहो, सद्यस्थितीच्या अनेक अंगांचा उल्लेख करणं शक्य आहे आणि तो करणं आवश्यकही आहे. डॉ. राजन गवस यांनी आपल्या भाषणात तो केलेला आहे आणि पुरेशा टोकदारपणे केलेला आहे. सर्वत्रच अघोषित असं एक भयाचं वातावरण आहे. तुम्ही अमुक केलं तर तमुक होईल, तुम्ही अमुक बोललात तर तमुक होईल, तुम्ही अमुक झेंड्याखाली उभे राहिलात तर तमुक होईल. किंवा अमुक व्यक्ती विरोधात बोललात तर तुमच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जाईल.. या प्रकारची चमत्कारिक अशी दहशत सार्वत्रिक झालेली आहे. आपण तिच्याबद्दल बोलत नाही. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीतून धैर्य प्रकट होणं ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट झालेली आहे. प्रत्येकाने स्वत:ला उपलब्ध असलेली अस्त्रं-शस्त्रं वापरली पाहिजेत. लेखकाने निर्भयपणे लिहिलं पाहिजे. कार्यकर्त्यांनी ठामपणे उभं राहिलं पाहिजे, निर्भयपणे रस्त्यावर उतरलं पाहिजे. या एक प्रकारच्या भयाचा प्रतिकार करणं ही आजची सगळ्यात महत्त्वाची गोष्ट झालेली आहे.

हे फक्त आपल्याकडेच घडत आहे असं नाही. जगात अनेक ठिकाणी अनेक प्रकारे या गोष्टी घडत असतात. आणि अनेक प्रकारे लेखक, कार्यकर्ते याला प्रतिक्रिया देत असतात. ज्याला लॅटिन अमेरिका म्हणतात तो दक्षिण अमेरिकेचा खंड हा जवळजवळ सतत युद्धप्रवण असलेला प्रदेश आहे. सतत उलट-सुलट बंदुकीच्या फैरी, अस्थिर आयुष्य, तरी त्यात माणसं अतिशय धैर्याने जगताना आपण पाहतो. लेखक सरळपणे लिहिता येत नाही तर वेगवेगळे मार्ग काढून लिहितात आणि अव्वल दर्जाच्या साहित्याची निर्मिती होते. ते उगीच कुणाची करमणूक करण्यासाठी लिहिलं जात नाही. तर प्रश्नांना भिडण्यासाठी आणि उत्तरांचे रस्ते शोधण्यासाठी, माणुसकीचे रस्ते शोधण्यासाठी, मनुष्यतेचे रस्ते शोधण्यासाठी लेखन केलं जातं. आपल्याकडचा आजचा आणखी मोठा मुद्दा अमानुषतेचा आहे. एक समाज म्हणून आपण अधिकाधिक अमानुष होत चाललेलो आहोत. दु:खाच्या संबंधाने आपण अत्यंत निर्ढावलेले बनत चाललो आहोत. बिल्किस बानो नावाची स्त्री ही भारतीय स्त्री आहे, ती हिंदू आहे की मुसलमान याच्याशी कर्तव्य नाही. या स्त्रीवर अत्यंत अमानुष पद्धतीने बलात्कार झालेला आपल्याला माहीत आहे. तिच्या मुलाला मारलं. तिच्या पोटामध्ये बाळ होतं. तिच्यावर अनेक जणांनी सामूहिक बलात्कार केला, जाळपोळ केली. न्यायालयाने त्यांना शिक्षाही दिल्या. जन्मठेपेच्या शिक्षा दिल्या गेल्या. आणि १०-१२ वर्षं झाल्यानंतर त्या राज्याच्या सरकारने सांगितलं की, आता यांनी शिक्षा पूर्ण केली, यांची वर्तणूक अतिशय उत्तम होती. त्यामुळे यांना मुक्त करावं. आता हे संशयास्पद असलं तरी आपण म्हणू ठीक आहे, ते कदाचित तुरुंगात ठीक वागले असतील. पण माझा मुद्दा पुढचा आहे. माझा मुद्दा असा आहे की, हे लोक जेव्हा तुरुंगातून सुटले, अनेक महिलांनी त्यांना ओवाळलं, अनेकांनी त्यांना पेढे खाऊ घातले. जणू काही फार मोठं युद्ध ते जिंकून आलेले होते! जणू काही ते

मोठे वीर आहेत या प्रकारे त्यांचा सन्मान केला गेला. एक मंत्री किंवा खासदार असं म्हणाला की, हे सगळे ब्राह्मण आहेत म्हणजे ते सुसंस्कृत आहेतच. अरे, म्हणजे काय? ब्राह्मण असेल तर सुसंस्कृत आणि बाकी सगळे असंस्कृत? अरे, आपण आज कुठे आहोत? सुसंस्कार कुणावरही होऊ शकतात. सुसंस्कृत मनुष्य याप्रकारे अमानुषतेने बलात्कार करील? पण त्या सगळ्याला निर्ढावलेल्या पद्धतीने आपण प्रतिष्ठा देत आहोत. आणि हे सगळं पाहूनही आपलं रक्त उसळत नाही. ही आपली शोकांतिका आहे. भारतीय आहे हो ती! कोणत्याही जाती-धर्माची असू दे; आपलीच आई-बहीण, कोणीतरी आहे ना ती? मग आपल्यामध्ये काहीतरी जे उसळायला पाहिजे ते का उसळत नाही? खरं म्हणजे आपल्याला आपल्या मानुषतेचा पुनर्जागर करणं, आपल्या धैर्याचा पुनर्जागर करणं आजच्या काळामध्ये सगळ्यात जास्त आवश्यक आहे. तो आपण वेगवेगळ्या प्रकारे करू असं जाहीरपणे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद!

शब्दांकन : सुहास पाटील



# निवड समिती

**साहित्य पुरस्कार निवड समिती**
(भारतातील)
श्रीधर नांदेडकर (अध्यक्ष)
अविनाश सप्रे
जयश्री हरि जोशी
सिसिलिया कार्व्हालो
मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

**रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार समिती**
(भारतातील)
किरण यज्ञोपवीत (अध्यक्ष)
प्राजक्त देशमुख
रसिका आगाशे
मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

**साहित्य पुरस्कार निवड समिती**
(अमेरिकेतील)
शोभा चित्रे
रजनी शेंदुरे
विद्युल्लेखा अकलूजकर
नंदन जोशी

**समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
(भारतातील)
देवेंद्र गावंडे
ज्योती म्हापसेकर
देविदास वडगावकर
निशा शिवूरकर
विजया चौहान (साधना ट्रस्ट)
विनोद शिरसाठ (साधना ट्रस्ट)
रमेश अवस्थी (मासूम)
मनीषा गुप्ते (मासूम)

**समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
(अमेरिकेतील)
प्रतिभा देशमुख
राजीव भालेराव
शोभा चित्रे
सुनीता धुमाळे
अरुंधती विनोद

**सुनील देशमुख महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार समन्वय समिती**

मनीषा गुप्ते (मासूम)
रमेश अवस्थी (मासूम)
विनोद शिरसाठ (संपादक, 'साधना' साप्ताहिक)
मुकुंद टाकसाळे

# महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था

## जीवनगौरव पुरस्कार

नारायण सुर्वे १९९४
मेघशाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
रा. ग. जाधव २००६
भा. ल. भोळे २००७
रावसाहेब कसबे २००८
गो. पु. देशपांडे २००९
अरुण टिकेकर २०१०
मंगेश पाडगावकर २०११
जयंत नारळीकर २०१२
कुमार केतकर २०१३
श्याम मनोहर २०१४
सुरेश द्वादशीवार २०१५
अरुण साधू २०१६
अनिल अवचट २०१७
शांता गोखले २०१८
वसंत आबाजी डहाके २०१९
महेश एलकुंचवार, २०२०
नरेन्द्र चपळगावकर २०२१
रंगनाथ पठारे २०२२

## विशेष पुरस्कार

भा. रा. भागवत : बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी : भाषांतर १९९७
बाबूराव बागूल : दलित साहित्य १९९८
वसंत दावतर : मराठी भाषा : संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी : मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे : लोकसाहित्य २००१
दत्ता भगत : दलित साहित्य २००२
केशव मेश्राम : दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे : ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव : ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६
महादेव मोरे २००७
सानिया : कथा या वाङ्मयप्रकारासाठी २०१८
राम जगताप : डिजिटल पत्रकारिता ‘अक्षरनामा’ २०२१
संतोष शिंत्रे : वाङ्मय प्रकार – पर्यावरण २०२१
राजन गवस : कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकारासाठी २०२२
सोनाली नवांगुळ : साहित्य पुरस्कार २०२२

## प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

## नियतकालिके / अनियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज, मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
परिवर्तनाचा वाटसरू २००६
पालकनीती, पुणे २००७

## ग्रंथ पुरस्कार : ललित

ताम्रपट : रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस : अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा : भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती : मिलिंद बोकील १९९५
वनवास : प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता – दोन : दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त : महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत : अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे : अंबरीश मिश्र १९९८
अधांतर : जयंत पवार १९९९
कबीर : अनुवाद – मंगेश पाडगावकर १९९९
तणकट : राजन गवस २०००
आतंक : विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा : श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी : ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा : राम दातोंडे २००१
मन्वंतर : दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा : अनुवाद : जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण : रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता : अनुवाद : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे : शफाअत खान २००२
वकिल्या पारधी : लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन : यशवंत मनोहर २००३
येरवडा विद्यापीठातील दिवस : कुमार सप्तर्षी २००३

राहीच्या स्वप्नांचा उलगडा : भारत सासणे २००३
आषाढमाती : श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत :
श्याम मनोहर २००४
पिढीजात : सतीश आळेकर २००४
भूमी : आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही
२००५
निशाणी डावा अंगठा : रमेश इंगळे-उत्रादकर
२००६
हॉटेल माझा देश : धम्मपाल रत्नाकर २००६
नंतर आलेले लोक : अरुण काळे २००७
आवानओल : अजय कांडर २००७
दर साल दर शेकडा : वीरधवल परब २००७
कुठल्याही विरामचिन्हाशिवाय :
अविनाश साळापुरीकर २००७
इडा-पिडा टळो : आसाराम लोमटे २००८
मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा :
प्रज्ञा दया पवार २००८
कवितान्तरण : चंद्रकान्त पाटील २००९
रिबोट : जी. के. ऐनापुरे २०१०
तृतीय पुरुषाचे आगमन :
मंगेश नारायणराव काळे २०११
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट :
आनंद विंगकर २०१२
निरर्थकाचे पक्षी : नीरजा २०१२
पडझड : अशोक पवार २०१३
राखीव सावल्यांचा खेळ : किरण गुरव २०१४
तांडव : महाबळेश्वर सैल २०१४
खेळघर : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ २०१५
विरंगी मी, विमुक्त मी : अंजली जोशी २०१६
धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ २०१७
उजव्या सोंडेच्या बाहुल्या : प्रवीण बांदेकर
२०१८
रिंगाण : कृष्णात खोत २०१९
तिसरा डुळा : किरण येले २०२०
दगडी मत्ता : रमेश अंधारे २०२१
पिवळा पिवळा पाचोळा : अनिल साबळे २०२२

## ▪ ग्रंथ पुरस्कार : वैचारिक ▪

आस्तिक शिरोमणी चार्वाक : आ. ह. साळुंखे
१९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक
पार्श्वभूमी : गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा
हिंदू राष्ट्रवाद : रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा : जनार्दन वाघमारे
१९९६
जाळ्यातील चंद्र : म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत :
गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन : सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे : मनोहर कदम १९९७
आंबेडकर : नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक : म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न : ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक
आविष्कार : श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना :
संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि
साहित्य : स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र : अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी : नरेंद्र चपळगावकर २०००
मार्क्सचा मानव विचार : मुरलीधर पवार २००१

प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती : म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट : जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय : भा. ल. भोळे २००३
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य गो. मा. पवार २००५
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे : म. सु. पाटील २००५
मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती : वसंत आबाजी डहाके २००६
वानप्रस्थ : गणेश देवी २००७
समाचार : जयदेव डोळे २००८
बदलते विश्व : कुमार केतकर २००९
साम्राज्यवादविरोध आणि जातिविनाश : आनंद तेलतुंबडे २०१०
महापुरुषांच्या नजरेतून स्त्री : मंगला आठलेकर २०११
बाईमाणूस : करुणा गोखले २०१२
डाकीण : संध्या नरे-पवार २०१३
समग्र निरीश्वरवाद : शरद बेडेकर २०१५
पाण्याशप्पथ : प्रदीप पुरंदरे २०२०

## ग्रंथ पुरस्कार : अ-पारंपरिक

जिहाद : हुसेन जमादार १९९४
आक्रोश : भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया : बाबा भांड १९९६
लॉरी बेकर : अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन : लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना : अनुवाद : हेमंत कर्णिक २००४
आयदान : ऊर्मिला पवार २००४
खाली जमीन वर आकाश : सुनीलकुमार लवटे २००७
तमाशा : एक रांगडी गंमत : संदेश भंडारे २००७
कथा मुंबईच्या गिरणगावाची : नीरा आडारकर व मीना मेनन २००८
एका साळियाने : लक्ष्मीनारायण बोल्ली २००९
आणि दोन हात : वि. ना. श्रीखंडे २०१०
दगडावरची पेरणी : सय्यदभाई २०१०
वाचणाऱ्याची रोजनिशी : सतीश काळसेकर २०११
आपुलाचि वाद आपणासि : चंद्रकांत वानखडे २०११
आश्रम नावाचे घर : अचला जोशी २०११
जाग मना जाग : लीला आवटे २०१२
प्लॅटफॉर्म नंबर झिरो : अमिता नायडू २०१३
चित्रव्यूह व चलत् चित्रव्यूह : अरुण खोपकर २०१४
प्रतिमा-प्रचिती : नीतिन दादरावाला २०१५
इर्जिक : अरुण जाखडे २०१६
सय : माझा कला प्रवास : सई परांजपे : २०१७
लीळा पुस्तकांच्या : नीतिन रिंढे २०१८
टिपंवणी : सिसिलिया कार्व्हालो २०२१
भुरा : शरद बाविस्कर २०२२

## ■ रा. शं. दातार नाट्य पुरस्कार ■

ढोलताशे : चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा : किरण पोत्रेकर २००४
छोट्याशा सुट्टीत : सचिन कुंडलकर २००५
मळभ : किरण यज्ञोपवीत २००६
निब्बाण : अरुण मिरजकर २००७
ते पुढे गेले : मकरंद साठे २००८
खेळीमेळी : चंद्रशेखर फणसळकर २००९
आनंदभोग मॉल : आशुतोष पोतदार २०१०
बया दार उघड : सुषमा देशपांडे २०११
काय डेंजर वारा सुटलाय : जयंत पवार २०१२
राजकुमार तांगडे (अभिनय व लेखनासाठी) २०१३
हिंमाशू स्मार्त : जत्रेतलं जायंट व्हील २०१४
सुसाट : अजित देशमुख २०१५
अनिलकुमार साळवे (एकूण नाट्यलेखन) २०१६
समाजस्वास्थ्य : अजित दळवी : २०१७
हंडाभर चांदण्या : दत्ता पाटील २०१९
'विपाशा', 'टिळा', 'ऑस्कर', 'रंग'
एकांकिकांसाठी : मुक्ता बाम २०२१
पुनश्च हनिमून : संदेश कुलकर्णी २०२२

## ■ नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार ■
## रा. शं. दातार विशेष नाट्यपुरस्कार

अतुल पेठे २००६
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे २०१३
राजीव नाईक २०१८

## ■ समाजकार्य सन्मान पुरस्कारांचे मानकरी – व्यक्ती व संस्था ■

**१९९६**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  विलास वाघ, पुणे
- पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) :
  वासुदेवराव चित्रे, पालघर
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  विजया चौक, धुळे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

**१९९७**

- स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे
- समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकविज्ञान संघटना, पुणे
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  शुभदा देशमुख, गडचिरोली
- पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
  विजय नारकर, देवरूख
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  लीला पाटील, कोल्हापूर

**१९९८**

- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  जयंत गडकरी, मुंबई

- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  हुमायून अब्दुलअली, मुंबई
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती)
  सुरेखा दळवी, पेण

**१९९९**

- प्रबोधन (संस्था) :
  समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रेहाना बैलिम, अमरावती
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  कुसुम कर्णिक, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  भरत कावळे, नाशिक

**२०००**

- स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मनोहर कदम, मुंबई
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  चिं. धों. आसवले, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  संजय संगवई, पुणे.

**२००१**

- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मु. ब. शहा, धुळे
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  कुमुद पावडे, नागपूर
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  काळुराम दोधडे, पालघर
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

**२००२**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  भुरीबाई मानसिंग शेळे, नंदुरबार
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रजिया सुलताना, अमरावती
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  दत्ता इस्वलकर, मुंबई,
  डॉ. विवेक मॉंटेरो, मुंबई,
  डॉ. राम पुनियानी, मुंबई

**२००३**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना,
  कोरेगाव, सातारा
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रझिया पटेल, पुणे
  शेख वजीर पटेल, अमरावती
  सुरेश शिपूरकर, कोल्हापूर
  आनंद पटवर्धन, मुंबई
  उल्का महाजन, रोहा, रायगड

**२००४**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  समाज विज्ञान अकादमी, पुणे
  मासूम, पुणे
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  तिस्ता सेटलवाड, मुंबई
  रमेश हरळकर, मुंबई

पोपटराव पवार, अहमदनगर
डॉ. मोहन देशपांडे, पुणे
विलास भोंगाडे, नागपूर

**२००५**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकपंचायत, संगमनेर, जि. अहमदनगर
  श्रमिक महिला विकास संघ, वसई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  श्री. लीलाधर हेगडे, मुंबई
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रा. यशवंत संत, पुणे
  श्री. लक्ष्मण माने, करंजे, जि. सातारा
  श्रीमती प्रतिभा शिंदे, नंदुरबार
  श्रीमती पूर्णिमा मेहेर, पालघर
  श्रीमती सुषमा शर्मा, वर्धा
  सत्कार : श्री. सुरेश खोपडे, मुंबई

**२००६**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  आंबेडकर अकादमी, सातारा
  पुणे शहर मोलकरीण संघटना, पुणे
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  पन्नालाल सुराणा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  रूपा कुळकर्णी, नागपूर
  अनंत फडके, पुणे
  वाहरू सोनवणे, नंदुरबार
  सत्कार : मनीषा वर्मा

**२००७**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  हॅलो मेडिकल फाउण्डेशन, अणदूर, जि. उस्मानाबाद
  स्त्री मुक्ती संघटना, मुंबई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  प्रा. एन. डी. पाटील, सातारा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रदीप प्रभू, डहाणू
  अन्वर राजन, पुणे
  राजन इंदुलकर, चिपळूण
  सत्कार : प्रकाश विश्वासराव

**२००८**

- समाजकार्य जीवनगौरव (व्यक्ती) :
  डॉ. बाबा आढाव, पुणे
- समाजप्रबोधन (व्यक्ती)
  डॉ. आनंद तेलतुंबडे
- पर्यावरण संरक्षण संवर्धन (व्यक्ती) :
  कुंजबिहारी
- परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य (व्यक्ती) :
  अर्जुन कोकाटे
  दलितांचे प्रश्न : व्यंकप्पा भोसले
  सामाजिक सलोखा : सुरेश खैरनार
- युवा कार्यकर्ता : सिम्प्रित सिंग

**२००९**

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  व्यंकटअण्णा रणधीर
- समाजप्रबोधन : सुभाष वारे
- सामाजिक प्रश्न : बंड्या साने
- असंघटित कष्टकरी : श्रीनिवास कुलकर्णी
- युवा कार्यकर्ता : योगिनी खानोलकर

**२०१०**

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  नागनाथअण्णा नायकवडी
- विशेष कार्य : चंद्रकांत केळकर
- समाजप्रबोधन : सत्यपाल महाराज
- असंघटित कष्टकरी : बस्तू रेगे

- सामाजिक प्रश्न : हरीष सदानी
- युवा कार्यकर्ता : नीलेश निमकर
- लक्षवेधी प्रशासकीय कार्य : लक्ष्मीकांत देशमुख

**२०११**

- समाजकार्य जीवनगौरव : जी. जी. परीख
- समाजप्रबोधन : सुनीती सु. र.
- असंघटित कष्टकरी : सुभाष लोटे
- सामाजिक प्रश्न : ब्रायन लोबो
- विशेष कार्य : ज्योती म्हापसेकर
- विशेष कार्य : नीलिमा मिश्रा

**२०१२**

- समाजकार्य जीवनगौरव ठाकूरदास बंग
- समाजप्रबोधन : माधव बावगे
- सामाजिक प्रश्न : बाळकृष्ण रेणके
- असंघटित कष्टकरी : शिवाजी कागणीकर

**२०१३**

- समाजकार्य जीवनगौरव : रयत शिक्षण संस्था
- समाजप्रबोधन : गजानन खातू
- असंघटित कष्टकरी : धनाजी गुरव
- सामाजिक प्रश्न : डॉ. अशोक बेलखोडे

**२०१४**

- समाजकार्य जीवनगौरव : पुष्पा भावे
- समाजप्रबोधन : रमेश गावस
- सामाजिक प्रश्न : बिंदुमाधव खिरे
- असंघटित कष्टकरी : मनीषा तोकले

**२०१५**

- समाजकार्य जीवनगौरव : विद्या बाळ
- समाजप्रबोधन : भीम रासकर
- असंघटित कष्टकरी : पल्लवी रेणके
- सामाजिक प्रश्न : कृष्णा चांदगुडे

**२०१६**

- समाजकार्य जीवनगौरव : हमीद दलवाई (मरणोत्तर)
- समाजप्रबोधन : देवजी तोफा
- सामाजिक प्रश्न : विजय दिवाण
- असंघटित कष्टकरी : सुशीला नाईक

**२०१७**

- समाजकार्य जीवनगौरव : गंगाप्रसाद अग्रवाल
- समाजप्रबोधन : रुबिना पटेल
- असंघटित कष्टकरी : चेतना गाला-सिन्हा
- सामाजिक प्रश्न : अरुण जाधव

**२०१८**

- समाजकार्य जीवनगौरव : आनंदवन
- समाजप्रबोधन : हरी नरके
- असंघटित कष्टकरी : निशा शिवूरकर
- सामाजिक प्रश्न : मतीन भोसले

**२०१९**

- विशेष कृतज्ञता पुरस्कार : राजेंद्र बहाळकर
- कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन) : शहाजी गडहिरे
- कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष) : जमीला बेगम, पठाण इताकुला

**२०२०**

- समाजकार्य जीवनगौरव : गजानन खातू
- विशेष कृतज्ञता : जतीन देसाई
- कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष) : सुधीर अनवले
- कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन) : अरुणा सबाने
- युवा पुरस्कार : चेतन साळवे

**२०२१**

- समाजकार्य जीवनगौरव : प्रेमाताई पुरव (‘अन्नपूर्णा परिवार’ संस्था)
- कार्यकर्ता (प्रबोधन) : सुरेश सावंत
- कार्यकर्ता (संघर्ष) : सुनीता भोसले
- युवा पुरस्कार : युवराज गटकळ

**२०२२**

- समाजकार्य विशेष पुरस्कार (दलित आणि भूमिहीनांच्या हक्कांसाठी केलेले कार्य) : शांताराम पंदेरे
- समाजकार्य विशेष पुरस्कार (विधवा प्रथा निमूर्लनाचे कार्य केल्याबाबत) : प्रमोद झिंजाडे
- कार्यकर्ता (संघर्ष) : कुमारीबाई जमकातन
- कार्यकर्ता (प्रबोधन) : नंदिनी जाधव

## ▪ डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति-पुरस्कार ▪

विवेक सावंत / २०१३
निखिल वागळे / २०१४
उत्तम कांबळे / २०१५
अतुल पेठे / २०१६
अरविंद गुप्ता / २०१७
तर्कशील सोसायटी पंजाब / २०१८
केरळ शास्त्र साहित्य परिषद / २०१९
डॉ. के. वीरमणी, चेन्नई / २०२०
अंशुल छत्रपती, हरयाना / २०२१
ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क / २०२२

## महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)
# पुरस्कार निवडीचे निकष

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा सन्मान करण्यासाठी एक जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. दर वर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात हा पुरस्कार दिला जातो. अशाच प्रकारे एक वाङ्मयप्रकार पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारांसाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : ललित साहित्याच्या संदर्भात...**

- ज्यांच्या साहित्यातून लोकशाही मूल्यांच्या आणि मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे, उदारमतवादी दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचं समर्थ दर्शन घडवलं गेलं आहे,
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झालेला आहे,
- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे किंवा ज्यांचं साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचं ठरलं आहे.

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : वैचारिक साहित्याच्या संदर्भात...**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यकारांनी नि:स्पृह वृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव लोकशाही मूल्ये आणि मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे, ज्यांच्या लेखनातून उदारमतवादाचा पुरस्कार केलेला आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचं लेखन महत्त्वाचं ठरलं आहे.

**ग्रंथांसाठी पुरस्कार :**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून ललित आणि वैचारिक वा अपारंपरिक मराठी ग्रंथांना पुरस्कार दिला जातो. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील तीन वर्षांतील पुस्तकांचा विचार केला जातो.

**रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार :**

नाट्यलेखन या प्रकारासाठी २००३ सालापासून हा पुरस्कार महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयी आशयसंपन्न नाट्यसंहिता लिहिणाऱ्या नाटककारास हा पुरस्कार देण्याची योजना आहे. दीर्घकाळ अशी नाटकं रंगभूमीवर सादर करणाऱ्या रंगकर्मीलाही हा पुरस्कार दिला जाऊ शकतो.

**समाजकार्य पुरस्कार :**

१९९६ पासून 'समाजकार्य पुरस्कार योजना' सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचं मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा या हेतूने हे पुरस्कार सुरू केले.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन व संरक्षण तसंच परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य, दलितांचे प्रश्न आणि जातीय व धार्मिक सलोखा या क्षेत्रांतील व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो.

२००५ पासून समाजबदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला वा संस्थेला समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येतं. त्याचबरोबर प्रबोधन, रचना व संघर्ष यांपैकी एका प्रकारचं विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारांसाठी व्यक्तींच्या व संस्थांच्या नावाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

१. ज्या व्यक्ती वा संस्था आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्यं रुजवण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचं कार्य करत आहेत,

२. पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरता ज्या व्यक्ती अविरत कार्य करत आहेत,

३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे,

पुरस्काराची संख्या एखाद्या वर्षी कमी-जास्त होऊ शकते. पुरस्कार समिती (अमेरिका) यांनी तो हक्क राखून ठेवलेला आहे.

**महाराष्ट्र फाउंडेशनच्या कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करावे लागत नाहीत. निवड समित्यांचे सदस्य त्या त्या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील निवड समितीला करतात आणि त्यातून अंतिम निवड केली जाते.**

# ‘महाराष्ट्र फाउंडेशन’विषयी

महाराष्ट्र फाउंडेशन ही अमेरिकेतील स्वयंसेवकांनी चालवलेली ‘ना नफा’ तत्त्वावरची संघटना संस्था आहे. १९७८ पासून ही संस्था अमेरिकेतील मराठी माणसांची सामाजिक जाणीव जपत आहे. महाराष्ट्र फाउंडेशनची पाच प्रमूख सूत्रे आहेत - शिक्षण, आरोग्य, गरिबी निर्मूलन, स्त्रियांचं सबलीकरण आणि पर्यावरण. सर्वांसाठी आर्थिक आणि सामाजिक न्याय हा संस्थेचा ध्यास आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली चाळीसहून अधिक वर्षे करीत आहे. अमेरिकेतील मराठी माणसांच्या सहकार्यामुळे संस्थेने आत्तापर्यंत दोन दशलक्षहून अधिक डॉलर्सची मदत विविध कार्यांना केलेली आहे.

प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत मदत करण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रातील लातूर भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजरातमधील भूकंपासाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे. २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांच्या वेळी संकटग्रस्तांसाठी महाराष्ट्र फाउंडेशनने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली. अमेरिकेतील कतरीनाचे चक्रीवादळ असो, वा नेपाळचा भूकंप असो, आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेने नेहमीच निधी पुरवला आहे. नुकत्याच झालेल्या कोरोनाच्या महामारीत संस्थेने एकूण १५० हजार डॉलर्सची मदत केली.

महाराष्ट्र फाउंडेशनने महाराष्ट्रातल्या पाचशेहून अधिक सेवाभावी संस्थांना विविध सामाजिक कार्यासाठी मदत केली आहे. आणि आजही करत आहे. ‘भारत-वैद्य (अनवाणी डॉक्टर)’, ‘मैत्रीण’, ‘समाज परिवर्तनासाठी माहिती तंत्रज्ञान’, ‘एक गाव एक संगणक’, ‘मानवी अपव्यापारांचे नियंत्रण’, ‘बालिका-विवाह नियंत्रण’, ‘निराधार महिला पुनर्वसन’ अशा अनेक सामाजिक प्रकल्पांना कार्यान्वित केले आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. त्यांच्या कार्याचा सत्कार करण्यासाठी सुनील देशमुखांच्या पुढाकाराने १९९४ साली ‘मराठी साहित्य पुरस्कार योजना’ सुरू केली, तसेच समाज परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती आणि संस्थांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता, अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने १९९६ साली समाजकार्य पुरस्कार योजना सुरू केली.

२०२१ पासून महाराष्ट्र फाउंडेशनने एकात्मिक गाव विकासाचे लक्ष्य असलेला ‘पंचम’ हा उपक्रम सुरू केला आहे. ह्या उपक्रमात Resource & Support Center for Development, AWARD, RUDYA, Climate Reality Project आणि Door Step Schools ह्या संस्थांचा सहभाग असणार आहे.

ह्या उपक्रमांतर्गत साताऱ्यातील कुसुंबी आणि गडचिरोलीतील मुतनूर ह्या गावांमध्ये कामे सुरू आहेत. ह्या गावांमध्ये खालील प्रकल्प पूर्णतेच्या मार्गावर आहेत :

**कुसुंबी**

'AgroMillets Women Farmer Producer Company' नावाची महिलांची शेतकरी उत्पादन संस्था स्थापण्यात आली आहे. ह्या प्रकल्पामुळे महिलांना नेतृत्वाची संधी मिळणार आहे, शेतकऱ्यांना नाचणीला चांगला बाजारभाव मिळणार आहे, गावात रोजगाराची संधी निर्माण होणार आहे आणि एकंदर गावाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

गावातल्या दोन शाळांचे Green Campus मधे रूपांतर करण्यात आले आहे. त्यामुळे शाळांना सौर विद्युत् शक्ती उपलब्ध होणार आहे, तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी शिक्षण मिळणार आहे. ह्याच प्रकल्पांतर्गत गावात शंभर घरांमध्ये निर्धूर चुली बसवण्यात येणार आहेत.

गावामध्ये शुद्ध पाणी पुरवण्यासाठी दोन Water ATM बसवण्यात आले आहेत, तसेच गावातल्या सहा शाळांमधे Water Filters बसवण्यात आले आहेत.

**मुतनूर**

गावात जलसंवर्धनासाठी तलाव बांधण्यात आला आहे. ह्या तलावामुळे शेतीचा एक अधिक मोसम मिळणार आहे. तसेच मत्स्य उद्योग उभारता येणार आहे. ह्या तलावामुळे गावच्या उत्पन्न वाढीसाठी मदत होणार आहे.

गावातल्या प्राथमिक शाळेतला शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. ह्यामुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साह आणि त्यांची संख्याही वाढली आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनच्या आगामी योजनेनुसार पुढच्या वर्षी पंचम उपक्रमांत तीन अधिक गावांचा समावेश केला जाणार आहे.

सर्वांसाठी सामाजिक व आर्थिक न्याय ह्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या ध्येयाच्या वाटचालीत पंचम उपक्रमामुळे नवी ऊर्जा मिळणार आहे; अर्थात ह्या उपक्रमाच्या मागे आहे अमेरिकेत स्थित असलेल्या अनेक दानशूर व्यक्तींची सामाजिक जाणीव आणि सेवाभावी संस्थांचे कष्ट.

**राजीव भालेराव**
अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन, (अमेरिका)

# कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे
# डॉ. जब्बार पटेल यांचा परिचय

*(जन्म : २३ जून १९४२, पंढरपूर)*



या वर्षी (२०२४साली) पिंपरी चिंचवड येथे पार पडलेल्या शंभराव्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष.

- **जब्बार पटेल यांची भूमिका असलेली नाटके**
  - तुझे आहे तुजपाशी (सोलापूरच्या महाविद्यालयात)
  - जनावर, बळी (एकांकिका – बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात)
  - तू वेडा कुंभार
  - अशी पाखरे येती

---

- **जब्बार पटेलांनी दिग्दर्शित केलेली नाटके**
  - अशी पाखरे येती
  - घाशीराम कोतवाल
  - तीन पैशाचा तमाशा
  - खेळीया
  - पडघम

---

- **जब्बार पटेलांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट**
  - डॉ. बाबासाहेब आंबेडकर (२०००)
  - मुक्ता (१९९४)
  - एक होता विदूषक (१९९२)

- महाराष्ट्र (१९८६)
- मुसाफिर (१९८६)
- उंबरठा (१९८२)
- सिंहासन (१९७९)
- जैत रे जैत (१९७७)
- सामना (१९७४)

## जब्बार पटेलांनी दिग्दर्शित केलेले लघुपट

- कुमार गंधर्व (हंस अकेला) (२००५)
- फोर्ट्स ऑफ महाराष्ट्र (१९९०)
- इंडियन थिएटर (१९९०)
- कुसुमाग्रज
- पथिक (१९८८)
- मी एस.एम. (१९८७)
- लक्ष्मणराव जोशी (१८८९)

## पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

२००२ पासून दर वर्षी भरणाऱ्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे गेली २३ वर्षे ते फेस्टिव्हल डिरेक्टर आहेत. त्यांच्या पुढाकारानेच हा महोत्सव सुरू झालेला आहे.

जब्बार पटेलांना त्यांच्या नाट्य-चित्र क्षेत्रांतील कामगिरीबद्दल अनेक भारतीय सन्मानांनी गौरवलेले आहे.

*(विकिपीडियावरून)*